पेण एज्युकेशन सोसायटीचे

# भाऊसाहेब नेने कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय

पेण-रायगड

(Re-Accredited by NAAC with ‘B’ grade (With a CGPA of 2.22)

स्थापना १९९०

(मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न)

# प्रतिबिंब

## २०२४-२५

भारतीय रत्न



Journey From
1937 to 2024


प्रायव्हेट हायस्कुल
जवळ,
पेण - रायगड
४०२१०७

(०२१४३)
२५२४९६

pesbnasc@yahoo.co.in

www.pesbncollege.org.in

@pesbhausahebnenecollegepen5390

पेण एज्युकेशन सोसायटीचे

# भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय

पेण — रायगड

Re-Accredited by NAAC with ‘B’ grade (With a CGPA of 2.22)

# पेण एज्युकेशन सोसायटी संचालक मंडळ



ॲड. मंगेश विश्वनाथ नेने
अध्यक्ष



श्री.प्रशांत जयराम ओक
कार्याध्यक्ष



श्री.संजय बाबूराव कडू
उपकार्याध्यक्ष व मानद कोषाध्यक्ष



श्री.सुधीर रामचंद्र जोशी
मानद चिटणीस सदस्य



श्री.शंकर विश्वनाथ भट
प्रशासकीय अधिकारी



श्री.दिगंबर वामन चिंचणीकर
प्रशासकीय अधिकारी



श्री.ललित रविंद्र पाटील
सदस्य



श्री.दिलिप गणेश बापट
सदस्य



श्री.समिर सुरेश साने
सदस्य



डॉ. सौ. निता विजय कदम
सदस्या



सौ.ज्योती देवेश राजे
स्विकृत सदस्या



सौ.पूनम मितेश शहा
स्विकृत सदस्या



श्री.श्रीराम दातार
स्विकृत सदस्य



श्री.अमित देव
स्विकृत सदस्य



ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक कै.भाऊसाहेब नेने

# महाविद्यालयाचे स्फूर्तिस्थान



## मा. माधव नारायण तथा बापूसाहेब नेने

प्रेरणास्थान आणि आधार स्तंभ



# तरुण तडफदार नेतृत्व

**ॲड. मा. मंगेश विश्वनाथ नेने**
**अध्यक्ष, पेण एज्युकेशन सोसायटी,**
**पेण — रायगड**

- पुढारी पेपर तर्फे - 'युथ आयकॉन ' (मुख्यमंत्री शिंदे साहेब व केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या हस्ते)
- लोकमत मीडिया (व्यवसायासाठी ) - 'द ग्रेट लीगल माईंडस' पुरस्कार (ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.उज्वल निकम हस्ते )
- नवभारत टाईम्स - आदर्श नवराष्ट्र पुरस्कार (सामाजिक , शैक्षणिक )
- कोकणभूमी प्रतिष्ठान - 'कोकण आयडॉल' पुरस्कार
- बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघ, महाराष्ट्र तर्फे – ' इन्टरनॅशनल एक्सलन्स ॲवार्ड '
- मॅक्स महाराष्ट्र चॅनल व महापरिवर्तनवादी
- पत्रकार संघ तर्फे - - शैक्षणिक कार्याबद्दल पुरस्कार
- गांधी पीस फाऊंडेशन, नेपाळ ' मानद डॉक्टरेट '
- महाराष्ट्र पत्रकार संघातर्फे . - 'शिक्षण तज्ज्ञ' पुरस्कार




# PRINCIPAL

**Dr. Sadananad Bhaskar Dharap**
**M.Sc., Ph.D., L.L.B.**

मनोगताचे चार शब्द.....
नमस्कार

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची सुरूवात ही नवीन शैक्षणिक धोरण राबवून झाली. विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची ओळख करून देताना पालक आणि विद्यार्थी यांना नवीन शैक्षणिक धोरणा संदर्भात मार्गदर्शन केले.महाविद्यालयात नेहमीप्रमाणे विविध उपक्रम व्याख्याने यांची सुरूवात झाली.याचबरोबर नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी याबद्दल चर्चा तसेच **N.S.S, D.L.L.E, Sports,cultural** यांनी विविध उपक्रम राबवून चांगली सुरूवात केली.हे मनोगत फक्त त्रोटक माहिती देईल पण प्रत्यक्षात अनेक उपक्रम राबविले गेलेत.बाकीचा आढावा व उल्लेख त्या- त्या अहवालात येईलच.

सर्वांना मनापासुन शुभेच्छा...
प्राचार्य - सदानंद भास्कर धारप

पेण एज्युकेशन सोसायटीचे

**भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय**

पेण — रायगड.

Accredited by NAAC with 'B' grade (With a CGPA of 2.22)

मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न

दूरध्वनी क्र. ०२१४३ — २५२४९६

वार्षिक नियतकालिक

# वार्षिक नियतकालिक

# "प्रतिबिंब"

## २०२४ — २५

(तक्ता क्र. नियम ८ प्रमाणे माहितीपत्रक)

प्रकार - वार्षिक

स्वामित्व: पेण एज्युकेशन सोसायटीचे, भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पेण — रायगड. (महाराष्ट्र)

प्रकाशक: प्राचार्य डॉ.एस.बी.धारप

राष्ट्रीयत्व: भारतीय

पत्ता: भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पेण — रायगड.

संपादक: प्रा. सौ. डॉ. यु. ए. खाडिलकर

संपादक मंडळ

अध्यक्ष

प्राचार्य डॉ. एस. बी. धारप

प्रमुख संपादक

प्रा. सौ. डॉ. यु. ए. खाडिलकर

सदस्य

प्रा. डॉ. व्ही. एन. गुम्मा प्रा. श्री. सदानंद चिटणीस प्रा.एस.ए.धुमाळ

(अंकांतील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

मुद्रक: भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पेण — रायगड.

मी प्राचार्य डॉ.एस.बी.धारप असे जाहीर करतो की, वर दिलेली माहिती बरोबर आहे.

पेण

सन: २०२४ — २५

प्राचार्य डॉ.एस.बी.धारप

प्रकाशक

पेण एज्युकेशन सोसायटीचे

**भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,**

पेण — रायगड.

Accredited by NAAC with 'B' grade (With a CGPA of 2.22)

मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न

# Vision

''Nobody should be deprived from higher education and to develop overall personality of the students in rural and tribal areas''

# Mission

To inculcate values which will make our students academically sound and socially conscience and also to have manpower which will be ever ready to meet national and global challenges.

# Goals

- To avail the benefits of quality higher education at affordable cost to the students of rural, tribal and urban region.
- To develop overall personality of the students by giving ample exposure in sports, cultural N.S.S and D.L.L.E. Activities.
- To develop bonding between educational institution and industries for mutual benefits.
- To instill human values among the students with a view to empowering them to play a significant role in nation building.
- To help to achieve the goal of PEN EDUCATION SOCIETY in providing KG to PG education under one roof.

पेण एज्युकेशन सोसायटीचे
## भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
पेण - रायगड.

(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९७ (१) अन्वये)

# महाविद्यालय विकास समिती
# २०२२ - २०२७

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ॲड. श्री. मंगेश वि. नेने | - अध्यक्ष |
| २. | मा. श्री. प्रशांत ज. ओक (कार्याध्यक्ष, पे. ए. सो.) | - सदस्य |
| ३. | मा. सुधीर रा. जोशी (मानद चिटणीस, पे. ए. सो.) | - सदस्य |
| ४. | मा. सौ. आश्विनी सु. गाडगीळ | - सदस्या |
| ५. | मा. विनायक गोखले | - सदस्य |
| ६. | मा. डॉ. मयुरेश कुलकर्णी | - सदस्य |
| ७. | प्रा. बी. एम्. शिकारे (IQAC - coordinator) | - सदस्य |
| ८. | प्रा. डॉ. ए. एम. पाटील (HOD - Geography Dept) | - सदस्य |
| ९. | प्रा. डॉ. सौ. एच. ए. सावंत | - महिला शिक्षिका प्रतिनिधी |
| १०. | १. डॉ. एस. आर. कान्हेकर | - शिक्षक प्रतिनिधी |
| | २. डॉ. व्ही. एन. गुम्मा | - शिक्षक प्रतिनिधी |
| ११. | श्री. हिरामण कि. आवास्कर | - शिक्षकेतर प्रतिनिधी |
| १२. | प्राचार्य. डॉ. सदानंद भा. धारप | - सदस्य सचिव |

# TEACHING STAFF

| SR.NO. | NAME OF THE TEACHER | DEPARTMENT |
|---|---|---|
| 1 | Principal Dr. S. B. Dharap | Chemistry |
| 2 | Asso.Prof. Mrs. G. M. Menon | Commerce |
| 3 | Asso.Prof. A.Z. Azmi | Maths |
| 4 | Asso.Prof. Dr. Mrs. U. A. Khadilkar | History |
| 5 | Asst.Prof. Dr. Mrs. H. A. Sawant | Pol.Science |
| 6 | Asst.Prof. Mrs. S. S. Pitale | Botany |
| 7 | Asst.Prof. G. V. Upadhye | Commerce |
| 8 | Asst.Prof. Dr. V. D. Bhabad | Chemistry |
| 9 | Asst.Prof. Dr. T. D. Malave | History |
| 10 | Asst.Prof. B. M. Shikare | Physics |
| 11 | Asst.Prof. Dr. M. H. Salunke | Chemistry |
| 12 | Asst.Prof. Dr. A. M. Patil | Geography |
| 13 | Asst.Prof. Dr. S. R. Kanhekar | Physics |
| 14 | Asst.Prof. Dr. D. K. Bamane | Hindi |
| 15 | Asso.Prof. Dr. V. N. Gumma | Economics |
| 16 | Asst.Prof. Dr. A. D. Kamble | Chemistry |
| 17 | Asst.Prof. Dr. S. D. Lakade | Chemistry |
| 18 | Asst.Prof. B. E. Walunj | Physics |
| 19 | Shri. G. G. Joshi | Librarian |
| 20 | Asst.Prof. P. D. Patil | English |
| 21 | Asst.Prof. S. B. Chitnis | Chemistry |
| 22 | Asst.Prof. Dr. A. D. Bhise | Chemistry |

# NON - TEACHING STAFF

| Sr.No. | Name | Designation |
|---|---|---|
| 1 | Shri. P. N. Awaskar | Office Supritendent (O.S) |
| 2 | Shri. H. K. Awaskar | Lab Assistant |
| 3 | Shri. K. K. Shid | Senior Clerk |
| 4 | Smt. B. S. Dharse | Junior Clerk |
| 5 | Shri. K. H. Jadhav | Peon |
| 6 | Shri. S. K. Patil | Lab Attendant |
| 7 | Shri. M. V. Pendse | Lab Attendant |
| 8 | Shri. B. L. Pardhi | Peon |
| 9 | Shri. R. N. Hindola | Library Attendant |
| 10 | Shri. S. V. Surve | Peon |
| 11 | Shri. V. A. Gadkhal | Peon |
| 12 | Shri. N. B. Gunjawale | Library Attendant |
| 13 | Shri. A. S. Jadhav | Lab Attendant |

# संपादकीय...

प्राध्यापक–विद्यार्थी यांच्या सृजनशीलतेतून साकारलेले विविधांगी साहित्य, विविध उपक्रमांची छायाचित्रे, त्यावर आधारित वृत्तपत्रांतील बातम्यांची कात्रणे, आशयघन आणि आकर्षक मुखपृष्ठ यांनी परिपूर्ण असलेला सन २०२४–२५ चा 'प्रतिबिंब' हा वार्षिकांक विद्यार्थी, प्राध्यापक व वाचकांच्या हाती देताना विशेष आनंद होत आहे.

यंदाचे वर्ष हे महाराष्ट्रासाठीच नव्हे तर जगात सर्वत्र विखुरलेल्या मराठी भाषिकांसाठी आनंद व अभिमानाची बरसात करणारे ठरले. याचे कारण म्हणजे ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारने आपल्या प्राचीन व समृद्ध अशा मराठी भाषेला 'अभिजात' भाषेचा दर्जा देऊन तिचा जो यथोचित गौरव केला, त्यामुळे समस्त मराठी बांधवांची मान अभिमानाने उंचावली गेली असे असले तरी काही दु:खद प्रसंगांनाही आपल्याला सामोरे जावे लागले. टाटा समुहाचे माजी अध्यक्ष रतन टाटा, गझल गायक पंकज उधास, तबला वादक झाकिर हुसेन, भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग आदी अनमोल हिरे काळाच्या पडाआड गेले.

कला, क्रिडा, संशोधन आदी क्षेत्रांत महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक यांनी केलल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या दृष्टीनेही यंदाचे वर्ष संस्मरणीय ठरले. हर्षल गांवड (पोलीस दल), साहील शिरवले (महाराष्ट्र सुरक्षा दल), किर्ती ठाकूर (रायगड पोलीस), पूर्वा राजे (सी.ए.) या विद्यार्थ्यांनी त्यांच्या कर्तृत्वाने महाविद्यालयाचा लौकिक वाढीस लावला. यात प्राध्यापक मंडळींनीही आपली वेगळी छाप उमटवलेली दिसते. महाविद्यालयातील अनेक प्राध्यापकांची अभ्यासमंडळावर झालेली नियुक्ती, त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीसाठी त्यांना मिळालेले विविध पुरस्कार, विविध चर्चासत्रे, कार्यशाळा यांत त्यांनी केलेले महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व आदी बाबी महाविद्यालयाची मान उंचावणाऱ्या आहेत.

यंदा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – NEP मुळे प्राध्यापक, विद्यार्थी यांच्यात थोडीशी संभ्रमाची स्थिती असली तरी महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक यांनी वेळोवेळी त्याचा सखोल अभ्यास करून ही नवीन शिक्षण प्रणाली समजून घेतली आणि आपण यशस्वीरीत्या हे नवं शैक्षणिक धोरण आपल्या महाविद्यालयात राबवित आहोत, ही निश्चितच समाधानाची बाब आहे. याखेरीज राष्ट्रीय सेवा योजना, डी. एल. एल. ई युनीट क्रीडा, सास्कृतिक

विभाग तसेच कला, विज्ञान, वाणिज्य शाखा, ग्रंथालय विभाग यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतली जाणरी मेहनत कौतुकास्पद आहेत.

नवनवीन आव्हानांना सामोरे जाणारी आजची २१ व्या शतकातील युवा पिढी व्हॉटस्-अप, फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम आदी समाजमाध्यमांतून कधी अति उत्साही, कधी संमजस, संयत तर कधी प्रक्षोभक प्रतिक्रिया व्यक्त करताना आसपासच्या वास्तवाला भिडू पाहत आहे. अर्थातच दीर्घ, चिंतनशील विचारांकडे सध्याच्या विद्यार्थ्यांचा फारसा कल दिसत नाही, हे इथे नमुद करावेसे वाटते.

असे असले तरी, सन २०२४-२५ च्या 'प्रतिबिंब' या वार्षिकांकात ललित, वैचारिक, माहितीपर, विनोदी, काव्यात्मक असे विविधांगी साहित्य वाचकांना वाचायला मिळेल. यातून विद्यार्थ्यांचे अंतरंग प्रकट झालेले असल्याने वाचक 'प्रतिबिंब' या वार्षिकांकाचे स्वागत नक्कीच करतील, अशी अपेक्षा आहे.

सदर वार्षिकांक तयार करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्याचसोबत 'प्रतिबिंब' वार्षिक अंकाच्या समितीमधील माझे सर्व सहकारी डॉ. व्ही. एन. गुम्मा, प्रा. सदानंद चिटणीस, प्रा. एस. ए. धुमाळ, मुद्रित शोधनासाठी मदत करणाऱ्या माझ्या सर्व सहकारी प्राध्यापकांचे, टंकलेखनासाठी मदत करणाऱ्या सौ. आदिती गोडिवले व सौ. कविता देशपांडे तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मन:पूर्वक आभार! तसेच तांत्रिक सहाय्य करणाऱ्या प्रा.राधिका गोंधळी यांचे विशेष आभार !

**धन्यवाद ...!**

**डॉ. सौ. यु. ए. खाडिलकर**

**संपादक**

# अनुक्रमणिका


| क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ०१ | शिक्षक कर्तृत्व | 1 ते 3 |
| ०२ | गुणवंत विद्यार्थी | 4 ते 13 |
| ०३ | वार्षिक स्नेहसंमेलन व रिदम क्षणचित्रे | 14 ते 20 |
| ०४ | अहवाल विभाग | 21 ते 44 |
| ०५ | महाविद्यालयातील विविध कार्यक्रम व उपक्रम यांची क्षणचित्रे | 45 ते 59 |
| ०६ | मराठी साहित्य | 60 ते 96 |
| ०७ | हिंदी साहित्य | 97 ते 101 |
| ०८ | इंग्रजी साहित्य | 102 ते 104 |
| ०९ | आम्हाला तुमचा सार्थ अभिमान | 105 ते 111 |
| १० | वृत्तपत्रात नेने महाविद्यालय | 112 ते 120 |
| ११ | आपले महाविद्यालय क्षणचित्रांत | 121 ते 126 |

# शिक्षक कर्तृत्व विभाग

**कवी प्रा.डॉ.देवीदास क.बामणे 'संघर्ष'**
**हिंदी विभाग प्रमुख**

डॉ. देवीदास क. बामणे 'संघर्ष' के शैक्षणिक वर्ष २०२४-२५ में प्राप्त पुरस्कार और सम्मान -

१. के.बी.हिंदी सेवा न्यास (पंजी) बिसौली, बदायू से हिंदी भाषा के विकास, उन्नयन, संरक्षण, संवर्द्धन, न्यास के गतिविधियों के समुचित संचालन हेतु अप्रतिम योगदान हेतु १९ नवम्बर २०२४ को के.बी.सी. स्मृती 'हिंदी सेवी सम्मान' देकर गौरवान्वित किया है।

२. प्रा. डॉ. बनराम गुप्ता और डॉ. अमित कुमार गुप्ता के संपादित किताब कल्पना लालजी के साहित्य में गिरमिटिया महाकाव्य मॉरिशस के विशेष संदर्भ में मेरा मॉरिशस के हिंदी साहित्य का विकास कल्पना लालजी का योगदान यह आलेख २०२४ में प्रकाशित हुआ है। यह किताब ISBN:978-978707-5-0 नबंर से वान्या पब्लिकेशंस कानपुर से प्रकाशित हुआ है।

३. विश्व स्नेह समाज युवा विशेष अंक अन्तरराष्ट्रीय युवा दिवस के उपलक्ष्य में फरवरी २०२५ में प्रकाशित पत्रीका में मेरी तोताराम लघुकथा प्रकाशित हुआ है।

४. दिनांक १० और १२ जनवरी २०२५ को स.का.पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय मालवण में 'महाराष्ट्र हिंदी परिषद' का हिंदी नाट्य साहित्य:विविध परिदृश्य इस विषय पर आलेख विषय पर आलेख प्रकाशित हुआ है। यह पत्रिका Akshara Multidisciplinary Research Journal- E-Peer-Revewed & Refereed International Research Journal January 2025 Special Issue 15 Volume VI (A) नंबर से प्रकाशित हुआ है।

५. ज्ञानवर्धिनी ट्रस्ट संचालित सोनुभाऊ बसवंत कला एवं वाणिज्य महाविद्यालय शाहपुर जि. ठाणे क हिंदी विभाग द्वारा अंतरांष्ट्रीय संगोष्ठी डिजिटल युग में बौध्दिक संपदा अधिकार के माध्यम से भारतीय ज्ञान प्रणाली का संरक्षण और संवर्धन इस विषय के अंतर्गत स्वामी विवेकानंद के विचार : भारतीय ज्ञान परम्परा विषय पर मेरा आलेख प्रकाशित हुआ। यह पत्रिका Akshara Multidisciplinary Research Journal- EISSN - 2582-2429/ SJIF Impact-5,711/March 2025

६. परस काव्य कला जनजागृती संस्था, नई मुंबई से राज्यस्तरीय काव्यलेखन प्रतियोगिता और शैक्षणिक, हिंदी प्रचार- प्रसार में उल्लेखनीय कार्य के वजह से राज्यस्तरीय उपन्यास सम्राट प्रेमचंद पुरस्कार २०२४ दिनांक १८-१२-२०२४ को प्राप्त हुआ।

७. दिनांक ११ जनवरी २०२५ को 'महाराष्ट्र हिंदी परिषद' के पंचवार्षिक चुनाव में 'संयुक्त सचिव' के पद पर पॉच वर्ष के लिए मेरी मेरी नियुक्त हुआ है।

८. दिनांक १३ जनवरी २०२५ को ‘मराठी साहित्य मंडल पेण’ के अध्यक्ष के पद पर पाँच वर्ष के लिए मेरी मेरी नियुक्त हुआ है।

९. दिनांक १२ जनवरी २०२५ को महाराष्ट्र पत्रकार राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई आयोजित ‘पेण पत्रकार संघ’ से मुझे ट्रॉफी देकर सम्मानित किया।

१०.महाराष्ट्र पत्रकार संघ मुंबई, के प्रथम वर्धापनदिन के कार्यक्रम में दि. १३ अप्रैल २०२५को ‘राज्य शिक्षक पुरस्कार’ प्राप्त हुआ।

प्रा.डॉ.अरूण पाटील

भूगोल विभाग प्रमुख,

भाऊसाहेब नेने महाविद्यालय पेण - रायगड.

❖ As a chief Guest and drdiverd a lecture on Population Problems and opportunities on World population day organised by Dr.P.K. kadam college, Pen, district Raigarh on 11th July 2024

❖ Organized a one day Map exhibition on the occasion of National Geography day 14.1.2025 by department of Geography Bhausaheb Nene ASC college Pen Dist Raigad

❖ Participated and presented a research paper in a National conference organised by Mangaon Shikshan Prasarak Mandal’s D.G.Tatkare Mahavidyalay Mangaon Dist.-Raigad In association with The Bombay Geographical Association, Mumbai On March 22,2025

❖ Participated in ONE DAY DISTRICT LEVEL SEMINAR AND EXHIBITION ON INTRODUCTION TO DRONE: JOB OPPORTUNITIES" organized by Mangaon Shikshan Prasarak Mandal's D. G. Tatkare Mahavidyalay, Mangaon, District-Raigad, In Collaboration with UAV Academy Panvel on Friday, 28 February 2025

# गुणवंत विद्यार्थी विभाग

# शैक्षणिक वर्ष २०२४– २५

# गुणवंत विद्यार्थी ( पदवी/पदव्युत्तर )

## T.Y.B.A (History)

| Sr. No. | Photo | Name of Student | CGPI | Grade |
|---|---|---|---|---|
| 1. |  | Mhatre Samiksha Sunil | 7.83 | $A^+$ |
| 2. |  | Pingala Bhagwan Ambaji | 7.67 | $B^+$ |
| 3. |  | Pingala Raju Rama | 5.17 | B |

# T.Y.B.A (Marathi)

| Sr. No. | Photo | Name of Student | CGPI | Grade |
|---|---|---|---|---|
| 1. |  | Mhatre Prarthi Ganesh | 9.43 | A+ |
| 2. |  | Patil Dipika Samadhan | 9.02 | A+ |
| 3. |  | Chaudhari Karan Gopal | 8.56 | A |

# T.Y.B.A (Hindi)

| Sr. No. | Photo | Name of Student | CGPI | Grade |
|---|---|---|---|---|
| 1. |  | Patil Sejal Bharat | 7.78 | B+ |
| 2. |  | Mokal Sakshi Mahesh | 7.58 | B+ |
| 3. |  | Patil Sainath Mahendra | 7.11 | B+ |

# T.Y. B.Com.

| Sr. No. | Photo | Name of Student | CGPI | Grade |
|---|---|---|---|---|
| 1. |  | Shrivastav Priyanshi Praveen | 10 | O |
| 2. |  | Tandel Pratiksha Vijay | 8.97 | A |
| 3. |  | Patil Aaditi Surendra | 8.85 | A |

# M.Com. Part -II

| Sr. No. | Photo | Name of Student | CGPI | Grade |
|---|---|---|---|---|
| 1. |  | Mhatre Sakshi Vivek | 8.75 | A+ |
| 2. |  | Bhosale Komal Sudhakar | 7.63 | A |
| 3. |  | Deo Atharva Avinash | 7.50 | A |

# T.Y. B.Sc.

| Sr. No. | Photo | Name of Student | CGPI | Grade |
|---|---|---|---|---|
| 1. |  | Patil Hemangi Gajanan | 9.08 | A+ |
| 2. |  | Gavand Lalita Devram | 8.00 | A+ |
| 3. |  | Warang Anjali Atul | 7.98 | B + |

# M. Sc. Part- II Organic Chemistry

| Sr. No. | Photo | Name of Student | CGPI | Grade |
|---|---|---|---|---|
| 1. |  | Aait Ruchita Ramesh | 9.75 | O + |
| 2. |  | Mhatre Ketaki Sharad | 9.06 | A+ |
| 3. |  | Patil Sayali Sanjay | 8.58 | A+ |
| 4. |  | Kamath Akanksha Rajan | 8.58 | A+ |

# T.Y. B.Sc. (CS)

| Sr. No. | Photo | Name of Student | CGPI | Grade |
|---|---|---|---|---|
| 1. |  | Sonavane Tejas Chandrakant | 9.23 | A+ |
| 2. |  | Amavkar Amey Sudhakar | 8.86 | A |
| 3. |  | Thakur Bhavesh Devidas | 8.74 | A |

# First Year

| Sr. No. | Photo | Name of Student | Class | Avg. of CGPI |
| --- | --- | --- | --- | --- |
| 1. |  | Jadhav Snehal Sunil | F.Y.B.A. | 9.29 |
| 2. |  | Tandel Akshata Vithoba | F.Y.B.com | 9.78 |
| 3. |  | Thakur Gunjakumari Shashikant | F.Y.B.sc | 9.10 |
| 4. |  | Deshpande Srushti Shitalchandra | F.Y.B.sc Computer Science | 9.25 |

# Second Year

| Sr. No. | Photo | Name of Student | Class | Avg. of CGPI |
|---|---|---|---|---|
| 1. |  | Ghosalkar Atharv Kiran | S.Y.B.A. | 8.80 |
| 2. |  | Yevale Payal Bharat | S.Y.B.com | 9.94 |
| 3. |  | Deo Ashutosh Avinash | S.Y.B.sc | 9.59 |
| 4. |  | Khot Shifa Mangesh | S.Y.B.sc Computer Science | 9.90 |

## —: महाविद्यालयातील ग्रंथालय विभागातर्फे 'सर्वोत्कृष्ट वाचक' म्हणून देण्यात आलेली पारितोषिके :—

## STAR USER AWDS 203-24

| Sr. No. | Photo | Name of Student | Class/Books | Rank |
|---|---|---|---|---|
| 1. |  | Dipika Samadhan Patil | T.Y.B.A Marathi (77 Books ) | 1st Rank |
| 2. |  | Prachiti Patil | S.Y.Bsc (75 Books) | 2nd Rank |
| 3. |  | Tandel Akshata Vithoba | F.Y.B.com (63 Books ) | 3rd Rank |

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातर्फे हार्दिक अभिनंदन



# वार्षिक स्नेहसंमेलन व रिदम क्षणचित्रे

# वार्षिक स्नेहसंमेलन 'रिदम' —२०२४ ची क्षणचित्रे

दिपप्रज्वलन करताना मान्यवर ……




स्नेहसंमेलनासाठी उपस्थित प्रमुख पाहुणे **श्री. राजन पांचाळ** यांचे स्वागत करताना पे.ए. सो.चे अध्यक्ष **ॲड. श्री. मंगेश वि. नेने.**



स्नेहसंमेलन 'रिदम'साठी उपस्थित अतिथी श्री. राजन पांचाळ यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ.एस.बी.धारप




मनोगत व्यक्त करताना पे.ए.सो.चे अध्यक्ष ॲड.मंगेश नेने



प्रास्ताविक करताना प्राचार्य – डॉ. एस.बी.धारप




विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना अतिथी श्री.राजन पांचाळ ....



स्नेहसंमेलन ‘रिदम’ चे प्रमुख प्रा.पी.डी.पाटील मनोगत व्यक्त करताना.......




वार्षिक स्नेहसंमेलन ‘रिदम’ मध्ये विद्यार्थी आपली कला सादर करताना.......






वार्षिक स्नेहसंम्मेलन रिदम –पारितोषिक वितरण


पेण एज्युकेशन सोसायटीचे
2024





महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांच्या समवेत

महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद...







महाविद्यालयाच्या प्राचार्यांसमवेत महाविद्यालयातील

शिक्षकेतर कर्मचारी....

# अहवाल विभाग



# मराठी विभाग अहवाल

**मुं**बई विद्यापीठातर्फे एप्रिल २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या तृतीय वर्ष कला शाखेच्या परीक्षेत मराठी विभागाचा निकाल ८५.८९% टक्के लागला. आनंदाची गोष्ट अशी की, सन २०२३ – २४ या शैक्षणिक वर्षात टी.वाय.बी.ए.मराठी विषयासाठी १४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यात ०९ विद्यार्थिनी आणि ०५ विद्यार्थी होते. पैकी १२ विद्यार्थी उतीर्ण झाले तर १ विद्यार्थिनी अनुतीर्ण,१ अनुपस्थित.

प्रार्थी म्हात्रे ही 'अ' श्रेणीमध्ये ( ९.४३ CGPA ) महाविद्यालयात कला शाखेत प्रथम आली. तर दिपीका पाटील 'अ' श्रेणीमध्ये ( ९.०२ CGPA ) करण चौधरी 'अ' श्रेणीमध्ये ( ८.५६ CGPA ) टी.वाय.बी.ए.च्या परीक्षेत उत्तीर्ण झाले.

सन २०२४ -२५ या शैक्षणिक वर्षातील टी.वाय.बी.ए.मराठी विभागात एकूण १८ विद्यार्थ्यांना प्रवेश घेतला.त्यात १६ विद्यार्थिनी व ०२ विद्यार्थी आहेत.

प्रथम, द्वितीय,तृतीय वर्षाच्या मराठी विषयासाठी डॉ.नामदेव पाटील प्रा.सुप्रिया धुमाळ प्रा. राधिका गोधळी, प्रा विजया ठाकूर यांची तासिका तत्वावर सहाय्यक प्राध्यापक म्हणून नेमणूक करण्यात आली. यांच्यावर मराठी विषयांच्या अध्यापनाची संपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली. व त्या – त्या प्राध्यापकांनी आपापली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडली.

शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीलाच मराठी विभागाकडून: मराठी वाङ:मय मंडळ निर्माण करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध कार्यक्रम, उपक्रमांचे आयोजन वर्षभर करण्यात आले.

महाविद्यालयात १ जानेवारी ते १५ जानेवारी दरम्यान ग्रंथालय विभाग व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ' वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमा अंतर्गत पुस्तक परीक्षण व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

त्याचबरोबर दिनांक १४ ते २८ जानेवारी २०२५ या कालावधीत मराठी 'भाषा संवर्धन पंधरवडा ' विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला...

२७ फेब्रुवारी २०२५ रोजी 'कवी कुसुमाग्रज ' यांचा जन्मदिन 'मराठी भाषा गौरव दिन ' म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी माननीय श्री.श्याम जोशी यांचे 'अभिजात मराठी' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य, सर्व सहकारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मराठी विभागासाठी जे सहकार्य केले त्याबद्दल मराठी विभाग सर्वांचा ऋणी आहे.

# मराठी वाङ्मय मंडळ अहवाल

**शै**क्षणिक वर्ष २०२४-२५ अंतर्गत महाविद्यालयातील मराठी वाड:मय मंडळातर्फे विद्यार्थ्यांना मराठी भाषेच्या समृद्धीचा परिचय व्हावा,त्याचे मराठी भाषेचे ज्ञान वाढीस लागावे. म्हणून विविध माहितीपूर्ण उपक्रमांचे आयोजन केले गेले.

याची सुरूवात २४ ऑगस्ट २०२४रोजी कवियत्री बहिणाबाई चौधरी यांच्या जयंतीचे औचित्य साधून झाली. यानिमित्ताने विद्यार्थ्यांच्या कल्पकतेतून साकार झालेल्या 'काव्यगंध' या भित्तिपत्रकाचे अनावरण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदानंद धारप यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच याप्रसंगी काव्यवाचन स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. त्यास विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद लाभला. भारताचे माजी राष्ट्रपती आणि जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ.ए.पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी वाचू आनंदे उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या अंतर्गत विद्यार्थ्यांनी सकाळी ८.— १० या वेळात ग्रंथालयाच्या वाचन कक्षात बसून वाचनाचा आनंद लुटला.

१४ जाने ते २८ जाने हा कालावधी ' मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' म्हणून मोठया उत्साहत साजरा केला गेला.

सदर पंधरवडयाचा उद्‌घाटन समारंभ बुधवार दि.१५ जानेवारी रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदानंद धारप यांच्या शुभहस्ते पार पडला.यावेळी प्राचार्य डॉ.सदानंद धारप यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल समस्त मराठी भाषिकांचे अभिनंदन करत मराठी भाषेचे वैभव जोपासण्याचे व वृद्धिंगत करण्यासाठी कायम प्रयत्नशील राहण्याचे आवाहन उपस्थितांना केले.

सदर पंधरवड्याअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान, माहितीपट, अभिवाचन, आठवणीतल्या कवितांचे सादरीकरण, कर्तृत्ववान मराठी भाषिकांची मुलाखत, बोला मराठीत, प्रश्नमंजुषा आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धांना विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद लाभला.

मराठी विभाग आणि मराठी वाड:मय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार दि. २७ फेब्रुवारी रोजी कवीश्रेष्ठ कुसुमाग्रजांचा जन्मदिवस अर्थात 'मराठी भाषा गौरव दिन' मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.यानिमित्ताने बदलापूर येथील 'ग्रंथसखा' या ग्रंथलयांचे निर्माते, जवळपास ४ लाख पुस्तकांचे संग्राहक श्री.श्याम जोशी यांच्या 'अभिजात मराठी' या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन केले गेले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी उपस्थितांना मराठी भाषा गौरव दिनांच्या शुभेच्छा देत मराठी साहित्यातील कुसुमाग्रजांच्या अमूल्य योगदानाबद्दल त्यांच्याप्रती ऋण व्यक्त केले. प्राचार्यांनी मराठी भाषेचा महानता उद्धृत करताना मराठी ही इतकी समृद्ध आहे की, आपण तिचा गौरव करण्यास थिटे आहोत, अशा शब्दांत मराठी भाषेचा गौरव केला आपल्या भाषेबाबतचा आग्रह आक्रस्ताळेपणात परिवर्तीत होऊ नये.याचीही काळजी घेण्याचे आवाहन त्यांनी उपस्थिनांना केले.यानंतर प्रमुख वक्ते श्री.श्याम जोशी यांनी 'अभिजात मराठी' या विषयावर बोलताना अभिजात शब्दाचा अर्थ समजावून सांगत अभिजात मराठी भाषेची समृद्धी तिची प्राचीनता विविध उदाहरणांतून श्रोत्यांना उलगडून दाखविली. यानंतर वर्षभरात विद्यार्थ्यांसाठी मराठी विभागातर्फे ज्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या, त्यातील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यिात आले.

या सर्व उपक्रमांसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदानंद धारप यांचे मोलाचे मार्गदर्शन, प्रोत्साहन लाभले. तसेच मराठी विभागातील सर्व श्मिहाविद्यालयातील सर्व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

त्यासाठी मराठी विभाग सर्वांचा ऋणी आहे.

# इतिहास विभाग अहवाल

प्रा. मेटलैड यांच्या मते इतिहास ही एक वैचारिक प्रक्रिया असून या प्रक्रियेमध्ये माणसाला स्वत:च्या मनाचे प्रतिबिंब दिसत असते. इतिहासाची अशी व्याख्या होत असताना लिओपोल्ड रॅन्क यांनी इतिहासाला शास्त्रीय बैठक प्राप्त करून दिली. आणि 'शास्त्र म्हणून इतिहासाला मान्यता मिळाली. तर अशा इतिहास विषयाची व्याप्ती मोठी असून इतिहास समाजाच्या सर्व अंगाशी निगडित आहे. म्हणूनच अगदी प्राथमिक स्तरापासून ते पदव्युतर स्तरापर्यंत इतिहास विषय शिकवला जाऊ लागला. मानवी जीवनाच्या वाटचालीचा समग्र,सर्वव्यापी आलेख म्हणजे इतिहास होय. यावरून इतिहासाची महती लक्षात येते. कला शाखेची संबधित असणारा हा विषय विद्यार्थ्यांना भारताबरोबरच जगाच्या इतिहासाची सुद्धा ओळख करून देतो.परीक्षेसाठी या सगळया ज्ञानाचा निश्चितच उपयोग होतो.

आपल्या महाविद्यालयातील इतिहास विभाग हा कार्यक्षम विभाग आहे. शै.वर्ष २०२४-२५ मध्ये एकुण १९ विद्यार्थ्यानी इतिहास विषयासाठी प्रवेश घेतला आहे. इतिहास विभागाची विद्यार्थ्यानी कु. समिक्षा पाटील हिची मुंबई पोलिस दलात झालेली निवड विभागासाठी आणि महाविद्यालयासाठी अभिमानास्पद ठरली.

नेमलेल्या अभ्यासक्रमासोबतच विद्यार्थ्यांना इतिहास विषयाचा सर्वांगीण परिचय व्हावा इतिहासचे बारकावे.त्यांना कळावेत आणि विद्यार्थ्यांमध्ये इतिहास विषयाची आवड निर्माण होऊन इतिहास हा त्यांच्यासाठी संशोधनाचा विषय व्हावा, यासाठी विभागामार्फत विविध कृतीशील माहितीपूर्वक उपक्रम राबवले जातात. याचाच एक भाग म्हणजे दरवर्षी इतिहास विभागा तर्फे शिवराज्याभिषेक दिन मोठया उत्ससहात साजरा केला जातो.यंदाही ६ जून २०२४ रोजी छ. शिवाजी महाराजांच्या ३५१ व्या राज्याभिषेक दिनांचे औचित्य साधून एलफिस्टन महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख व अभ्यासक डॉ.भावना पाटोळे यांच्या आभासी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.या व्याख्यानातून डॉ.भावना पाटोळे यांनी सुराज्यकर्ते शिवाजी राजे यांचे राज्य, रयत व प्रशासनासंदर्भात असलेले द्रष्टेपण विविध उदाहरणांच्या माध्यमातून श्रोत्यांना उलगडून सांगितले.

२६ जून २०२४ रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. या निमित्ताने महाराजांच्या कार्यकतृत्वावर आधारित दाखवून रयतेचा राजा असलेला छ.शाहू महाराजांचा संपूर्ण जीवनपट विद्याथ्यासमोर उलगडण्यात आला.

१४ ऑगस्ट रोजी विभागातर्फे विभाजन विभीषिका स्मृती दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने विद्यार्थ्यांना भारत – पाकिस्तान फाळणीमागील इतिहास समजावून सांगणाऱ्या माहितीपटाचे सादरीकरण करण्यात आले.

इतिहास विषयातील करिअरच्या विविध संधींचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा आणि त्यांनी इतिहास विषयातून अर्थार्जनाच्या नवनव्या वाटा चोखाळाव्यात. यासाठी ८ ऑक्टोबर २०२५ रोजी पुरातत्व शास्त्र या विषयावर पी.एच.डी करणाऱ्या समृद्धी योगी या तरूण व्याख्यातीच्या पुरातत्व शास्त्र आणि करिअरच्या संधी या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होत. यावेळी समृद्धी यांनी विद्यार्थ्यासोबत मनमोकळा संवाद साधत विद्यार्थ्याच्या शंकाचे समाधान केले.

इतिहास विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात करण्यात आली. यानिमित्ताने १९ फेब्रुवारी रोजी सुट्टीअसल्याने १८ फेब्रुवारी रोजी विद्यार्थ्यासाठी ' आम्हाला कळलेले शिवाजी महाराज' विषयांतर्गत 'रयतेचा राजा' 'भारतीय आरमाराचे जनक',

'गडकोटसंवर्धन' आदी विषयांवर आधारित वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात होते. सदर स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. विजेत्या विद्यार्थ्यांना विभागातर्फे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

अशा विविध उपक्रमांसोबतंच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख उंचावण्यासाठी देखील विभागाकडून सातत्याने प्रयत्न केले जातात.याचेच फलित म्हणजे मुबंई विद्यापीठातर्फे एप्रिल २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या तृतीय वर्ष कला शाखेच्या परीक्षेत इतिहास विभागाचा निकाल ६०% टक्के लागला. आनंदाची गोष्ट अशी की सन २०२३- २४ या शैक्षणिक वर्षात टी.वाय.बी.ए इहिहास विषयासाठी ७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता.त्यात ०४ विद्यार्थिनी आणि ०३ विद्यार्थी होते.यापैकी ०४ विद्यार्थी उतीर्ण झाले तर १ विद्यार्थिनी अनुतीर्ण, २ अनुपस्थित होते. समिक्षा म्हात्रे ही 'अ' श्रेणीमध्ये (7.91 CGPA ) पिंगळा भगवान अंबाजी (7.67 CGPA ) पिंगळा राजु राम (5.17 CGPA ) हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

सन २०२४ – २५ या शैक्षणिक वर्षात टी.वाय बी.ए इतिहास विभागात एकूण १७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. त्यात ७ विद्यार्थिनी व १० विद्यार्थी आहेत. विभागाचा शैक्षणिक आलेख उंचावण्यासाठी तसेच विविध उपक्रमांसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.धारप इतिहास विभागाचे प्रा.डॉ.यु.ए.खाडिलकर,प्रा.डॉ.टी.डी.माळवे तसेच इतिहासप्रेमी विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान लाभले.

**-प्रा.डॉ.यु.ए.खाडिलकर**
**इतिहास विभाग प्रमुख**

# सांस्कृतिक समिती अहवाल २०२४-२५

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने सांस्कृतिक समितीतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करण्यासोबतच त्यांच्या अंगी असणाऱ्या विविध कलागुणांची जोपासना व्हीवी. हा उद्देश साध्य करण्यसाठी प्रयत्न केले जातात.

यावर्षी अशा कार्यक्रमांची सुरूवात ०६ जुलै २०२४ रोजी 'महाकवी कालिदास दिन' साजरा करून झाली यानिमित्ताने 'पार्कातल्या कविता' या बहारदार कवितांच्या मैफिलींचे आयोजन करण्यात आले होते. सदर मैफिलीसाठी कवी विजय उतेकर,महेश देशपांडे, सदानंद बेंद्रे, स्वरूपा सामंत या कवींनी विविधकवितांचे वाचन केले.

दि.०१ ऑगस्ट २०२४ रोजी डॉ.नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालय, गोवे - कोलाड येथे मुंबई विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या युथ फेस्टिवलसाठी महाविद्यालयातील ४ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

दि.२२ ऑगस्ट २०२४ रोजी भाऊसाहेब नेने व्याख्यानमालेचे १४ वे पुष्प गुंफण्यात आले. या प्रसंगी प्रसिद्ध उदयोजक श्री.राजेश मंडलिक यांच्या 'शिक्षण आणि उदयोग व्यवसाय' या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

दरवर्षी प्रमाणे शारदीय नवरात्रोत्सव व्याख्यानमालेचे आयोजन दि.०३/१०/२०२४ आणि १०/१०/२०२४ रोजी करण्यात आले होते. याव्याख्यानमालेत आपल्याच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर व्याख्याने दिली.

| अ.क्र. | दिनांक | विषय |
|---|---|---|
| १ | ०३/१०/२०२४<br>गुरूवार | कवितेतून गाण्याकडे<br>प्रा.श्री.विनायक पवार |
| २ | ०४/१०/२०२४<br>शुक्रवार | वक्तृत्व : कला आणि शास्त्र<br>डॉ.चैतन्य साठे |
| ३ | ०५/१०/२०२४<br>शनिवार | मैत्र जिवाचे<br>श्री.विनायक गोखले |
| ४ | ०७/१०/२०२४<br>सोमवार | सोशल मीडीया आणि आजची तरूणाई<br>डॉ.नामदेव पाटील |
| ५ | ०८/१०/२०२४<br>मंगळवार | ब्वउचनजमत छमजूवतापदह —ए<br>साक्षी पाटील |
| ६ | ०९/१०/२०२४<br>बुधवार | ब्वतचवतंजम ळतववउपदह . झकिरा अखवारे<br>हे माणसा... — पंकज शिंदे |
| ७ | १०/१०/२०२४<br>गुरूवार | करिअर गाईडन्स — सुहास पाटील |

महाविद्यालयाच्या जीवनातील कलात्मक रंग उलगडून दाखविणारा एक सोहळा म्हणजे महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन आणि वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ होय. यावर्षी रिदम २०२४ या नावाने दि.२४ डिसेंबर २०२४ रोजी हा सोहळा साजरा करण्यात आला. या समारंभासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध सिनेअभिनेते,लेखक, दिग्दर्शक श्री.राजन पांचाळ

यांची उपस्थिती आनंददायी ठरली. दुपराच्या सत्रात विद्यार्थ्यांनी आपल्या अंगभूत कलागुणांचा परिचय देत मनोरंजनाच्या कार्यक्रमांचे सादरीकरण केले. या सोहळयाच्या निमित्ताने झालेल्या क्रिडास्पर्धा, विविध डे, शेला पागोटे इ. कार्यक्रमांनी विद्यार्थ्यांच्या आयुष्यात उत्तम रंगाचे रंग भरले.

'संविधान गौरव महोत्सवा' निमित्त सांस्कृतिक विभागातर्फे सोमवार दि. २४ फेब्रुवारी २०२५ प्रा. डॉ.हेमलता सावंत यांच्या 'भारतीय संविधानाचे महत्व' या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

सांस्कृतिक समितीतर्फे घेण्यात आलेल्या कार्यक्रमांसाठी पेण एज्युकेशन सोसायटीच्या सन्माननीय व्यवस्थापन मंडळाच्या सदस्यांनी बहुमोल सहकार्य आणि मार्गदर्शन केले तसेच मा. प्राचार्य डॉ. एस.बी .धारप सर व सांस्कृतिक समितीतील सदस्य प्रा.बी.एम शिकारे, प्रा.सौ.एस.एस.पितळे, प्रा.डॉ.डी.के बामणे ,प्रा.डॉ.नामदेव पाटील, प्रा.साक्षी पाटील,प्रा.एस.ए धुमाळ ,प्रा.आर. आर. गोधळी यांनी केलेल्या सहकार्यामुळे आणि शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी वर्गाने केलेल्या मदतीमुळेच सर्व कार्यक्रम व्यवस्थित पणे पार पाडणे शक्य झाले. सर्वांनीच दिलेल्या सहकार्याची आठवण ठेवून सांस्कृतिक समितीचा अहवाल पूर्ण करतो.

**-प्रा.पी.डी.पाटील**
**सांस्कृतिक विभाग प्रमुख**

# हिंदी विभाग और हिंदी अनुवाद प्रमाण-पत्र कोर्स अहवाल

महाविद्यालय में हिंदी विभाग की स्थापना १९९० में हुई। सन १९९० से लेकर आज तक ' हिंदी विभाग ' का स्नातक स्तर पर अध्ययन – अध्यापन सुचारू रूप से जारी है । मुंबई विश्वविद्यालय द्वारा आयोजित अप्रैल २०२४ में स्थानक तृतीय वर्ष ( कला) परीक्षा में हिंदी विभाग का परिणाम( रिजल्ट) ८४.६१% प्रतिशत रहा। इस परीक्षा में प्रथम क्रमांक कु.सेजल भरत पाटील B+ श्रेणी ( ७.७८) द्वितीय क्रमांक कु.मोकल साक्षी महेश B+ श्रेणी ( ७.५८) और कु.पाटील साईनाथ महेद्र B+ श्रेणी ( ७.११) तृतीय क्रमांक प्राप्त किया ।

हमारे महाविद्यालय में २०१८ से 'हिंदी अनुवाद प्रमाण – पत्र कोर्स' शुरू है, इस वर्ष २०२३- २४ में ११ छात्रों ने प्रवेश लिया था, इनमें से ०८ छात्रों ने परीक्षा दी। ०८ छात्रो में से ०४ छात्र (O श्रेणी) और ०४ छात्र ($A^+$ श्रेणी ) से पास हुए।

शैक्षणिक वर्ष २०२४- २५ में टी.वाय .बी.ए हिंदी के कक्षा में कुल १३ छात्र हैं ,इसमें ०९ छात्राएँ और ०४ छात्र है ।

हिंदी भाषा प्रचार – प्रसार एवं साहित्य का ज्ञान बढाने के हेतु छात्रों के समय - समय पर विभिन्न प्रतियोगिताओं का आयोजन किया जाता है। इस शैक्षणिक वर्ष २०२४- २५ में 'हिंदी विभाग ' और 'हिंदी अनुवाद प्रमाण —पत्र कोर्स' द्वारा अलग -अलग उपक्रमों का आयोजन किया गया था वह निम्नलिखित है-

दिनांक ३१/०७/२०२४ को हिंदी साहित्य के प्रसिद्ध कथाकार 'मुंशी प्रेमचंद' जी के जन्म शताब्दी के अवसर पर 'भाषण प्रतियोगिता' का आयोजन किया गया था। इस अवसर पर डॉ.एस.बी.धारप सर जी ने छात्रों को मार्गदर्शन किया ।

दिनांक ११/०८/२०२४ को हिंदी साहित्य के सुप्रसिद्ध कवि – गीतकार 'गोपाल सिंह नेपाली' जी की जयंती टी.वाय बी.ए हिंदी की कक्षा में मनाई गयी। इस अवसर पर डॉ.देवीदास क. बामणे 'संघर्ष' जी ने छात्रों को मार्गदर्शन किया।

दिनांक २३/०९/२०२४ को राष्ट्रकवि के रूप में उत्कृष्ट और लोकप्रिय कवि रामधरी सिंह 'दिनकर' जी के जन्म शताब्दी के अवसर पर देशभक्ति पर कविताओं का आयोजन किया गया था ।

दिनांक ०१/०९/२०२४ को हिंदी साहित्य में गजल विधा को प्रतिष्ठित करने वाले प्रसिद्ध रचनाकार 'दुष्यंत कुमार' जी की जयंती टी.वाय बी.ए हिंदी की कक्षा में मनाई गई।

दिनांक २१/०९/२०२४ को 'हिंदी विभाग ' और 'हिंदी अनुवाद प्रमाण पत्र कोर्स' के संयुक्त तत्ववधान में 'राष्ट्रभाषा हिंदी दिवस समारोह' का आयोजन किया गया था । इस अवसर पर मा. श्री.नितेश विश्वकर्मा ( बॅंक ऑफ महाराष्ट्र शाखा, पेण ) द्वारा 'बॅंकिग के क्षेत्र में हिंदी भाषा का महत्व' और 'रोजगार के अवसर' इस विषय पर व्याख्यान का आयोजन किया गया था । इस अवसर पर मुख्य अतिथी के करकमलों द्वारा छात्रों के द्वारा छात्रों के

तैयार किए गए 'दर्पण भितिपत्रिका' का विमोचन किया गया । इस अवसर पर काव्य पठन एंव शेर – ओ – शायरी प्रतियोगिता का आयोजन किया गया था। इसमें वरिष्ठ एवं कनिष्ठ महाविद्यालय में से कुल २० छात्रो ने स्वस्फूर्त प्रतिभाग लिया हुआ था।

दिनांक १५/१०/२०२४ को महाविद्यालय के 'हिंदी विभाग, मराठी विभाग और ग्रंथालय विभाग' के संयुक्त तत्वधान में भूतपूर्व राष्ट्रपति और महान वैनानिक 'डॉ.ए.पी. जे अब्दुल कलाम' जी की जयंती के उपलक्ष्य में छात्रो में वाचन संस्कृती ज्ञाविकसित करने के लिए 'वाचन प्रेरणा दिवस' मनाया गया । इस अवसर पर महाविद्यालय के प्राचार्य और डॉ. सदानंद धारप सर जी ने 'वाचन प्रेरणा दिन का महत्व' छात्रों को समझाया।

दिनांक २७/११/२०२५ को आधुनिक हिंदी साहित्य के सुप्रसिदध कवि,लेखक और अनुवादक 'डॉ.हरिवंशराय बच्चन' जी की जयंती टी.वाय.बी.ए हिंदी की कक्षा में मनाई गई । इस अवसर पर काव्य पठन प्रतियोगिता का आयोजन किया गया था ।

दिनांक १०/०१/२०२५ को महाविद्यालय के टी.वाय बी.ए हिंदी की कक्षा में 'विश्व हिंदी दिवस' मनाया गया। इस अवसर महाविद्यालय के प्राचार्य डॉ.एस.बी.धारप सर और प्रा. सुषमा खोत ने छात्रों को मार्गदर्शन किया ।

दिनांक २१/०२/२०२५ को, 'हिंदी विभाग, मराठी विभाग और डी.एल.एल.ई युनिट' एवं 'हिंदी अनुवाद प्रमाण पत्र कोस' के संयुक्त तत्ववधान में 'अंतर्राराष्ट्रीय मातृभाषा दिवस ' बडे हर्षोल्लास के साथ मनाया गया । इस अवसर पर प्रा.महेश भोपळे अध्याक्ष,हिंदी विभाग ( डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय, पेण) जी का 'अंतर्राराष्ट्रीय मातृभाषा' इस विषय पर व्याख्यान का आयोजन किया गया था।

प्रतिवर्ष 'हिंदी विभाग' के द्वारा छात्रों के मार्गदर्शन के लिए अतिथि व्याख्यानों का आयोजन किया जाता है। इस वर्ष डॉ.विश्वनाथ पटेकर ( अध्यक्ष, हिंदी विभाग महात्मा फूले, आर्ट्स सायन्य और कॉमर्स कॉलेज, पनवेल ) जी का शुक्रवार दिनांक २१ फरवरी, २०२५ को एस.वाय बी.ए हिंदी के छात्रो के लिए ' शकुतिका ' उपन्यास पर ऑनलाइन व्याख्यान का आयोजन किया गया था ।

महाराष्ट्र हिंदी परिषद के पंचवार्षिक चुनाव में ११ जनवरी, २०२५ को अध्यक्ष डॉ.देवीदास क. बामणे 'संघर्ष ' जी का पॉच वर्ष के लिए संयुक्त सचिव पद पर निर्विरोध नियुक्ति हुई।

'हिंदी विभाग और हिंदी अनुवाद प्रमाण – पत्र कोस' द्वारा आयोजित उपयुक्त सभी गतिविधियों के लिए संस्था के अध्यक्ष ॲड. मंगेश नेने सर, महाविद्यालय के प्राचार्य डॉ.सदानंद धारप सर और हिंदी विभागाध्यक्ष, डॉ.देवीदास क. बामणे 'संघर्ष ' जी का बहुमोल मार्गदर्शन और सहयोग प्राप्त हुआ है ।

**डॉ.देवीदास क. बामणे 'संघर्ष '**
**हिंदी विभाग**

# आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग (D.L.L.E. Unit) अहवाल

मुंबई विद्यापीठ मुंबई डी. एल. एल. ई. युनिट ची शाखा आपल्या महाविद्यालयात २०१३–१४ या वर्षापासून सुरू आहे. या युनिट मध्ये एकूण Career Project, Industry Orientation Project, Annapurna Yojana, Skill Development, Population Education Club, Survry Research, Education For adult; (EFA- NIOS, IDOL), Environment Education,Civic Sense, Consumer Guidance असे एकूण दहा प्रोजेक्ट आहेत, त्यापैकी आपल्या महाविद्यालयात या वर्षी एकूण दोन प्रोजेक्ट सुरू आहेत. त्यांची नावे अशी आहेत– करियर प्रोजेक्ट (CP) आणि पॉप्युलेशन एज्युकेशन क्लब (P.E.C.). सन २०२४–२०२५ या वर्षी 'आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग' युनिट मध्ये एकूण १११ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. या युनिटचा समन्वयक व रायगड जिल्हा समन्वयक डॉ. देवीदास क. बामणे हे आहेत. एकूण चार स्टुडंट मॅनेजर आहेत. या विभागाचे घोषवाक्य 'रिच टु अनरिच' हे आहे. या घोषवाक्यानुसार विद्यार्थ्यांचा आंतरिक विकास साधण्याचा प्रयत्न करताना समाजप्रती असलेल्या कर्तव्याची जाणीव व्हावी, म्हणून सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात या युनिट मार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले. याला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. मंगळवार दि. ०१/०७/२०२४ या दिवशी शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या वर्षाची प्रवेशाची नोटीस काढली.

१. गुरूवार दि. ११/०७/२०२४ या दिवशी महाविद्यालयात डी. एल. एल. ई. युनिट, सोबती ट्रस्ट. पेण व शासकीय हॉस्पीटल अलिबाग यांच्या संयुक्त विद्यामाने रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबीरात महाविद्यालयातील विद्यार्थी व पेण शहरातील नागरिकांनी भरपूर सहकार्य केले. आज रक्ताचे व रक्तदात्यांचे किती महत्व आहे विद्यार्थ्यांमध्ये व समाजामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी हा उपक्रम प्रत्येक वर्षी घेतला जातो.

२. बुधवार दि. ३१/०७/२०२४ रोजी 'हिन्दी विभाग व हिन्दी अनुवाद प्रमाण–पत्र कोर्स' तर्फे उपन्यास सम्राट 'प्रेमचंद जयंती' साजरी करण्यात आली, त्यानिमित्ताने वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. त्यात युनिटच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

३. सोमवार दि. १२ ऑगस्ट २०२४ रोजी युवा दिनानिमित्त स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. तसेच स्वरचित काव्य लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

४. मंगळवार दि. १३/०८/२०२४ रोजी 'हर घर तिरंगा' उक्रमांतर्गत देशाची शान असलेला 'तिरंगा' या युनिट मार्फत विद्यार्थ्यांना त्यांच्या घरावर लावण्यासाठी सांगण्यात आले. तसेच सामूहिक तिरंगा प्रतिज्ञा घेण्यात आली.

५. मंगळवार दि. १३/०८/२०२४ रोजी महाविद्यालय सभागृहात आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाची 'प्रथम सत्र ट्रेनिंग मिटिंग' घेण्यात आली. या मिटिंग मध्ये विद्यार्थ्यांचे ग्रुप बनवून प्रोजेक्टची माहिती डॉ. देवीदास क. बामणे 'संघर्ष' यांनी दिली. नंतर वर्षभरातील उपक्रमांचे नियोजन करण्यात आले.

६. शासनाच्या परिपत्रकानुसार या विभागाकडून बुधवार दि. १४ ऑगस्ट २०२४ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त 'तिरंगा रॅली' काढण्यात आली.

७. दि. १२ ते १५ ऑगस्ट २०२४ या दरम्यान काव्यलेखन स्पर्धा आभासी स्वरूपात घेण्यात आली.

८. गुरूवार दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ७.१५ वाजता महाविद्यालयाच्या ग्रांऊडवर झेंडावंदनासाठी या युनिटचे रायगड जिल्हा समन्वय डॉ. देवीदास क. बामणे, प्रा. मिनल थवई, प्रा. विजया ठाकूर व या युनिटचे विद्यार्थी उपस्थित होते.

९. बुधवार दि. ४ सप्टेंबर २०२४ रोजी विद्यापीठ स्तरावरील या युनिटाचे प्रथम सत्र ट्रेनिंग प्रोग्राम शेठ जे. एन. पालीवाला कॉलेज, पाली रायगड येथे घेण्यात आले. या ट्रेनिंग साठी जिल्हा समन्वय डॉ. देवीदास क. बामणे 'संघर्ष' स्टुडंट मॅनेजर गणेश जाधव व रसिका म्हात्रे उपस्थित होते. या ट्रेनिंग मध्ये डॉ. देवीदास क. बामणे 'संघर्ष' यांनी उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

१०. महाविद्यालयातील 'हिन्दी विभाग व हिन्दी अनुवाद अनुवाद प्रमाण—पत्र कोर्स' तर्फे ' हिन्दी प्रबोधन सप्ताह' निमित्ताने यंदाही हिंदी विभागातर्फे 'दर्पण' भित्तीपत्रिकेचे प्रकाशन शनिवार दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी मा. नितेश विश्‍वकर्मा, शाखाधिकारी, बॅंक ऑफ महाराष्ट्र पेण यांच्या हस्ते करण्यात आले.

११. शुक्रवार दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाची प्रथम सत्र ट्रेनिंग मिटिंग घेवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

१२. शनिवार दि.२८/०९/२०२४ रोजी स्क्रीन डेटॉक्स कार्यक्रमात या युनिटचे विद्यार्थी सहभागी झाले.

१३. मंगळवार दि. ०१/१०/२०२४ रोजी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्ताने निंबध स्पर्धा घेण्यात आली.

१४. बुधवार दि. ०२/१०/२०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयात राष्ट्रपती 'म. गांधीची' व पूर्व प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांच्या जंयत्या साजरा करण्यात आली. त्यानिमित्ताने महाविद्यालयातील वर्ग खोल्या व परिसराची स्वच्छता विद्यार्थ्यांनी केली.

१५. गुरूवार दि. ०३/१०/२०२४ रोजी, शारदीय व्याख्यान मालेसाठी या युनिटचे विद्यार्थी उपस्थित राहिले.

१६. मंगळवार दि. १५/१०/२०२४ रोजी, महाविद्यालयात या युनिट मार्फत 'वााचन प्रेरणा दिवस' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास हिन्दी विभागाचे व या युनिटचे विद्यार्थी उपस्थित होते.

१७. आपल्या महाविद्यालयात मंगळवार दि. २६/११/२०२४ रोजी दरवर्षीप्रमाणे यंदाही सकाळी १०.०० वाजता 'संविधान दिन' या युनिट मार्फत साजरा करण्यात आला. प्रमुख वक्ता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप सर लाभले होते.

१८. शनिवार दि. ३०/११/२०२४ रोजी दरवर्षी प्रमाणे महाविद्यालयातील डी. एल. एल. ई. युनिट, सोबती ट्रस्ट व सहकारी रूग्णालया तर्फे 'एच.आय.व्ही.एड्स निर्मूलन दिनानिमित्त' महाविद्यालयातून पेण शहरात रॅली काढली गेली.

१९. महाविद्यालयात या युनिट मार्फत मंगळवार दि. १०/१२/२०२४, रोजी 'मानवी हक्क दिवसा' निमित्त स्वरचित काव्य लेखन स्पर्धा घेण्यात आली.

२०. दि. १९/१२/२०२४ रोजी मुंबई विद्यापीठ मुंबई डी. एल. एल. ई. युनिटच्या द्वितीय सत्र ट्रेंनिग मिटिंग साठी डॉ. देवीदास क. बामणे 'संघर्ष' यांनी एम. ब. मोरे फाउंडेशन आर्टस, कॉमर्स आणि सायन्स वूमन कॉलेज, धाटव, रोहा, जि. रायगड येथे रायगड जिल्हा समन्वयक या नात्याने विद्यार्थी व प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. या ट्रेनिंग साठी एक स्टुडंट मॅनेजर प्रेम चौधरी उपस्थित होता.

२१. दि. ०३/०१/२०२५ रोजी शुक्रवार रोजी महाविद्यालयातील डी. एल. एल. ई. युनिट मार्फत सकाळी ११ वाजता 'राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले' यांचे जीवन परिचय व महिला सक्षमीकरण या विषयावर प्रा. विजया ठाकूर यांनी सविस्तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२२. शनिवार दि. ०४/०१/२०२५ रोजी महाविद्यालयीन स्तरावरील द्वितीय सत्र ट्रेनिंग मिटिंग घेण्यात आली. या सभेत विद्यार्थ्यांना डी. एल. एल. ई. युनिटमधील चम्ब व ब्च या प्रोजेक्टविषयी माहिती आणि 'उडाण फेस्टिवल' साठी घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा याविषयी डॉ. देवीदास क. बामणे 'संघर्ष' यांनी मार्गदर्शन केले.

२३. १३/०१/२०२५ रोजी राष्ट्रीय युवादिनानिमित्त सौ. सावनी गोडबोले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

२४. दर वर्षा प्रमाणे मंगळवार दि. २१/०१/२०२५ रोजी मुंबई विद्यापीठ मुंबई आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग तर्फे उडान फेस्टिवल—२०२५ साठी अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज, मुरूड जंजिरा रायगड येथे १५ विद्यार्थी २ प्राध्यापक असे १७ जण गेलो होतो. कु. वैष्णवी लोंखडे या विद्यार्थिनीने क्रियेटीव्ह राईटिंग मध्ये तृतीय क्रमांक पटकावला. या फेस्टिवल मध्ये डॉ. देवीदास क. बामणे 'संघर्ष' यांनी लिहिलेले 'सोशल मिडिया' हे पथनाट्य या युनिटच्या विद्यार्थ्यांनी सादर केले.

२५. २५/०१/२०२५ ला राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त सकाळी ९ वाजता 'मतदार जनजागृती रॅली' काढण्यात आली. तसेच या दिवसाचे औचित्य साधून या दिनानिमित्त निंबध स्पर्धा घेण्यात आली.

२६. रविवार २६/०१/२०२५ रोजी 'हर घर संविधान' अंतर्गत निबंध स्पर्धा घेण्यात आली. तर तसेच या दिवशी प्रथम सामुहिक संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

२७. ०८/०२/२०२५ रोजी या युनिट च्या विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा परिक्षा संदर्भात निवृत्त सनदी अधिकारी मा. सुहास पाटील यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

२८. शुक्रवार दि. १४/०२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात पुलवामा शहीद दिनानिमित्त वीर शहिदांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. यासाठी डी. एल. एल. ई. युनिटचे सर्व सदस्य, विविध शाखांचे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

२९. शुक्रवार दि. २१/०२/२०५ रोजी 'आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास हिंदी विभाग व या युनिट चे विद्यार्थी सहभागी झाले होते.

३०. शासनाच्या परिपत्रकानुसार 'संविधान गौरव महोत्सव' निमित्ताने २४/०२/२०२५ रोजी 'भारतीय राज्यघटना' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.

३१. शासनाच्या परिपत्रकानुसार 'संविधान गौरव महोत्सवा' निमित्ताने २७/०२/२०२५ रोजी 'भारतीय राज्यघटना' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.

३२. शासनाच्या परिपत्रकानुसार शनिवार दि. ०८/०३/२०२५ रोजी 'विश्व महिला दिन' डी. एल. एल. ई. युनिट कडून साजरा करण्यात आला.

३३. सोमवार दि. १४ एप्रिल २०२५ रोजी सकाळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधुन यूनिट मार्फत डॉ.प्रणिता भाले यांचे 'घटनेचे शिल्पकार , डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर आभासी व्याख्यानाचे आयोजन केले होते.या व्याख्यानातून डॉ.बाबासाहेबांच्या कार्यकर्तुत्वाचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा, विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेबांपासून प्रेरणा घेऊन विधायक कार्य करावे. या उद्देशाने मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी निवडलेले करिअर प्रोजेक्ट व पी—ई—सी या दोन्ही प्रोजेक्ट मधून जे उपक्रम घेण्यात आले यामुळे त्या विद्यार्थ्यांला आपल्या जीवनात यशस्वी होण्यास मदत नक्कीच होईल. यावर्षी सर्व प्रोजेक्ट मधील सर्व विद्यार्थ्यांनी सर्व उपक्रमात आपआपले काम पूर्णपणे प्रामाणिकपणे यशस्वीरीत्या पूर्ण केले. 'आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग' चे उपक्रम पूर्ण करत असताना पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अॅड मंगेश नेने व संस्थेचे सर्व पदाधिकारी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. धारप सर, प्राध्यापकांचे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे, नेहमी मार्गदर्शन व सहकार्य वेळोवेळी मिळाले आहे. म्हणून मी डॉ. देवीदास क. बामणे 'संघर्ष' या वर्षा या युनिटचे सर्व उपक्रम विद्यर्थ्यांच्या सहकार्यानि यशस्वीपणे पूर्ण केले. या युनिट चा जो घोष वाक्य आहे 'रिच टू अनरिच' हे सार्थक ठरले.

**डॉ. देवीदास क. बामणे 'संघर्ष'**

जिल्हा समन्वयक, **डी.एल.एल.ई युनिट**

---

# ‘उडाण’ फेस्टिवल २०२५ (आजीवन अध्ययन आणि विस्तार)

महाविद्यालयातील ‘आजीवन अध्ययन आणि विस्तार’ विभागाकडून मुबंई विद्यापीठ, मुबंईच्या ‘आजीवन अध्ययन आणि विस्तार’ विभागा ( DLLE ) तर्फे घेण्यात आलेले ‘उडाण’ फेस्टिवल’ २०२५ या वर्षी अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज, मुरूड जंजिरा, रायगड येथे मंगळवार दि.२१ जानेवरी २०२५ रोजी घेण्यात आली. या विभागाचे महत्वाचे घोष वाक्य आहे. ‘ रिच टू अनरिच ( Reach To Unreached) या घोषवाक्यानुसार‘जिथे कुणी पोहोचले नाही, तेथे आम्ही पोहचू या महत्वपूर्ण अर्थाचा बोध घेत विद्यार्थ्यांचे हित साधण्याचा मी नेहमी प्रथम विचार करीत आहे. यापुढेही करीत राहीन. या वर्षी या युनिट मध्ये १११ विद्यार्थांनी प्रवेश घेतला आहे. या युनिटमध्ये तिन्ही फॅकल्टीचे विद्यार्थी आहेत. मला सहकार्य करणरे एकूण चार स्टुडंट मॅनेजर आहेत. मी व माझे दोन समन्वयक कार्यरत आहेत. त्यांच्या सहकार्यामुळे, तसेच संस्थेचे अध्यक्ष मा. ॲड. मंगेश नेने व अन्य पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदानंद धारप सर इ.च्या सहकार्यामुळे आम्ही या युनिटची धुरा व्यवस्थितपणे सांभाळत आहोत.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे, हा ‘उडाण’ फेस्टिवलचा हेतु असुन या वर्षी हे फेस्टिवल अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज, मुरूड जंजिरा, रायगड येथे २१ जानेवरी २०२५ रोजी आयोजित करण्यात आले होते. सदर महोत्सवात आपल्या महाविद्यालयातून या युनिटचे १५ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांच्यासह आम्ही २ प्राध्यापक असे एकूण १७ जण अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज - मुरूड येथे गेलो होतो.

उडान महोत्सवामध्ये पथनाटय,पोवाडा,गायन, वक्तृत्व, पोस्टर मेकिंग, सर्जनशील लेखन अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण सहभाग घेतला आणि यशस्वीपणे पार पडल्या.यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र आणि मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.या महोत्सवात आपल्या महाविद्यालयातील डी.एल.एल.ई युनिट मधील एकूण १५ विद्यार्थी पाचही स्पर्धामध्ये सहभागी होऊन यशस्वी पणे पार पाडल्या कु. वैष्णवी लोखंडे या विद्यार्थिनीने क्रियेटीव्ह राईटिंग या स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. तसेच वक्तृत्व स्पर्धा,पोस्टर मेकिंग,पोवाडा,गायन पथनाटय यांमध्येही विद्यार्थ्यांनी चांगला प्रयत्न केला.

या महोत्सवातील सर्व स्पर्धामध्ये सहभागी झालेल्या व स्पर्धामध्ये क्रमांक मिळवलेल्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. पारितोषिक वितरण कार्यक्रम झाल्यानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता केली. त्यानंतर १५ विद्यार्थी व २ प्राध्यापक असे एकूण १७ जण परतीच्या प्रवासाकडे निघालो.

**डॉ.देवीदास क. बामणे ‘संघर्ष ’**
**जिल्हा समन्वयक**
**डी.एल.एल.ई युनिट**

# महिला विकास कक्ष अहवाल

आपल्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थीनीच्या सर्वांगीण विकासाठी, निर्भय वातावरणात विद्यार्थिनीना शिक्षण घेता यावे, म्हणून महिला विकास कक्ष कार्यरत आहे. या कक्षातर्फे विविध प्रकारचे उपक्रम राबवले जातात. शैक्षणिक वर्ष २०२४ — २५ मध्ये ३०/०८/२०२४ रोजी डॉ. मैथिली सावंत (मुंबई) यांचे 'स्त्री ऊर्जा — एक चैतन्यशक्ती' या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले.प्रमुख वक्त्या डॉ.मैथिली सांवत यांनी श्रोत्यांसोबत संवाद साधताना स्त्री आणि पुरूष या दोघांतही प्रचंड उर्जा सामावली असल्याचे सांगत सशक्त जीवन जगण्यासाठी दोघांनाही आपलया अंतरंगातील उर्जेचा शोध घेऊन त्याचा सकारत्मक उपयोग करता येणं गरजेचे असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी अंतरंगात दडलेल्या चैतन्यशक्तीला जागृत करून स्व:ला कणखर कसे बनवायचे हे प्रात्यक्षिकद्वारे दाखवून दिले. यादरम्यान काही श्रोत्यांना आलेला अलौकिक अनुभव त्यांनी इतरांना उलगडून सांगितला. सदर कार्यक्रमासाठी जाणकार श्रोते आणि जवळपास १०० विद्यार्थी उपस्थित होते.

२८/०९/२०२४ रोजी अनुराधा भावे( मानसोपचार तज्ञ ठाणे )यांचे ' स्क्रीन डेटॉक्स ' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. प्रमुख वक्त्या सौ.अनुराधा भावे यांनी विद्यार्थ्यासोबत मोकळा संवाद साधत स्क्रीन टाइम म्हणजे नक्की काय ? हे सागून स्क्रीनच्या व्यसनाधीनतेची लक्षणे, त्याच्या वाढत्या प्रभावामुळे मानवाच्या शारिरिक व मानसिक आरोग्यावर होणारे दुष्परिणाम जसे की,डोळयांचे आजार डोकेदुखी,स्थुलता ,निद्रानाश ,एकलकोडेंपणा आदी बद्दल माहिती देत स्क्रीन च्या विळख्यातून स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी स्क्रीन टाइमचे व्यवस्थापन करण्यासाठीचे उपाय व त्या उपायांची अंमलबजावणी करत सर्वार्थाने निरोगी कसे राहावे याचे स्लाईडचे माध्यमातून प्रभावी विवेचन केले. यावेळी सौ.भावे यांनी विद्यार्थ्यांना बोलतं करून त्यांच्या मनातील विविध शंकांचे निरसन केलं. सदर कार्यक्रमासाठी जवळपास १०० विद्यार्थी उपस्थित होते.

महिला विकास कक्षातर्फे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शनिवार दि. ८ मार्च २०२५ रोजी सायबर सुरक्षा जनजागृतीबाबत कार्यरत असलेल्या शौनक देशमुख या तरूण व्याख्यात्याच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यास आले होते.सायबर सुरक्षा या विषयाचे पदवीधर असलेल्या आणि पुणे पोलीसांना सायबर गुन्हे पडताळणीच्या कामात मदत करण्यासाठी कार्यरत असलेले प्रमुख वक्ते श्री.शौनक देशमुख यांनी सायबर गुन्हेगारी त्याचे स्वरूप – प्रकार, गुन्हे घडण्याची माध्यमे यासंदर्भात विविध उदाहरणांच्या माध्यमातून सखोल माहिती देत गुन्हे टाळण्यासाठी सायबर सुरक्षा कशी घ्यावी. याचे विस्तृत विवेचन केले. यावेळी त्यांनी शासनातर्फे सायबर तक्रारी करण्यासाठी असलेली वेबसाइट, तिचा वापर करण्याचे तंत्र तसेच सायबर सुरक्षेसाठी कायद्याअंर्गत समाविष्ट असलेली विविध कलमे याबद्दल सविस्तर माहिती दिली. यानंतर वक्त्यांकडून श्रोतृवर्गाच्या विविध शंकाचे समाधान करण्यात आले. वरील सर्व कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.धारप, महिला विकास समितीचे सर्व सदस्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व विद्यार्थी यांचे उत्तम सहकार्य मिळाले.

**— प्रा.ए.झेड आझमी,**

**महिला विकास कक्ष, प्रमुख**

# ग्रंथालय विभाग अहवाल

महाविद्यालयीन ग्रंथालयाची अद्ययावत ग्रंथसंपदा २१८५० असून आतापर्यंत ४० लाखांची क्रमिक व संदर्भ पुस्तके खरेदी करण्यात आली.

शैक्षणिक वर्ष २०२४— २०२५ मध्ये आतापर्यंत २,२९,४४६ रू. ची १३२० ग्रंथांची खरेदी करण्यात आली. अहवाल वर्षात ३०,००० हजारांची १६ दर्जेदार नियतकालिके नियमित ग्रंथालयात येतात. ई — बुक्स व ई जर्नलसाठी आपण N लिस्टचे सदस्यत्व स्वीकारले आहे. ग्रंथालयात १० वर्तमानपत्र नियमित येतात. अहवाल वर्षात ४ लाखांची संगणक प्रणाली खरेदी करण्यात आली. तसेच Remote Access वेब OPAC सुविधा उपलब्ध करण्यात आली.

ग्रंथलयाचे स्वतंत्र सर्व समावेशक असे संकेतस्थळ आहे. Library Blog च्या माध्यमातून आवश्यक आणि महत्वपूर्ण माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी महाविद्यालयाचे ग्रंथालय नेहमी प्रयत्नशील असते. आतापर्यत १७,३५४ विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा वापर केला आहे.

**— श्री.जी.जी.जोशी,**
**ग्रंथपाल**

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा ( ग्रंथालय विभाग )



महाराष्ट्र शासन व उच्च शिक्षण विभाग यांच्या परिपत्रकान्वये पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील ग्रंथालय व भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १ जाने ते १५ जाने २०२५ हा कालावधी 'वाचन संकल्प पंधरवडा' म्हणून विद्यार्थी, वाचकांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला.या निमित्ताने विद्यार्थ्यांत वाचनाचे महत्व ठसविण्यासाठी वाचनाचा जागर करणारे पोस्टर्स,सेल्फी पॉईंट, गंथप्रदर्शन, पी.टी आदीचा वापर करून ग्रंथलयाचे सुशोभिकरण करण्यात आले. होते. याचसोबत या पंधरवड्या दरम्यान विद्यार्थ्यांत वाचनाची आवड वृद्धिगत व्हावी, यासाठी विविध माहितीपूर्ण उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते.

बुधवार दि.१ जाने रोजी सदर उपक्रमाचे उद्घाटन पे.ए.सो.चे अध्यक्ष ॲड मंगेश नेने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप, संस्थेचे अन्य पदाधिकारी,विविध शाखांचे प्राध्यापक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. प्राचार्य डॉ सदानंद धारप यांनी आपल्या प्रास्ताविात वाचनाचे महत्व विशद करताना वाचनरूपी सिद्धी आत्मसात करून,पुस्तकांशी मैत्री करून आचार – विचारांनी स्वत:ला समृद्ध करण्याचे आवाहन विद्यार्थांना केले, तर अध्यक्ष ॲड मंगेश नेने यांनीही ' वाचाल तर वाचाल...! या उक्तीमागे दडलेला मार्मिक अर्थ उलगडून सांगत वाचन संस्कृती जोपासण्याचे वाढीस लावण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

शुक्रवार दि.३ जाने रोजी **'स्कुल कनेक्ट'** उपक्रमांतर्गत ग्रथालयास भेट दिलेल्या विद्यार्थ्यांना नेने महाविद्यालयाचे ग्रंथापाल श्री.जी.जी.जोशी यांनी ग्रंथालय, ग्रंथलयातील विविधांगी साहित्याचा परिचय करून दिला.

शनिवार दिनांक ४ जानेवरी रोजी महाविद्यालयाच्या परिसरांतील नागरिकांत वाचनसंस्कृतीचे महत्व अधारेखित करण्यासाठी **ग्रंथदिडींचे** आयोजन करण्यात आले होते. या ग्रंथदिडीत सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. वाचनाचे महत्व सांगणारी घोषवाक्य लिहिलेले फलक तसेच ग्रंथ हाती घेत घोषणांच्या गजरात ग्रंथदिडींच्या माध्यमातून वाचनाचा प्रचार – प्रसार करण्यात आला.

रविवार दि.०५ जाने रोजी 'वाचनालयास भेट' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. याअंतर्गत सुट्टी असतानाही विद्यार्थी महाविद्यालयात उपस्थित राहिल आणि त्यांनी ग्रंथपाल श्री. जी.जी. जोशी, प्रा.डॉ.नामदेव पाटील यांच्या समवेत पेण मधील प्रसिद्ध गांधी वाचनालयाला भेट देऊन पुस्तकांचा, एंकदर ग्रथालयाच्या कार्यप्रणालींचा परिचय करून घेतला.

सोमवार दि. ६ जाने रोजी विविध प्रकारचे संदर्भ कोश, ज्ञानकोश, माहितीकोश हाताळण्याची पद्धत, त्याबद्दलची माहिती ग्रंथपाल जी. जी. जोशी यांनी विद्यार्थ्यांना दिली.

मंगळवार दि. ७ जाने रोजी संदर्भकोश, ज्ञानकोश, माहितीकोश याचे **प्रदर्शन** भरविण्यात आले. आणि विद्यार्थ्यांनी या विविध कोशांचा जास्तीत–जास्त वापर करून स्वत:चा ज्ञानसाठा वृद्धिधंगत करावा, असे आवाहन त्यांना करण्यात आले.

बुधवार दि. ८ जाने रोजी विद्यार्थ्यांना अभिवाचन म्हणजे काय? समजावुन सांगण्यासाठी प्रसिद्ध कलाकार, **अभिवाचक** असलेल्या श्रद्धा पोखरणकर यांच्या 'अभिवाचन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

गुरूवार दि. ९ जाने. रोजी रा. से. यो च्या सावरसई येथील विशेष निवासी शिबीरातील विद्यार्थ्यांसाठी व परिसरातील नागरिकांसाठी 'ग्रंथप्रदर्शन' भरविण्यात आले होते.

शुक्रवार दि. ११ जाने. रोजी पेण मधील पुस्तक प्रेमी असलेल्या श्री. विनायक गोखले यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध पुस्तके, त्यातील अमूल्य विचार आदीचे महत्त्व विशद करण्यात आले.

शनिवार दि. ११ जाने रोजी १२ जाने रोजी असणाऱ्या युवा दिनाचे औचित्य साधून युवा पिढीच्या मानसिक सशक्तीकरणासाठी मानसशास्त्र समुपदेशक असलेल्या आदिती गोखले यांच्या **'स्वंयप्रेरणा–सवंयविकास'** या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून स्वत:च्या क्षमतांना कसाला लावता स्वत:चा विकास कसा साधावा, मनोबल कसे वाढवावे यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

सोमवार दि. १३ जाने रोजी विद्यार्थ्यांना वाचनविश्वाचा परिचय करून देण्यासाठी डॉ. सावनी गोडबोले यांच्या **'वाचनाचे महत्त्व'** या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून वाचनाचे बदलेले स्वरूप, वाचनाची बदलेली माध्यमे तसेच एकंदर वाचनसंस्कृतीच्या विविध पैलूंचा विद्यार्थ्यांना परिचय करून देण्यात आला.

मंगळवार दि. १४ जाने रोजी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, त्यासाठीची तयारी करताना उपयुक्त ठरणारे ग्रंथ या संदर्भात मार्गदर्शन, माहिती देण्यासाठी **'स्पर्धा परिक्षांवरील ग्रंथप्रदर्शना'** चे आयोजन करण्यात आले होते. या दिवशी **'पुस्तक परिक्षण'** उपक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते.

वाचकांनी सदर वाचन पंधरवडयास दिलेल्या उत्साहपूर्ण प्रतिसादाबद्दल वाचकांचे आभार मानत ग्रंथालयाचा जास्तीत – जास्त वापर करून स्वत: च्या ज्ञानकक्षा रूंदावण्याचे आवाहन केले.तसेच वाचकांनी वाचनाची भूक भागविण्यासाठी ग्रंथालय सदैव तत्पर राहील असे आश्वासनही दिले.

**श्री.जी.जी.जोशी**
**ग्रंथपाल**

# राष्ट्रीय सेवा योजना अहवाल

सन २०२४—२५ या वर्षी राष्ट्रीय सेवा योजना युनिट मध्ये एकूण १६० स्वंयसंवकांची नोंदणी करण्यात आली. एकूण २ युनिट आणि ४ कार्यक्रम अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विविध उपक्रमात सहभागी झाले. युनिटनुसार विद्यार्थी व प्रोजेक्ट यांचे वाटप करून दत्तक गाव व सावरसई बापुजी देवस्थान मध्ये विविध उपक्रम घेण्यात आले. वर्षाच्या सुरूवातीला विद्यार्थ्यांची नोंदणी झाल्यानंतर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सल्लागार समितीचा सभा २३ सप्टेंबर २०२४ रोजी पार पडली. सदर सभेत वर्षभरातील उपक्रमांची रूपरेषा ठरविण्यात आली. पुढील उपक्रमांची माहिती व नियोजन करण्यासाठी पुन्हा सहभाग घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. हया सभेला प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी, 'सोबती' या स्वंयसेवी संस्थेचे मा. ॲड. बापूसाहेब नेने व संस्थेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये ११ सभासदांनी सहभाग नोंदवला.

शनिवार, दि. १३ एप्रिल रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग, सांस्कृतिक विभाग व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधानाचे जनक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. १४ एप्रिल रोजी सुट्टी एक दिवस अगोदर जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने ग्रंथप्रदर्शन आणि निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. याप्रसंगी प्राचार्यांनी बाबासाहेबांना आदरांजली वाहताना त्यांच्या आधुनिक भारताच्या आणि संविधानाच्या निर्मिती मधील योगदानाबद्दल माहिती देत कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी प्राचार्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना बाबासाहेबांच्या पुस्तक प्रेमाचे किस्से सांगत सर्व विद्यार्थ्यांनी प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणे विद्येचा ध्यास घेऊन स्वत:ला उन्नत करण्याचे आवाहन केले. यानंतर प्राचार्या आणि उपस्थित सर्वांनी ग्रंथप्रदर्शनाला भेट देऊन बाबासाहेबांच्या जीवनावरील आधारित साहित्याचा परिचय करून घेतला. आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

गुरूवार दि. ६ जून २०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५१ व्या राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून एलफिस्टन महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख आणि अभ्यासक डॉ. भावना पाटोळे यांच्या आभासी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला डॉ. तुकाराम माळवे यांनी कवितेच्या माध्यमातुन छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तुत्वाचा गौरव करत महाराजांना आदरांजली वाहिली. यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी आपल्या प्रस्तावनेत महाराजांना अभिवादन करत शिवराज्याभिषेकाची घटना ही केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची आणि स्वाभिमानाला चेतवणारी घटना असल्याचे सांगत हिंदवी स्वराजाच्या उभारणीतून महाराजांनी जनमानसांत स्वाभिमानाचा स्फुल्लिंग चेतवल्याचे सांगितले. प्रत्येकाने महाराजांपासून प्रेरणा घेत स्वत्वाभिमानाची जपणूक करत हर प्रकारच्या मानसिक, वैचारिक गुलामगिरीतून स्वत:ला मुक्त करण्याचे आवाहन प्राचार्यांनी यावेळी केले. नंतर प्रमुख वक्त्या डॉ. भावना पाटोळे यांनी 'द्रष्टे शिवाजी महाराज' या विषयावर व्याख्यानाला प्रारंभ करत बाल शिवाजी ते सिंहासनाधिश्वर

छत्रपती शिवाजी महाराज असा महाराजांचा स्वकर्तृत्वाने उज्वल व इतरांना प्रेरणादायी झालेला प्रवास उलगडून दाखविला.

दि. २१/०६/२०२४ रोजी भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील IQAC, राष्ट्रीय सेवा योजना व जिमखाना विभाग यांच्या विद्यमाने आंतरराष्ट्रीय योगा दिवस मोठया उत्साहात पार पडला. यासाठी ईशा फांऊडेशन तर्फे चेतन राजपूत, सौरभ सिंह यांनी विद्यार्थ्यांकडून प्रत्याक्षिके करून घेतली व दैनंदिन आयुष्यातील योगाचे महत्त्व या प्रसंगी विशद करण्यात आले.

मंगळवार दि. २५ जून २०२४ रोजी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठया उत्साहत साजरी करण्यात आली. या निमित्ताने शाहू महाराजांच्या कार्यकर्तृत्वावर आधारित माहितीपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला.

एन.एस.युनीट, डी.एल.एल.ई. युनीट, अलिबाग जिल्हा रूग्णालय व पेणचे ग्रामीण रूग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार दि. १३ जुलै रोजी 'जागतिक लोकसंख्या दिना' चे औचित्य साधून रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या स्थापनेपासुन जवळपास ३० वर्षे या समाजोयोगी उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयातर्फे केले जात आहे.

दि. २४ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० वा भाऊसाहेब नेने महाविद्यालयात मा. प्राचार्यांच्या उपस्थितीत सर्व विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली. तसेच **राष्ट्रीय सेवा योजना दिवसानिमित्त ध्वजारोहण** करण्यात आले. मा. प्रचार्य डॉ. सदानंद धारप सर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वच्छता अभियानाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शनवर व्याख्यान दिले. त्यामध्ये त्यांनी महाविद्यालयात स्वच्छता कशी राखायची, महाविद्यालयाच्या परिसरात, शहर, खेडेगाव या विभागात स्वच्छता कशी राखायची या बद्दल मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'आंतरराष्ट्रीय युवा दिन' आणि 'हर घर तिरंगा' मोहिमेचे औचित्य साधुन रविवार, दि. ११ ऑगस्ट रोजी स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. यु. ए. खाडिलकर, यांनी युवा दिनानिमित्त विद्यर्थ्यांना शुभेच्छा देत स्वच्छता मोहिमेत हिरीरीने सहभागी झाल्याबद्‌दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि त्यांना समाजहितासाठी सदैव दक्ष राहण्याचे आवाहन केले.

भारत सरकारच्या 'हर घर तिरंगा' मोहिमेची अंमलबजावणी करत राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि 'आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागा' तर्फे मंगळवार दि. १३ ऑगस्ट रोजी 'तिरंगा प्रतिज्ञेचे सामुदायिक वाचन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ठीक ८ वाजून ५ मिनीटांनी नेने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, राज्यगीत व ध्वज गीताचे सुरेल सादरीकरण केले. यानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागाची रूवयंसेवक कु. पुनम चव्हाण हिने खडया आवाजात तिरंगा प्रतिज्ञेचे वाचन केले. पुनमच्या बरोबरीने उपस्थितांनीही राष्ट्रीय ध्वजाच्या सन्मानाची जपणूक करत इतरांनाही राष्ट्रीय ध्वजाचा सन्मान जपण्यासाठी प्रवृत्त करण्याची शपथ घेतली.

भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाण्ज्यि महाविद्यालय, एन. एस. एस. युनिट यांच्या तर्फे दि. १३ ते १५ ऑगस्ट २०२४ दरम्यान 'हर घर तिरंगा' मोहिमेअंतर्गत मंगळवार, दि. १५ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

त्यानंतर झेंडयाला सलामी देण्यात आली. राष्ट्रगीत, ध्वजगीत, महाराष्ट्र गीत गाण्यात आले, तसेच सामुदायिक 'तिरंगा प्रतिज्ञा' घेण्यात आली.

तसेच बुधवार दि. १४ ऑगस्ट रोजी महाविद्यालयातून 'तिरंगा यात्रा' काढण्यात आली. या रॅलिमध्ये पेण एज्युकेशन सोसायटीचे वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी झाले. गुरूवार दि. १५ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. अशा चैतन्यपूर्ण वातावरणात ७८ वा भारतीय स्वातंत्र्य दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

मंगळवार, दि. २९ ऑक्टोंबर रोजी केतकीची वाडी—बेलोशी, दत्तनगर, मोतीराम तलाव आणि परिसरातील आदिवासी वाडीवर जाऊन फराळ वाटप करण्यात आले. सदर उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी आणि विद्यार्थी यांचे कौतुक करत स्वत:मधील समाजमन जागृत ठेवून कायम समाजाभिमुख कार्य करत राहण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. यानंतर विद्यार्थ्यांनी रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी डॉ. टी. डी. माळवे, डॉ. एस. डी. लकडे, डॉ. एस. एस. पितळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष आदिवासी वाडीवर जाऊन बिस्किटे, फराळ आणि खाऊचे वाटप करून खर्या अर्थाने आदिवासी वाडीवरील लोकांची दिवाळी गोड केली. या उपक्रमासाठी जवळपास ७०—८० विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थींनी उत्साहाने पुढाकार घेत स्वत:च्या घरून फराळ आणि खाऊ आणून त्याचे आदिवासी वाडीवर वाटप करत 'NOT ME BUT YOU' हे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे ब्रीदवाक्य सार्थ केले.

शनिवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता महाविद्यालयापासून नगरपालिकेपर्यत 'मतदार जागृती अभियाना'चे आयोजन करण्यात आले होते. सदर उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत कायम समाजाभिमुख राहून समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील आवाहन केले.

गुरूवार दि. २४ ऑक्टोंबर २०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता 'निवडणूक साक्षरता' कार्यक्रम संपन्न झाला. समाजात निवडणूक साक्षरता वाढीस लागावी, या हेतूने मुंबई विद्यापीठाने सदर कार्यक्रमाची आखणी केली होती. या प्रंसगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी विद्यार्थ्यासोबत संवाद साधत निरोगी लोकशाहीसाठी निवडणूक साक्षरता गरजेची असल्याने सांगुन निवडणूक साक्षरता म्हणजे नेमंक काय? याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता विचारपूर्वक, नि:पक्षपातीपणे मतदान करण्याचे आणि त्याबाबत समाजात जनजागृती करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना निवडणूक साक्षरतेबाबत शपथ देण्यात आली.

दि. २९ ऑक्टोंबर रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता केतकाची वाडी—बेलोशी, दत्तनगर, आणि मोतीराम तलाव परिसरातील आदिवासी वाडीवर 'मतदार जागृती' अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत कायम समाजाभिमुख राहून समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले.

अमरावती येथे झालेल्या दिनांक ०७/११/२०२४ ते १४/११/२०२४ रोजी महाराष्ट्र राज्य लेवलच्या विद्यापीठ पातळीवरच्या आव्हान शिबीरासाठी 'प्रसाद विनायक शारदा' S.Y. B.A. या विद्यार्थ्यांने सहभाग घेतला.

तसेच ०९/१२/२०२४ ते १४/१२/२०२४ या काळात रायगड जिल्हास्तरीय सी. डी. देशमुख कॉलेज रोहा, संपन्न झालेल्या लिडरशीप कॅम्प साठी पुढील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

| | | |
|---|---|---|
| १. | निशा राठोड | F.Y.B.Com |
| २. | सुश्मिता शंभु चौरसिया | F.Y.B.Com |
| ३. | पिंकी मोहन सहानी | F.Y.B.Com |
| ४. | ओमकार नरदास मोकल | F.Y.B.Sc.C.S. |

०४ ते १० जानेवारी २०२५ दरम्यान बापूजी देवस्थान या ठिकाणी विशेष निवासी युवक व माझा भारत या संकल्पनेनुसार काम करून सदर शिबीर यशस्वी करण्याची ध्येय दृष्टी देऊन शिबीराचे आयोजन केले. या शिबीरासाठी १०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी 'राष्ट्रीय सेवा योजनेच्या' कार्यक्रमात वेळोवेळी सहभाग घेत सहकार्य केले. मसेच आर्थिक मदत महाविद्यालयाकडून उपलब्ध करून दिली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राचार्य डॉ. तुकाराम माळवे, डॉ. सुभाष लकडे, प्रा. सौ. सायली पितळे, प्रा. सौ. वैदेही जोशी व प्रा. भौतिक रूपारेल यांनी या वर्षभराच्या वेगवेगळया कार्यक्रमाच्या नियोजनात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. मसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही सहभाग घेतला. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही वेळोवेळी मदत केली.

**— प्रा.डॉ.तुकाराम माळवे,**
**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

# जिमखाना विभाग अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मध्ये जिमखाना विभागातर्फे दि. २१/०६/२०२४ रोजी आंतरराष्ट्रीय योगा दिवस मोठ्या उत्साहात पार पडला. यासाठी 'ईशा फांऊडेशन' तर्फे चेतन राजपूत, सौरभ सिंह यांनी विद्यार्थ्यांकडून योगाची प्रात्यक्षिके करून घेतली व दैनंदिन आयुष्यातील योगाचे महत्त्व विशद केले.

महाविद्यालयातील वार्षिक क्रिडा स्पर्धा दिनांक १९ डिंसेबर २०२४ ते २३ डिंसेबर २०२४ या दिवसांमध्ये पार पडल्या. या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

भाऊसाहेब नेने महाविद्यालयामध्य दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ रोजी डॉ. भोईर यांच्याद्वारे सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.यात महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी सहभागी झाले.

**— डॉ.व्ही.डी.भाबड,**
**जिमखाना प्रमुख**

# कला शाखेचा निरोप समारंभ



पे.ए.सो. च्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील (इतिहास,मराठी आणि हिंदी विभागाच्या) शै.वर्ष २०२४. २५ च्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप देण्यासाठी शुक्रवार दि.२१मार्च २०२५ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सदर समारंभासाठी कला शाखा प्रमुख डॉ.एच.ए.सावंत,इतिहास विभाग प्रमुख डॉ.यु.ए.खाडिलकर.प्रा. डॉ.टी.डी.माळवे,हिंदी विभाग प्रमुख डॉ.डी.के.बामणे, वाणिज्य शाखा प्रमुख प्रा.जी.व्ही.उपाध्ये प्रा. डॉ.व्ही.एन.गुम्मा,भूगोल विभाग प्रमुख डॉ.ए.एम.पाटील,प्रा.पी.डी.पाटील आणि अन्य प्राध्यापक उपस्थित होते. काही कारणाने महाविद्यालयाचे प्राचार्य ढॉ.सदानंद धारप संमारंभासाठी उपस्थित राहू शकले नाहीत, तरी त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी आपल्या शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी उपस्थित गुरूजनाचे स्वागत केल्यावर समारंभाची सुरूवात झाली.यावेळी उपस्थित प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना निरोप देताना मोलाचे मार्गदर्शन केले. डॉ.यु.ए.खाडिलकर, डॉ. एच.ए सावंत व डॉ.टी.डी.माळवे यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देत परीक्षेला सामोरं जाताना लागणाऱ्या शारीरिक, मानसिक तयारी बाबत मार्गदर्शन केले. तर जी.व्ही.उपाध्ये यांनी कला शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या वेगवेगळया करिअरच्या संधीबाबत मार्गदर्शन केले. डॉ.अरूण पाटील व प्रा.पी.डी.पाटील यांनीही विद्यार्थ्यांना कठोर मेहनत करून यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.यानंतर विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांनी महाविद्यालय, प्राचार्य व शिक्षकांप्रती .ऋण व्यक्त करताना महाविद्यालयाने शिक्षणासोबतंच उत्तम माणूस बनवण्याची शिदोरी दिल्याची भावना व्यक्त केली.आपले गेल्या ३ वर्षातील अनुभव सांगताना विद्यार्थी भावुक झाल्याचे पाहायला मिळाले. नंतर सदर संमारंभाच्या आठवणी कॅमेऱ्यात कैद करून निरोप समारंभाची सांगता झाली.

- कला विभाग

# महाविद्यालयातील विविध कार्यक्रम व उपक्रम यांची क्षणचित्रे

# भाऊसाहेब नेने स्मृतीव्याख्यानमाला २०२५







# महाकवी कालिदास दिनानिमित्ताने आयोजित काव्यमैफल






# कला शाखा निरोप समारंभ . २०२४ .२५






# २०२३- २४ या शैक्षणिक विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ ..


















# इतिहास विभाग

शिवजयंती निमित्ताने आयोजित वक्तृत्व स्पर्धेचे बक्षिस वितरण



गुरूपौर्णिमा – विशेष कार्यक्रम



'पुरातत्त्वशास्त्र विषयातील करिअरच्या संधी' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्याख्यात्या- समृध्दी योगी



# मराठी विभाग

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना प्राचार्य – डॉ.एस.बी. धारप






मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मार्गदर्शन करताना वक्ते – श्री.श्याम जोगळेकर

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यादरम्यान घेण्यात आलेल्या स्पर्धातील विजेत्यांचा गौरव करताना मान्यवर








# हिंदी विभाग

'दर्पण' भित्तीपत्रकाचे अनावरण करताना बॅक आफ महाराष्ट्र पेण शाखेच प्रमुख. मा. नितेश विश्वकर्मा




हिंदी दिनानिमित्त मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.एस.बी.धारप




हिंदी दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेत्याचा गौरव करताना मान्यवर....




एस.वाय.बी.ए च्या विद्यार्थ्यांसाठी प्रा.विश्वनाथ

पाठारे यांचे आभासी व्याख्यान



# महिला विकास कक्ष

## महिला विकास कक्षातर्फे आयोजित 'स्त्री ऊर्जा - एक चैतन्यशक्ती' विशेष व्याख्यान






'स्क्रीन डेटॉक्स' या विषयावर मार्गदर्शन करताना मानसोपचारतज्ज्ञ – अनुराधा भावे



# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

राष्ट्रीय सेवा योजना दिवस



रक्तदान शिबीर



शैक्षणिक साहित्य वाटप




हर घर तिरंगा अंतर्गत ध्वजवंदन



स्वच्छता मोहिम




मतदार जनजागृती रॅली



संविधान दिन




निवडणूक साक्षरता अभियान




दिवाळी फराळ वाटप



योग दिन



राष्ट्रीय सेवा योजना विशेष निवासी शिबिर - ग्रंथदिंडी



## आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग ( D.L.L.E UNIT )

माजी सनदी अधिकारी सुहास पाटील यांचे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनपर व्याख्यान



रक्तदान शिबीर



डी.एल.एल.ई युनिट तर्फे रेल्वे स्थानकात सभा
मतदान जनजागृती



डी.एल.एल.ई युनिट प्रथम सत्र प्रशिक्षण



डी.एल.एल.ई युनिट – द्वितीय सत्र प्रशिक्षण सभा



डी.एल.एल.ई युनिट प्रशिक्षण सभेत माहिती 'राज्यघटना' या देताना समन्वयक डॉ.डी.के बामणे स्पर्धा

डी.एल.एल.ई युनिट तर्फे आयोजित विषयावर आधारित निबंध लेखन





## उडाण फेस्टिवल-२०२५



उडाण फेस्टिवल-२०२५ मध्ये सहभागी झालेले नेने महाविद्यालयातील विद्यार्थांचा गौरव करताना मान्यवर.....




उडाण' फेस्टिवल अंतर्गत सर्जनशील लेखन स्पर्धेत  विजेती ठरलेल्या कु.वैष्णवी लोखंडे हिचा गौरव करताना समन्वयक डॉ.डी.के बामणे.



# जिमखाना विभाग

## वार्षिक क्रीडा स्पर्धा २०२४-२५







Time: 20-12-2024 09:07
Note: Annual sports
BN College Pen
Powered by NoteCam


Time: 21-12-2024 09:04
Note: Annual sports2nd day
BN College Pen
Powered by NoteCam

# मराठी साहित्य विभाग


लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी।
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी।
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी।
एवढ्या जगात माय मानतो मराठी।।
मराठी
अभिजात


२७ फेब्रुवारी
सिखवण्यापरी
सिखवणे थोर
संवादात धार
राहो तिची
नको माऊलीची
बेगडी बढाई
वर्तनात आई
उमटावी
- गुरु ठाकूर
मराठी
भाषा गौरव दिनाच्या हार्दिक शुभेच्छा




## 'अभिजात' माय मराठी......

**"माझा मराठाचि बोलु कौतुकें|**
**परि अमृतातेंही पैजा जिंके|"**

मराठी भाषेवर असलेले प्रेम आणि तिच्याबद्दलचा अभिमान व्यक्त करताना संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेला अमृताची उपमा दिली आहे. ते म्हणतात की, माझा मराठीचा बोल (शब्द) मला कौतुकाचा वाटतो. माझ्या मराठी भाषेत इतका गोडवा, माधुर्य आहे की, अमृताशी जरी पैज लावली तरी माझी मराठी भाषाच ती पैज जिंकेल. खरंच आपली मराठी भाषा इतकी संपन्न असल्यानेच फादर थॉमस स्टिफनसारख्या ख्रिस्ती धर्मीयालाही मराठी भाषेची भुरळ पडल्यावाचून राहिली नाही आणि म्हणूनच मराठी भाषा आत्मसात करुन याच मराठी भाषेतून त्यांनी 'क्रिस्तपुराण' 'कोकणी भाषेचे व्याकरण' आदी ग्रंथांची निर्मिती केली. मराठी भाषेच्या प्रशस्तीपर असलेली त्यांची कविता तर सर्वश्रुत आहे. ते म्हणतात.

**"जैसी पुस्पामाजि पुस्प मोगरी| कि परिमळा माजि कस्तुरी|**
**तैसी भासांमाजि| साजिरी मराठीया|"**

तर अशा या आपल्या समृद्ध, संपन्न व सर्वार्थाने श्रीमंत असलेल्या माय मराठीच्या शिरपेचात दि. ३ ऑक्टोंबर २०२४ रोजी मानाचा तुरा खोवला गेला. केंद्र सरकारने मराठी भाषेला 'अभिजात' भाषेचा दर्जा देऊ केला आणि केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण जगभरात विखुरलेल्या समस्त मराठी भाषकांना आनंदाचे भरते आले. अर्थात यासाठी आपल्या माय मराठीला आणि तिच्यावर प्रेम करणाऱ्या तिच्या प्रत्येक लेकराला खडतर परीक्षेतून जावं लागलं आणि अनेक वर्षांची प्रतिक्षा संपुष्टात आली आणि आपली माय मराठी 'अभिजात' हे बिरुद लेऊन अधिक समृद्ध- संपन्न बनली.

प्रस्तुत लेखाच्या माध्यमातून माय मराठीचे (अद्वितियत्व) आणि तिच्या लेकरांनी मराठी भाषेला यशोचित गौरव/सन्मान मिळवून देण्यासाठी केलेली धडपड, मेहनत, अनेक वर्षांचा दीर्घ प्रवास माझ्या अल्पमतीनुसार थोडक्यात शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

- **'अभिजात' म्हणजे काय?**

  **—'अभिजात' म्हणजे प्राचीन, स्वयंभू, सर्वश्रेष्ठ होय.**

- **भाषा 'अभिजात' ठरविण्याचे निकष :—**

१) सदर भाषेला दीड ते दोन हजार वर्षे जुना इतिहास असणे गरजेचे आहे.

२) सदर भाषा स्वयंभू असावी...म्हणजेच दुसऱ्या भाषेतून उसनी घेतलेली नसावी.

३) सदर भाषेतील साहित्य स्वंतत्र, अस्सल असावे.

४) २०२४ साली वरील निकषांत आणखी एका निकषाची भर पडली —

भाषेतील ज्ञान ग्रंथ, गद्य ग्रंथा व्यतिरिक्त त्या भाषेतील प्राचीन साहित्य, शिलालेख व जुन्या नोंदी पुरावा म्हणून ग्राह्य मानल्या गेल्या.

### ❖ मराठी भाषेला 'अभिजात' दर्जा मिळविण्यासाठी काय संघर्ष करावा लागला?

मराठी भाषेच्या अभिजात दर्जाबद्दल संशोधन करून तसा अहवाल केंद्र सरकारकडे पाठविण्यासाठी २०१२ साली प्रा. रंगनाथ पाठारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली गेली. २०१३ साली या समितीने आपला अहवाल प्रकाशित केला. 'महारठ्ठी — महरठ्ठी — मऱ्हाठी — मराठी' असा मराठीचा उच्चार बदलत गेल्याचे अहवालात सांगितले गेले. म्हणजेच 'महाराष्ट्री भाषा' महाराष्ट्र प्रदेश अस्तित्वात येण्यापूर्वीपासून प्रचलित होती व मराठीचे वय किमान अडीच हजार वर्षे जुनं असल्याचे पुरावे देताना मराठी भाषेतील प्राचीन साहित्यसंपदेचे (विवेकसिंधू, ज्ञानेश्वरी, गाथा सप्तशती , लीळाचरित्र शिलालेख इ. दाखले दिले गेले. भाषेतील विविध स्थित्यंतरांचा उल्लेख करत मराठी भाषेची ऐतिहासिकता त्यातील विविध साहित्यिकांनी दिलेल्या योगदानाचा विचार करून मराठी भाषेचे स्वयंभूत्व दर्शविण्यात आले.

आणि अखेर सर्व निकष पूर्ण करत, सर्व अडथळे पार करत ३ ऑक्टोंबर २०२४ रोजी माय मराठीने **'अभिजाततेचा'** मुकुट मस्तकी धारण केला.

### ❖ अभिजात दर्जा मिळाल्याचे फायदे —

१) मराठी भाषेच्या बोलींच्या अभ्यासास प्रोत्साहन मिळेल.

२) संशोधन व साहित्यसंग्रह करण्याच्या दृष्टीने चालना मिळेल.

३) भारतातील सर्व विद्यापीठांत मराठी भाषेच्या अध्यापनाची सुविधा निर्माण करता येईल.

४) अर्थार्जनाच्या नव्या संधी उपलब्ध होतील.

५) अभिजात भाषेतील गुणवंतांना दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार दिले जातात. यापुढे मराठी भाषेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तीलाही तो मिळेल.

६) ग्रंथालयांचे सशक्तीकरण होईल. तसेच मराठी भाषेच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या व्यक्ती, संस्था व विद्यार्थ्यांना मदत मिळू शकेल.

७) भाषांतर, नोंदी, प्रकाशन तसेच डिजिटल माध्यमात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील.

शेवटी एवढंच म्हणेन,

**" लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी**
**जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी**
**धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी**
**एवढया जगात माय मानतो मराठी........"**

**— मराठी विभाग**




## महाराष्ट्रात तीन शिवजयंती उत्सव का होतात?

१) बखरकारांनी निर्देशित केलेली वैशाख शुद्ध पंचमी शके १५४९ ही शिवजन्म तिथी इतर पुरावे मिळेपर्यत संशोधकांनी प्रमाण मानली होती. काही पुराणमतवादी किंवा जुन्या विचारांचे लोक नवीन जन्मतिथी पुराव्याशी सहमत नाहीत, म्हणून ते लोक वरील तिथीप्रमाणे शिवजयंती उत्सव साजरा करतात.

२) जेधे शकावलीनुसार फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ ही शिवजन्म तिथी बहुतांशपणे जुन्या नव्या संशोधकांना मान्य आहे. शिवकाळात इंग्रजी कालगणना हिंदुस्थानात प्रचलित नव्हती. हिंदुधर्माभिमानी प्रभू रामचंद्र, श्रीकृष्ण यासारख्या दैवतांत शिवरायांचे स्थान मानून त्या तिथीप्रमाणे शिवजयंती उत्सव साजरा करतात.

३) सध्या देशातील सर्व कारभार इंग्रजी कालगणनेनुसार चालतो.त्या देशांतील दिनदर्शिका इंग्रजी कालगणनेनुसार तयार केल्या जातात. ३७५ वर्षांपुर्वी फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ ही तिथी हिंदु कालगणनेनुसार १९ फेब्रुवरी १६३० ह्या दिवशी आली होती. ती सरकारमान्य केली गेली. म्हणून सरकार तर्फे १९ फेब्रुवारी हा शिवजन्म तिथीचा दिवस मानला जातो.

**— डॉ.यु.ए.खाडिलकर**
**इतिहास विभाग**




## पंजाबचा सिंह' : लाला लजपतराय

भारतीय स्वातंत्र्य आदोलनात भारतीय समाजातील वाढत्या असंतोषाला कृतीशील बनवण्याचे कार्य जहाल गटाने केले. त्यांनी भारतीय जनतेला लढाऊ राष्ट्रवाद शिकवला. जहाल राष्ट्रवादाचा प्रचार सातत्याने करून राष्ट्रीय चळवळीत नवे चैतन्य निर्माण करणाऱ्यांमध्ये लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक, बिपिनचंद्र पाल,म्हणजेच 'लाल,बाल, पाल' या त्रिमूर्तीचे अनमोल योगदान आहे. यामधील लाला लजपतराय यांनी पंजाब मध्ये जहालवादी विचारसरणीचा प्रसार करून राष्ट्रीय चळवळ पुढे नेली. त्यांना 'पंजाबचा सिंह' म्हणून ओळखले जात असे. २८ जानेवारी रोजी त्यांची जयंती असते. या निमित्ताने आपण लाला लजपतराय यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाची माहिती करून घेऊ.

लाला लजपतराय यांचा जन्म फिरोजपुर जिल्हयातील दुडकी येथे २८ जानेवारी १८६५ रोजी झाला. त्यांचे घराणे अग्रवाल वैश्य समाजाचे होते. आई.— वडिलांकडून लालजींवर उत्तम संस्कार झाले. विद्यार्थीदशेत लालाजी ब्राम्हो समाजाचे प्रवर्तक होते. नंतर गुरूदत्त आणि लाला हंसराज यांच्या त्यागी व स्फूर्तिदायक सहवासामुळे ते आर्य संस्कृतीचे आणि आर्यधर्माचे अनुयायी बनले. १९८३ साली ते वकीली परीक्षा उतीर्ण झाले. त्यांचे सर्व जीवन हे सार्वजनिक कार्याने व्यापून गेले होते. जनतेमध्ये देशाभिमान निर्माण व्हावा. म्हणून त्यांनी श्रीकृष्ण, शिवाजी महाराज इत्यादींची चरित्रे लिहिली. अस्पृश्योद्धार व दुष्काळ निवारणासाठी परिश्रम घेतले.

राजकीय क्षेत्रातील कार्य १९८८ च्या डिसेंबर महिन्यात कॉग्रेस अधिवेशनात ते राष्ट्रीय सभेचे सदस्य झाले. १९०५ ला कॉग्रेसची जी राष्ट्रीय सभा भरली होती, त्याचे प्रतिनिधीपद स्वीकारून त्यांनी स्वदेशी व बहिष्कार चळवळ सुरू केली. पुढे वंग — भंग आंदोलन, असहकार चळवळ यांतही सहभाग घेतला. त्यांच्या कार्यामुळे लोकक्षोभ निर्माण झाला, म्हणून ब्रिटिश सरकारने त्यांना पकडले. व मंडालेच्या तुरूगांत पाठवले. १९०७ मध्ये त्यांची तिथून सुटका झाली. पुढे त्यांनी पंजाबात हिंदू संघटनेचे काम केले. राष्ट्रहित आणि माणुसकीच्या दृष्टीने अस्पृश्यता नष्ट झाली. पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यांनी ' अनहॅपी इंडिया' हे पुस्तक लिहिले. १९२१ साली लाहोर येथे 'सर्व्हटन्स ऑफ द पीपल सोसायटी' ही संस्था स्थापन केली. राजकीय चळवळीसाठी तरूण तयार करणे हे त्यांचे काम होते.

**सायमन कमिशन** — १९२८ साली सायमन कमिशन भारतात आले.भारताच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी आलेल्या या कमिशनवर बहिष्कार टाकला गेला. यासाठीच लालाजींनी १८ फेबुवारी १९२८ रोजी " **सायमन गो बॅक** " हा ठराव मांडला. सायमन कमिशनचा निषेध करण्यासाठी लालाजींना एक प्रचंड मिरवणूक लाहोर येथे काढाली. त्यावेळी ब्रिटिश पोलिसांनी लाहोरच्या रस्त्यात मिरवणुकीवर बेफाम लाठीहल्ला केला. या हल्ल्यात लालाजी जबर जखमी झाले आणि यामुळेच १९ नोव्हेंबर १९२८ रोजी लाहोर येथे लालाजींचा मृत्यु झाला. लाला लजपतराय यांची प्रेरणा ही मुख्यत: सामाजिक होती. त्यांचा कल शैक्षणिक व सामाजिक कार्यकडेच होता. देशासाठी त्यांनी केलेले कार्य मोलाचे होते. 'पंजाबकेसरी लाला लजपतराय' हे स्वातंत्र्य समरातील थोर नेते होते. स्वामी विवेकानंदाचे धार्मिक विचार, महात्मा गांधी व रविद्रनाथ टागोर यांचे नैतिक विचार आणि लोकमान्य टिळकांचे राजकीय विचार यांचा सुंदर मिलाप त्यांनी आपल्या जीवनात साधला होता.

**— डॉ.यु.ए.खाडिलकर**
**इतिहास विभाग**




## ताणतणावाचे व्यवस्थापन

खरे पाहता मानसिक ताण हा लाखो वर्षे, आदिमानवाच्या काळापासून अस्तित्वात आहे. त्यामुळे मेंदूतील विविध संप्रेरके वाढतात. तणाव ही एक मानसिक अवस्थेची व्याधी आहे. पण नेमके तणाव म्हणजे काय? तर आपल्या आयुष्यात येणाऱ्या कोणत्याही प्रसंग अथवा बदलाला दिलेला नकारात्मक शारीरिक व भावनिक प्रतिसाद! आपल्या मनातील अवस्था व नकारात्मक विचारांच्या गर्दीमुळे मनाची जी स्थिती होते, त्याला 'तणाव' म्हणतात. सध्याच्या काळात 'ताण' ही सर्वांना अनुभवावी लागणरी बाब आहे. बदलेल्या काळानुसार ताणाचे स्वरूप व रूप बदलत गेले. आजच्या विज्ञान युगात विविध प्रकारच्या भौतिक प्रगतीचे उच्च शिखर गाठले गेले असले तरी, ताणतणावाच्या या राक्षसाच्या तावडीतून माणसाची सुटका झाली नाही. तणाव निर्माण होण्याची मुख्यत: दोन कारणे असतात. १) बाह्य व २) आंतरिक.

यातील बाह्य तणावामध्ये घरातील वातावरण, आर्थिक स्थिती, सामाजिक समस्या अशा अनेक घटकांचा समावेश होतो. तर आंतरिक तणावामध्ये स्वभावातील काही दोषांमुळे नेहमीची परिस्थिती देखील तणाव निर्माण करू शकते, उदा. आत्मविश्वासाचा अभाव, हळवेपणा, लाजणे, इ. घटकांमुळे ताण येऊ शकतो. एकूण तणाव निर्मितीमध्ये बाह्य घटकांचा ५-१०% एवढाच वाटा असतो, तर आंतरिक घटकांचा ९० - ९५% वाटा असतो.

- मग तणाव येऊ न देण्यासाठी काय करता येईल?

एक म्हणजे, परिस्थिती बदलणे आपल्या हातात नाही. त्याचा विचार न करता जे बदलू शकतो ते बदल स्वीकारले पाहिजेत. आपला आहार व विहार यांचा समतोल साधला पाहिजे. याशिवाय नियमित ६-८ तास झोप घेणे, योगासने/व्यायाम करणे या गोष्टी केल्या पाहिजेत. आपल्याला मिळणाऱ्या रिकाम्या वेळेत एखादा छंद जोपासावा, एखादी कला आत्मसात करावी. स्मार्ट फोनचा वापर नवीन माहिती मिळवण्यासाठी करावा. इंटरनेटवर उपलब्ध असणारे नवनवीन कोर्सेस करावे. रोज प्रार्थना, स्तोत्र पठण करावे. समाजातील आवश्यक घटकांना मदत करून समाजभान बाळगावे.

मानसिक तणावापासून मुक्त होऊन सुखी जीवन जगण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. फक्त आपले कर्तव्य करण्यात कसूर करू नये. शेवटी हेच सत्य आहे की, तुम्हाला सुख हवे तर इतरांना सुखी करा.

**— डॉ.यु.ए.खाडिलकर**
**इतिहास विभाग**




## मधूमेह घोषवाक्य...

आवडतात, म्हणून भान सोडून
खाल होळीच्या पोळ्या,
लागतील सतत मागे मधूमेहाच्या गोळ्या...

साखरेचे खाणार, त्याला मधुमेह होणार...

बैठे जीवन, व्यायामाचा अभाव,
काळजी यांना ठेवा दूर,
मधुमेहापासून सुटका होईल जरूर..!

चोर पावलांनी शरीरात शिरतो,
सगळ्याच शरीरकार्यावर परिणाम करतो,
मधूमेहच शरीराचा ताबा घेतो...

योग्य आहार, नियमित व्यायाम
मधूमेहापासून दूर राहण्याचा हाच नामी उपाय...
मधूमेहाचा धरू नका हात,
नाहीतर जीवनाचा होईल घात...

योग्य आहार, विहार, प्राणायाम यांची धरा कास,
मधूमेह जीवनातून पळून जाईल खास...

गोडाच्या अती गोडीला भुलू नका,
मधूमेहाच्या जाळ्यात अडकू नका...

होता मधूमेह शरीराच्या अंतरी,
कधीच चुकणार नाही डॉक्टराची वारी...

काळजी, व्यसन, स्थूलता, बैठे जीवन
जाता यांच्या आहारी,मधूमेह येईल तुमच्या दारी...

मधूमेहावर करण्या मात
धरा योग्य व्यायामाची साथ....




## भ्रष्टाचार मुक्त भारत...

भ्रष्टाचाराला देऊ नका थारा,
तरच भारतात वाहील विकासाचा वारा...

भ्रष्टाचारावर करून मात,
देशाच्या प्रगतीला देऊ साथ...

भ्रष्टाचार रोगाची कीड उखडून फेकू,
देशाला आमच्या प्रगतीकडे नेऊ...

भ्रष्टाचार मुक्तीचा घेता ध्यास,
आपण जाऊ विकासाच्या जवळपास...

मी भ्रष्टाचार करणार नाही,
भ्रष्टाचाराला भूलणार नाही...

स्वच्छ भारत, सुंदर भारत, भ्रष्टाचार मुक्त भारत
या त्रयीचा घेऊ वसा, सतत पुढे नेऊ आपल्या भारता...

आपल्या संस्कृतीने दिले आहे
उत्तम लोकजीवनाचे वरदान,
भ्रष्टाचाराने बनवू नका ते घाण...

विकासाची वाहायला हवी नदी,
तर बंद करूया भ्रष्टाचाराची गंदगी...

वाम मार्गाने मिळालेला पैसा मृगजळंच ठरतो,
ते हाती घेण्याच्या नादी सर्वस्व गमावतो...

टेबलावरुन, टेबलाखालून अशी अनेक आहेत भ्रष्टाचाराची रूपे, पण आपण त्याच्या वाटेला जायचेच नाही, हे किती सोपे...!

भ्रष्टाचाराने मिळतो पैसा, मिळते सुख
तेवढ्याच वेगाने पदरी येते दुःख...

**डॉ.यु.ए. खाडिलकर**
**इतिहास विभाग**




## आणि कृष्ण भेटला......

यावर्षी दिवाळीच्या सुट्टीत आम्ही ओरिसामध्ये पुरी, भुवनेश्वर या ठिकांणाना भेट देण्याचे ठरवले. आणि त्यानुसार २ नोव्हेंबर २०२४ ला भुवनेश्वरला आलो.पुरी बघितलं, जगन्नाथाचे दर्शन घेतले, आजूबाजूचा परिसर बघितला. आता आजचा दिवस आमच्या टूरमध्ये कोणार्कचे सूर्य मंदिर बघण्याचा होता.

कोणार्कला निघाल्यापासूनच विनायक,- माझा नवरा "मला कृष्णा मुदलीला भेटायचयं" असं म्हणत होता. मग मी आणि माझ्या मुलाने उत्सुकतेने विचारल, "कोण हा कृष्णा?" तर उत्तर मिळालं "१९९८ सालापासून साधारण सहा वर्ष हॉटेल 'आमंत्रण' मध्ये वेटर म्हणून काम करणारा मुलगा!" "अरे मग एवढया मोठ्या कोणार्क मध्ये त्याला कसं शोधायचं?" पण विनायक हट्टालाच पेटलेला, "नाही मी त्याला शोधून काढणारंच!"

म्हटल; "असं काय आहे त्या कृष्णाच्यात? घेतलं ना आपण जगन्नाथाचे दर्शन, मग आता हा कृष्ण कशाला?" मग विनायकने सांगायला सुरूवात केली. ''हा कृष्णा १९९८ साली हॉटेल 'आमंत्रण' मध्ये वेटर म्हणून काम करत होता. साधारण सहा वर्ष त्याने प्रामाणिकपणे, इमाने इतबारे, हॉटेलमध्ये सुट्टी न घेता काम केलं. तसेच विनायकला मॅनेजर म्हणून ज्या काही अडीअडचणी यायच्या व कामात काही ड्युटी अॅडजस्टमेंट कराव्या लागायच्या, त्या सगळ्याकरता हा कृष्णा नेहमी तयार असायचा. विशेष लक्षात राहण्यासारखी गोष्ट म्हणजे सहा वर्षांत आजारी पडल्याशिवाय कधीही त्याने सुट्टी घेतली नाही. आणि तो न चुकता कृष्णाच्या मूर्तीला तुळस वाहायचा.'' विनायकला एवढं माहित होतं की, हा कृष्णा कोणार्कच्या सूर्य मंदिरात फोटोग्राफी करतो. मग काय आम्ही सगळे लागलो कामाला.

सूर्य मंदिर बघायला बरोबर गाईड घेतला. गाईडला म्हटलं आम्हाला कृष्णा मुदलीला भेटायचंय. गाईड म्हणतो अशा नावाचा कोणी फोटोग्राफरच नाही इथे. मग म्हटलं, "झालं, आता कसं शोधणार? ठीक आहे,बघू भेटला तर भेटला ! या आशेने आम्ही इतर फोटोग्राफर्सना विचारत होतो. तेवढयात एकजण म्हणाला, कृष्णा नाम का कोई नही है, लेकिन हरिया मुदली नाम का एक फोटोग्राफर है!" झालं मग कृष्णाला सोडून आम्ही हरियाला शोधायला लागलो. नंतर सूर्य मंदिर बघता - बघता आम्हाला हरिया मुदली सापडला. थोडासा आशेचा किरण पल्लवीत झाला. हरियाला विचारलं, "कृष्णा मुदली है क्या इधर ?" हरिया म्हणतो, ''हा है ना ! फोटोग्राफी करना उसने छोड दिया. अभी वो नजदीक के हॉटेल मे काम करता है.'' म्हटलं, ठीक आहे. त्याने हॉटेलचं नाव सांगितलं. त्याप्रमाणे आम्ही सूर्य मंदिर बघितल्यावर हॉटेल शोधायला लागलो. शोधत - शोधत सांगितलेल्या हॉटेलपर्यंत आलो. आधी विचारपूस केली कृष्णा मुदलीबद्दल हॉटेलमधला एक जण म्हणतो, "हो इथे आहे." दुसरा म्हणतो, "नही इधर ऐसा कोई काम करता ही नही. मग काय पुन्हा शोधाशोध सुरू झाली. कोणी सागितलं, "त्याचं क्राफ्टचं दुकान आहे." म्हणून आम्ही सगळी बाजारपेठ शोधत शोधत पालथी घातली. मग एक जण म्हणाला की नाही. त्यांच फोटोग्राफच दुकान आहे. म्हणून परत फोटो स्टुडिओ शोधायला लागलो.

हे संगळं करत असताना आमचा सोळा वर्षांचा श्रीपाद मात्र पुरता वैतागला होता. "काय बाबा कुठे त्या माणसाला शोधता ? किती वर्ष झाली त्याने तुमचं काम सोडून, तो भेटल्यावर तुम्हाला ओळखणार तरी आहे. का? कुठे शोधत बसता, चला मी खूप दमलोय, आपण निघून जाऊया.. हॉटेलवरती." असे संवाद आमच्यात चालू होते. पण विनायकला

मात्र त्या कृष्णाला भेटायचं होतं. ही सगळी शोधाशोध करत असताना विनायकची त्याच्याबद्दल असलेली अॅटॅचमेंट,त्याला भेटण्याकरता लागलेली ओढ स्पष्ट दिसत होती. ''एवढं काय त्याला भेटायचंय...'' असाही प्रश्न आमच्याकडून विचारला जात होता. त्याचे उत्तर एकच होते की, त्या कृष्णाने अतिशय प्रामाणिकपणे सहा वर्ष काम केलंय. ७०% स्टाफ हा ओरिसा मधलाच होता. हे सर्व कामगार बिना सुट्टी अतिशय मेहनतीने, प्रामाणिकपणे दिवसातले १५ते १७ तास काम करत असत. हे सर्व कामगार त्यांच्या ओरिसा राज्यामध्ये असलेली प्रचंड गरिबी, बेरोजगारी, निरक्षरता बोलता – बोलता कधीतरी सांगून जात असत. हे सर्व सहानुभुती मिळवण्यासाठी नसून त्यांची असलेली परिस्थिती नकळतपणे विनायकला समजून येत असे. या सर्व प्रतिकूल परिस्थितीत, एवढ्या लहान वयात, स्वत:च्या गावापासून एवढ्या दूर, जिथे आपलं कोणीच नाही अशा ठिकाणी प्रामाणिकपणे काम करणं, याचं विनायकला विशेष कौतुक वाटायचं. म्हणून त्याला त्या कृष्णाला भेटायचं होत. अखेर वेगवेगळया दुकानांमध्ये चौकशी करून, हॉटेल मध्ये चौकशी करून एका हॉटेलमध्ये आम्हाला कृष्णाचा पत्ता सापडला. अखेर त्या हॉटेल मालकाला, आम्हाला येत असलेल्या हिंदीमध्ये आणि त्याला समजत असलेल्या हिंदीमध्ये आम्ही कुठून आलो आहोत? आम्हाला कोण पाहिजे आणि का पाहिजे ? हे समजावून सांगण्यात आम्ही यशस्वी झालो व लागलीच त्याने कृष्णा काम करत असलेल्या हॉटेलमध्ये फोन करून कृष्णाला बोलवून घेतले. आणि अखेर कृष्णा आला.

कृष्णा आल्यावर त्याला माझ्या नवऱ्याला, विनायकला ओळखायला काही मिनिटे मात्र गेली. कारण या वीस वर्षात विनायकच्या केसांनी बऱ्यापैकी माघार घेतली असल्यामुळे त्याच्या चेहरे पट्टीत, दिसण्यात थोडा बदल झाला आहे. पण काही वेळ जाताच आणि विनायक ने काही संदर्भ देताच. त्याने आमच्याशी शुध्द मराठीत बोलायला सुरूवात केली. त्याने दुसऱ्याच्या हॉटेलमध्ये देखील आमचे उत्तम प्रकारे आदरतिथ्य केले. तसेच तो आमच्या लग्नाच्या वेळी हजर असल्याचे देखील आठवणीने सांगितले. भेट झाली, बोलचाल झााली, जुन्या आठवणींना उजाळा मिळाला, त्यांची मुलं मोठी होऊन चांगली शिक्षण घेत असल्यांचं ऐकून विनायकला खूप बरं वाटलं व आम्ही निघालो. आम्ही निघताच त्याने कोणार्कच्या सूर्य मंदिर परिसरातल्या बाजारपेठेतून भेटवस्तू घेऊन जाण्याचा आम्हाला आग्रह केला. आजुबाजूच्या दुकानदारांना अभिमानाने सांगत होता, ये मेरा सेठ है. मुबंई के हॉटेल का। ऐकून बरं वाटलं. हे सांगताना त्याच्या डोळ्यात आनंदाची व अभिमानाची चमक स्पष्टपणे दिसत होती. त्याने नाही — नाही म्हणत असून सुध्दा भेट दिलीच. अखेर बोलत – बोलत आम्ही आमच्या कार जवळ आलो. कारमध्ये बसायच्या आधी, ''अरे शेठ एक फोटो काढूया?'', असं म्हणत फोटोही काढला गेला. आम्ही कार मधून निघून जाईपर्यंत मागे हात हलवत, "नीट जा — सुखरूप जा" असे म्हणणारा कृष्णा दिसत होता. या प्रसंगाातून कृष्णा व विनायक मधील नाते मालक व नोकर एवढेच सीमित नसून त्यापलीकडेही असल्याचे स्पष्ट दिसून येत होते. विनायकला त्याला भेटायची लागलेली ओढ व भेट झाल्यानंतर कृष्णाने विनायक प्रति दाखवलेला आदर हा निश्चितच माणुसकीचे व प्रेमाचे नाते दाखवणारा होता.

सरते शेवटी मी या प्रसंगातून एवढेच सांगीन, जातीभेदा पलीकडे जाऊन माणसाने माणसाशी माणुसकीने केलेले वर्तन हे २५ वर्षानंतर, हजारो किलोमीटर दूर असूनही लक्षात राहणे, ही विशेष बाब म्हटली पाहिजे.......

**— प्रा.सौ.वैदही विनायक जोशी (वनस्पतीशास्त्र विभाग)**



## उत्सव मनातला...

हिंदू नववर्षाची सुरूवात ही चैत्र मासाच्या आगमनाने होते. आता या महिन्यात जरी ऊन्हाचा ताप जाणवत असला तरी सृष्टीला पल्लवित करण्याची, फुला- फळांना बहरास घालण्याची सृजनशीलताही याच मासात आहे. यासोबतंच हा महिना जत्रा - यात्रांचा, अध्यात्मिक क्रियाकलापांचा, चैतन्याची बरसात करणारा आहे.

माझ्या बालपणीच्या खुप हृघ्य आठवणी या चैत्र महिनयासोबत जोडलेल्या आहेत. कारण या चैत्र मासात आमचा ग्रामदेवता म्हणजे म्हसोबा देवाचा ज्याला आम्ही आदराने 'मोठा देव' म्हणतो, त्या माझ्या देवाचा उत्सव असतो. हनुमान जयंतीच्या दिवशी होण्याऱ्या या उत्सवाच्या निमित्ताने माझ्या छोटयाश गावाला उत्साह , आनंद आणि चैतन्याचं जणू भरतं येतं असे.

गावाबाहेर वस्ती असणाऱ्या आमच्या या मोठया देवाच्या मंदिराची एक खासियत आहे. आमच्या देवाला बंदिस्त राहणे आवडत नसल्याने मंदिराला भिंती नाहीत... जर भिंती बांधायचा प्रयत्न केलाच तर काही ना काही कारणाने त्या ढासळून पडतात, अशी वंदता आहे. मंदिराच्या एका बाजूला शेती, तर एका बाजूला खाडी आणि मध्ये प्रशस्त मंदिर, असा एकंदर या मदिराचा थाट आहे. तर अशा या विलक्षण मंदिरात आमची ग्रामदेवता आणि तिचे सहकारी लालबुंद शेंदुर लेऊन शिळेच्या रूपात वास्तव्यास आहेत. उत्सवाच्या दिवशी तर आमच्या या देवाचं रूप काही निराळंच भासतं. पांढरं धोप धोतर त्यावर तशीच शुभ्र टोपी घालून कुणी वडीलधारी व्यक्तीचं आसनस्थ झाल्याचा भास पाहणाऱ्याला होत राहतो.

हा मोठा देव म्हणजे नुसती आमची ग्रामदेवता नाही,तर आमच्या ग्रामरूपी कुटुबांचा प्रमुख, आमचा रक्षणकर्ता असत्याची आमची श्रध्दा आहे... पूर्वी दररोज रात्री घुंगराच्या काठीचा आवाज संपूर्ण गावात घुमत असायच म्हणे ... म्हणजेच देवाचा गावाभोवती जागता पहारा असल्याची ती साक्ष असल्याची आठवण आमचे वाडवडील आजही सांगतात. तर असा हा आमचा देव खुप मायाळू.... कुठल्याही संकटात मनापासून हाक मारली की तत्क्षणी मदतीसाठी तो धावुन येतोच, अशी आमची निस्सिम श्रद्धा! केवळ आम्हा गावकऱ्यांयाच नाही तर प्रत्येक शरणागताच्या हाकेला तो ओ देतोच..... म्हणुनंच चैत्रात होणाऱ्या मोठया देवाच्या उत्सवासाठी मुंबईच्या टोकापासुनचे पै पाहुणे आमच्या गावी आवर्जुन हजेरी लावतात.

अगदी पहाटेपासून रात्रीपर्यत देवाला अजिबात उसंत नसते. मग कुणी नारळाचे तोरण, कुणी सोनं – चांदी कुणी पितळी घंटा तर कुणी आपल्या ऐपतीनुसार पैसे दानपेटीत टाकून आपली देवाप्रतीची कृतज्ञता व्यक्त करताना दिसतात.पण या सगळयात एका विशिष्ट प्रकारे देवाला बोललेला नवस फेडण्याची प्रथा पूर्वापार चालत आलेली आहे. ती म्हणजे मंदिराच्या कळसावर कोंबडा उडविला जातो.तसंच काही धनिक मंडळी देवाला बोकड अर्पण करतात. आताच्या आधुनिक काळात बऱ्याचजणांना ही प्रथा अमानुष वाटू शकते.पण वाडवडिलांची श्रध्दा यासोबत जोडली गेली असल्याने, ज्यांच्या आयुष्याची संध्याकाळ जवळ येऊन ठेपली आहे, अशा आपल्या वडीलधाऱ्यांना शहाणपण शिकवून त्यांच्या श्रध्दाळू

हळव्या मनाला दुखावण्याचं धारिष्टय कुणातही नसल्याने कदाचित ही प्रथा आजतागायत सुरू आहे.

याचसोबत आमच्या मोठया देवाला खोडा फेडीचा नवस खुप प्रिय आहे. म्हणजे काय तर पारिंग्याचा झाडाच्या लाकडापासून हाता- पायात अडकवण्यासाठी एक बेडी तयार केली जाते.त्याचा नवस असेल त्याच्या हातापायात ती अडकवली जाते. त्याला तसंच चालत - चालत मंदिरात आणलं जातं आणि तिथं देवासमोर ती बेडी त्याच्या हाता- पायातून काढून मंदिराच्या मागे असलेल्या झाडावर लटकवली जाते.याचा अर्थ असा की सर्व संकटातून देवाने भक्ताची सुटका केली आहे. तर असे हे नवस फेडण्याचे विधी रात्रीपर्यंत मोठया उत्साहात सुरू असतात आणि त्यानंतर उत्सवाची सांगता होते.

माझ्या लहानपणी तर या उत्सवाच्या श्रीमंत थाट काही औरंच असायचा. घराघरातुन आठवडाभर अगोदर लोक उत्सवाच्या निमित्ताने येणाऱ्या आपल्या पै पाहुण्यांच्या स्वागताच्या तयारीला लागायचे. माझ्या आजीची तर एकच धांदल उडायची. तिच्या लेकी – जावई नातवंड उत्सवासाठी गावी येणार असल्याचे मग त्यांच्या आवडीचा स्वंयपाक करायच्या सूचना आठवडाभर आधीपासूनंच आजी तिच्या सुनांना द्यायची.... त्यातंच तिच्या भोळया श्रध्देने आणि देवारील अपार विश्वासापोटी तिने कुणा ना कुणी साठी नवस बोललेला असायचं... मग तो पूर्ण करण्यासाठीची वेगळीच धांदल असायची इतकं करेतोवर पाहुणे मंडळी घरी येऊन ठेपायची.मग काय बघतायं, आमचं छोटसं घरं अनामिक चैतन्यानं बहरून जायचं.आजी मनोमन सुखावायची. पण तितक्यात तिला नवसाची आठवण यायची ... मग आधी देवळात जाऊन येण्याचं फर्मान आजी सोडायची. आणि ते शिरसावंद्य मानून आम्हा लेकराबाळांची पलटण जाणत्या माणसाकडे देवळाकडे कुच करायची. जाताना पुन्हा आजी थांबवायची आणि नातवंडाना तिला मिळणाऱ्या पेन्शमधले पाच – पन्नास रू. जत्रेची वाटणी म्हणून द्यायची. हेच आम्हाला हवं असायचं. मग चेष्टा -मस्करी करत आम्ही सगळे देवळात जायचो. तिथे पोहोचेतोवर रस्त्यात कुणा भाविकाने पाथस्थांची तहान भागविण्यासाठी ठेवलेल्या सरबताच्या टाकीतले चार – दोन ग्लास सहज आमच्या पोटात रिचायचे.तोबा गर्दीला पार करत करत आम्ही अखेर गाभाऱ्यात जाऊन पोहचायचो.... गर्दीतही देवाला क्षणभर न्याहाळून देवळाभोवती प्रदक्षिणा घालून मग उन्हात जत्रेत भटकून आजीने दिलेल्या वाटणीची विल्हेवाट लावून भुकेल्या पोटाने घरी परतायचो.... आणि गप्पाष्टकांच्या सोबतीने पंगतीची रंगत वाढीस लागायची. सगळे पै – पाहुणे थोडीफार विश्रांती घेऊन तृप्त मनाने आपापल्या घरी रवाना व्हायचे.

आज आजी आमच्यात नाही.... पाहुणेमंडळींचंही गावाकडे येणं –जाणं कमी झालंय ...... उत्सवाचं स्वरूपही बदललंय... पण आमचा मोठा देव आणि त्याच्यावरची आमची श्रध्दा कायम अबाधित राहिल .... आमच्या येणाऱ्या पुढच्या पिंढयांना अभिमानाने या श्रध्देचे दाखले आम्ही देत राहू हे नक्की ...! आणि श्वासात श्वास असेतोवर या आमच्या ' 'मनातील उत्सवा' च्या ह्यद्य आठवणी अभिमानाने मिरवत राहू हे नक्की!

**— प्रा.सुप्रिया अरुण धुमाळ**
**मराठी विभाग**




## भारतातील पहिल्या महिला डॉक्टर – आनंदीबाई जोशी...

ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडण्याची परवानगी नव्हती.त्या काळात वैद्यकशास्त्र शिकण्यासाठी परदेशात जाऊन भारतातील पहिल्या महिला डॉक्टर बनण्याचे श्रेय आनंदीबाई गोपाळराव जोशी यांना जाते. १९ व्या शतकात केवळ पतीच्या इच्छेसाठी साऱ्या समाजाचा रोष व विरोध पत्करून ही महिला शिकली व पुढे अमेरिकेत जाऊन वैद्यकीय क्षेत्रातील 'डॉक्टर' ही पदवी मिळवली. आनंदीबाई जोशी यांचा जन्म ३१ मार्च १८६५ रोजी पुण्यात त्यांच्या आजोळी झाला. त्यांचे पूर्वीचे नाव यमुना होते.गणपतराव अमृतेश्वर जोशी यांच्या त्या जेष्ठ कन्या होत्या. वयाच्या ९ वर्षी त्यांचा विवाह गोपाळराव जोशी यांच्याशी झाला. गोपाळराव आंनदीबाईपेक्षा २० वर्षांनी मोठे आणि विधूर होते. ते कल्याणच्या पोस्ट कार्यालयात कारकुन होते. लग्नानंतर प्रथेप्रमाणे गोपाळरावांनी यमुना नाव बदलून 'आनंदी' असे ठेवले.

गोपळराव स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे,या विचारांचे होते.गोपाळरावांनी आनंदीबाईना शिक्षण देण्याचा चंगच धरला होता. वयाच्या १४ व्या वर्षी आनंदीबाईनी एका मुलाला जन्म दिला. परंतु वैद्यकीय उपचार न मिळाल्यामुळे मूल फक्त १० दिवस जगले. हा आनंदीबाईंच्या जीवनातील एक महत्वाचा टप्पा ठरला. या घटनेनंतर त्यांनी डॉक्टर होण्याचे ठरविले. गोपाळरावानी त्यांना मिशनरी शाळांमध्ये प्रवेश मिळावा म्हणून प्रयत्न केला. जोशी यांनी कलकत्याला बदली घेतल्यावर तेथे आनंदीबाई संस्कृत आणि इंग्लिश वाचणे आणि बोलणे शिकल्या . गोपाळराव कल्याणच्या पोस्ट ऑफिसात कारकून होते. नंतर त्यांची अलिबाग येथे आणि नंतर कलकत्ता येथे बदली झाली. ते एक पुरोगामी होते आणि त्या काळातही त्यांचा महिला शिक्षणाला पाठिंबा होता. आपल्या पतीवरील विश्वास व त्यांची कार्यावरील निष्ठा यामुळे आनंदीनेही हे शिक्षणाचे व्रत स्वीकारले व त्या दोघांमध्ये पती – पत्नी पेक्षा गुरू – शिष्याचे नाते अधिक दृढ झाले. पत्नीने वैद्यकीय शिक्षण घेऊन डॉक्टर बनावे असा त्यांचा आग्रह होता. अमेरिकेत काही ठिकाणी पत्र व्यवहार करून आनंदीबाईंना डॉक्टर करण्यासाठी गोपाळरावांनी मोठे प्रयत्न केले. मात्र वैद्यकीय शिक्षण घ्यायचे असल्यास खिश्चन धर्म स्वीकारण्याची अट होती. गोपाळ जोशी हे कट्टर हिंदू धर्मीय होते. त्यामुळे मोठया चिकाटीने प्रयत्न करून आनंदीबाईंना १८८३ मध्ये वयाच्या १९ व्यावर्षी ख्रिस्ती धर्म न स्वीकारता ' पेन्सिल्व्हिया ' येथील वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवून दिला. त्यानंतर त्यांचे वैद्यकीय शिक्षण सुरू झाले.

४ जून १८८६ रोजी त्यांनी अमेरिकेच्या भूमीवर पाय ठेवला व मिसेस कार्पेंटर यांच्या घरी राहू लागल्या. पुढे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी अभ्यासाची कास सोडली नाही व वैद्यकीय शिक्षणाची पदवी घेतली.११ मार्च १८८६ रोजी त्यांचा पदवीदान समारंभ झाला. व त्यांना एम डी ही पदवी मिळाली. ए.म.डी साठी त्यांनी ' हिंदु आर्य लोंकामधील 'प्रसुतिशास्त्र' या विषयावर निबंध लिहला.

अखेर ९ ऑक्टोबर १८८६ रोजी ' इटसरिया' या बोटीने हे दांपत्य भारताकडे परत येण्यास निघाले. कष्टमय जीवनाच्या अतिरेकाने आनंदीबाईंना क्षयरोगाने त्रासले होत. अपल्या मायदेशात परत आल्याचा आनंद त्यांच्या मुखावर दिसत होता. पण शरीर मात्र थकले होते. शिक्षण घेऊन डॉक्टर होण्याचे आनंदीबाई व गोपाळरावांचे स्वप्न पूर्ण झाले.त्या कोल्हापूर

मधील 'अल्बर्ट एडवर्ड' हॉस्पिटल मध्ये स्त्री- रोग तज्ञ म्हणून काम पाहत होत्या. पण समाजाची, लोकांची सेवा करण्याचे आनंदीबाईचे स्वप्न पूर्ण झाले नाही. डॉक्टरची पदवी घेतल्यानंतर वर्षभरातच २६ फेब्रुवारी १८८७ रोजी त्याचे निधन झाले. आणि भारताने एका गुणवान, कर्तृत्ववान महिला डॉक्टरला (आनंदीबाईच्या रूपाने) गमावले.

**— प्रांजल परशुराम सांगळे**
**टी.वाय.बी.ए.(मराठी)**



## महानुभाव पंथ

- **महानुभाव पंथ व त्यांचे वाङ्मय:-**

महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाची भरभराट होण्यापूर्वी महानुभाव पंथाचा उदय झाला होता. महानुभाव पंथाच्या उदयाच्या काळात महाराष्ट्रात व्रत-वैकल्यांना ऊत आला होता. अंधश्रद्धा बोकाळली होती. यज्ञयाग व क्षुद्र देवतांच्या उपासनेत समाज रमला होता, उत्तरेत इस्लामी सत्ता स्थापन झाली होती. स्वकीय समाज खऱ्या धर्मापासून वंचीत झाला होता. धर्मज्ञान संस्कृत भाषेतच अडलेले होते. जैन, नाथ, लिंगायत, बौद्ध इ. धर्म-पंथ आपले विचार मांडत होते. कर्मकांडाना अधिक महत्त्व आले होते. खऱ्या धर्मावरचा लोकांचा विश्वास उडाला होता. द्वैत-अद्वैत, ज्ञानयोग, कर्मयोग अशा विभिन्न प्रणाली समाजात होत्या. समाजाची घडी सुस्थितीत आण्यासाठी नव्या विचार धारेची समाजाला गरज भासू लागली. अशा समाजाला मार्ग दाखविण्यासाठी चक्रधारांनी महाराष्ट्रात महानुभाव पंथाची स्थापना केली.

- **महानुभाव पंथाची स्थापना व संस्थापक :-**

गुजरातमध्ये भडोच या गावतील त्रिमल्लदेव राजाचा विशालदेव हा प्रधान होता. या प्रधानाचा मुलगा हरपाळदेव म्हणजेच पुढे प्रसिद्ध झालेले महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर होत. पत्नीबरोबरच्या राज विलासात त्यांचे तारूण्य जात होते. वयाच्या २७ व्या वर्षी त्यांचे एकाकी निधन झाले. नाथपंथी सिद्धपुरूष चांगदेव राऊळ यांनी हरपाळदेवाच्या मृत शरीरात प्रवेश केल्याने ते पुन्हा जिंवत झाले. अशी अख्यायिका सांगितली जाते. पुढे जुगारातील (पैसा) द्रव्यनाश व पत्नी कमलादेवी हिच्याशी न पटल्याने त्यांनी गृहत्याग केला.

महाराष्ट्रात भटकंती करताना रामटेक इथे ऋद्धिपुरचे श्री गोंविदप्रभू यांच्याशी चक्रधरांची गाठ पडली. त्यांनीच हरपाळदेवाला 'चक्रधर' असे नाव दिले. त्यानंतर सुमारे १२ वर्षे चक्रधरांनी तपश्चर्या केली. त्यानंतर बराच काळ त्यांनी महाराष्ट्रात भटंकती केली. त्यांच्या आयुष्यातील येथून पुढील ८ वर्षे अत्यंत महत्त्वाची ठरली. या काळातच स्त्री-पुरुषांचा प्रचंड जनसमुदाय त्यांच्या भोवती जमला. हजारो गावांतुन त्यांनी भ्रमण केले. व्याख्याने, चर्चा, कीर्तने यांतून त्यांचा शिष्य समुदाय वाढतच गेला. याच ८ वर्षात महानुभाव पंथाची स्थापना त्यांनी केली आणि त्याचा प्रचार त्यांनी केला.

- **पंथाचा आचारधर्म :-** पंथात समाविष्ट झालेल्यांना काही नियमांची भाक दयावी लागते.

उदा. १) भिक्षान्न हेच पवित्र मानावे त्यात निवड करु नये.

२) नवे वस्त्र नेसू नये.

३) जेविता आवडीगोडी न करावी.

हा आणि अशा स्वरुपाचा या पंथाचा आचारधर्म होता. या नियमांवरुन चक्रधर कठोर शिस्तीचे होते हे लक्षात येते. शिष्यांना त्यांनी कमालीची शिस्त लावली होती असे असले. तरी चक्रधरांचे अंत:करण अत्यंत कोमल होते. शिष्यांबद्दल त्यांना कळवळा होता. ते मुलांत मूल व मोठयात मोठे होत. त्याची वृत्ती खेळकर व विनोदी होती. ते शिष्यांची चेष्टा मस्करीही करत. पूर्ण अहिंसक वृत्तीच्या चक्रधरांची **'मुंगीलाही मारु नये'** अशी शिकवण होती. चक्रधरांचे व्यक्तीमत्त्व अशा विविध गुणांनी परिपूर्ण असल्याने त्यांच्याभोवती मोठा शिष्य परिवार गोळा झाला. त्यात सामान्य माणसांपासून विद्वान पंडीत यांच्यासह राज घराण्यातील माणसेही गोळा झाली व त्यामुळे एक महत्त्वाचा संप्रदाय व त्यांनी विपुल साहित्य निर्मिती केली.

- **महानुभावीयांचे तत्त्वज्ञान:-**

महानुभाव पंथ द्वैत मताचा पुरस्कार करणारा होता. जीव, जगत, परमेश्वर यांचे परस्परांशी कधीच प्रेम होत नाही, असे या ग्रंथाचे द्वैती तत्वज्ञान आहे. महानुभाव तत्वज्ञानानुसार पुढील ४ पदार्थ नित्य व स्वंतत्र आहेत. १) जीव २) देवता ३) प्रपंच ४) परमेश्वर हे चार नित्य व स्वंतत्र तसेच अनादि व अनंत पदार्थ आहेत. या पदार्थांचे ज्ञान पुढे हे या तत्त्वज्ञानाचे साध्य आहे. **“जीव: देवता: परमेश्वर: आणि प्रपंच: हे जैसे असे ते तैसे जाणिजे.”** असे चक्रधरांचे सूत्र आहे.

यापैकी प्रंपच हा जड आहे. देवता या नित्य तर परमेश्वर नित्यमुक्त आणि जीव मात्र बद्धमुक्त आहे. म्हणजे अनादिकालापासून अविद्येने बद्ध असला तरी मुक्त होण्याला पात्र आहे. मात्र ईश्वर स्वरुपाची प्राप्ती होऊन जीव मुक्त झाला तरी तो जीवचं राहतो. ईश्वर किंवा ब्रम्ह होत नाही. यांचाच अर्थ हे तत्त्वज्ञान द्वैती आहे. त्यात जीव आणि ईश्वरांचे ऐक्य अभिप्रेत नसून द्वैत अभिप्रेत आहे. वरील ४ पदार्थ पूर्णपणे स्वंतत्र असून त्यांचे ऐक्य केव्हाही शक्य नाही.

या तत्त्वज्ञानाला एक सामाजिक बाजू आहे. यादवकालीन महाराष्ट्रात निरनिराळी दैवते व त्यांच्या प्रीत्यर्थ करायची व्रतवैकल्ये यांचे बंड माजले होते. ते मोडून काढायचे तर देवता म्हणजे ईश्वर नाही असे कोणी तरी ठासून सांगणे आवश्यक होते. व चक्रधरांनी ते सांगितले. मोक्षदाता परमेश्वर एकच आहे. दुसरे कोणीही नाही. हा सिद्धांत म्हणजे महानुभाव संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. चक्रधरांनी सर्व देवतांना हिने लेखले स्त्रीशुद्रांनासुद्धा मोक्षाचा अधिकार आहे. असे आवर्जुन सांगितले आणि **‘ऐक्य परमेश्वर’** या सिद्धांताचा गौरव केला.

- **महानुभावीयांचा मराठीचा स्वीकार, आग्रह, गौरव:-**

महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी मुळचे गुजरातचे असले तरी महाराष्ट्र ही यांची कर्मभूमी असल्याने त्यांना मराठी भाषेचा आश्रय घ्यावा लागला. त्यामुळे मराठी ही त्यांची धर्म भाषा झाली. स्वत: चक्रधरांनी मराठीचा पुरस्कार एका विशिष्ट धोरणांने केला. त्यांना आपल्या विचारांचा प्रसार सर्वसामान्य लोंकामध्ये करायचा होता. हया कामासाठी त्यांना मराठीचा स्वीकार करणे भाग होते.व तो त्यांनी मोठया प्रेमाने, आंनदाने केला. चक्रधरांचे हे भाषा विषयक धोरण नागदेवचार्यांनी निष्ठेने पुढे चालविले. एकदा केशीराजांनी संस्कृत मधून ग्रंथ लिहिण्याची इच्छा व्यक्त केली. यावेळी नागदेवाचार्य त्यांना म्हणाले, **“ नको गा केशवदेवा येणे माझीया म्हातारिया नागवतील.”** म्हातारी म्हणजे संस्कृत न जाणणरी साधी भोळी व अशिक्षित मराठी माणसे होय.

दुसरा एक प्रंसग त्यांचा मराठीच्या आग्रहा विषयीचाच आहे. एकदा केशीराजांनी नागदेवचार्यांना संस्कृतमध्ये प्रश्न केला असता. त्यांचे उत्तर न देता **“ तुमचा अस्मात कस्मात मी नेणे, गा, मज श्रीचक्रधरे निरुपली मऱ्हाठी तियांची पुसा:”** असे सांगितले. हे दोन प्रसंग नागदेवचार्यांचे भाषाविषयक धोरण स्पष्ट करण्यास पुरेसे आहे.

मराठी भाषेचा गौरव महानुभाव कवींनी अनेक ठिकाणी केला आहे. नरेद्रांने **‘रूक्मिणी स्वंयवरात’** मराठीला **‘पुण्यवान’** या विशेषणाने गौरविले आहे. नारायण बास याने मराठीला **‘देववाणी’** म्हटले आहे. १५ व्या शतकातील संतोषमुनी कृष्णदास या कवीनेही आपल्या **‘रूक्मिणी स्वंयवर’** या काव्यात मराठी भाषेला सर्व भाषांची जननी म्हटले आहे.

**— श्रृतिका मंगेश राणे**

**T.Y.B.A (मराठी)**




## NSS कॅम्पचा अनुभव...

NSS कॅम्प...माझ्या जीवनात हा कॅम्प फक्त एक वर्षासाठी आला होता. कॅम्प ला जाण्याची माझी मनापासून इच्छा होती. कारण मला या कॅम्पचा अनुभव घ्यायचा होता माझ्याकडून थोडंतरी समाजकार्य घडेल, यासाठी मी कॅम्पला जायचं ठरवलं होतं.

कॅम्पच्या ठिकाणी पोहचताच आजुबाजूचा परिसर पाहून मन प्रसन्न झाले. सुरूवातीला तिथला परिसर स्वच्छ करून सर्वांचे वेगवेगळे गट करून प्रत्येक गटाला ग्रंथांची नावे द्यायचे ठरले व वेगवेगळी कामे वाटून दिली. ज्या गोष्टी कधी करण्याचा प्रयत्नच केला नाही, त्या गोष्टी या कॅम्पमध्ये करायला मिळाल्या. नाटकात भाग घेणे, मनोगत व्यक्त करणे, पुष्पगुच्छ तयार करणे, गाणं म्हणणे, रांगोळी काढणे, जेवण बनवणे, साफसफाई करणे, ग्रंथदिंडी काढणे, पुल बांधणे.. खरंच खूप काही या 'विशेष निवासी शिबिरात' शिकायला मिळालं. 'बापुजी देवस्थान', तेथे वसलेलं छोटसं 'सावरसई गावं', सुंदर वातावरण, इकडे — तिकडे झाडे, पक्षी, तलाव असा हा परिसर होता. सकाळी लवकर उठणे, धावणे, नियमित व्यायाम करणे, त्याचबरोबर स्वच्छता करणे हा तिथला रोजचा दिनक्रम असायचा.

आम्ही दरदिवशी वेगवेगळया पाहुण्याचं स्वागत करायचो, त्यांच मार्गदर्शन ऐकायचो व त्यांचे विचार आत्मसात करण्याचा प्रयत्न करायचो. खरंच NSS चा कॅम्प भाग्यवान असणाऱ्यानांच मिळतो आणि मला हा कॅम्प मिळाला व कॅम्पमधून मी खूप काही शिकले. प्रा. डॉ. माळवे सरांनी हा NSS कॅम्प काय असतो, हे पटवून दिले. श्री.सागर मेस्त्री सरांनी गिधाड संवर्धन याबद्दल चांगली माहिती दिली. त्यांनी वेगवेगळया पक्षांचे आवाज काढून दाखविले.

मा. श्री. किशोर शितोळे सरांच्या व्याख्यानाने मन अगदी भरून आलं. नाट्यप्रशिक्षण नक्की कसं असावं व नाटकात आपली भूमिका कशाप्रकारे असावी, हे त्यांनी नेमक्या शब्दांत मांडले. त्यांनी आमचे मनोरंजनही केले. आमच्यातला आत्मविश्वास वाढवला. अशी कला दाखविली की, सर्वांच्या डोळ्यात पाणी आले. त्यांच्या सोबत असलेले मा. श्री. दर्पण जाधव व मा. श्री. सिद्धेश रघुवीर सरांनीही सर्वांचे मनोरंजन केले.

मा. श्री. सुखद राणे सरांनी गडकिल्ल्यांची महत्त्वपूर्ण माहिती दिली. छत्रपती शिवाजी महारांजानी घडविलेले किल्ले व त्यांचे विचार आम्हांला सांगितले. कॅम्पमध्ये आरोग्य शिबिरही झालं. त्याचबरोबर सावरसई गावात आम्ही वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रमही राबविले. उदा. बंधारा बांधणे, कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पथनाटय सादर करणे,

प्लास्टिक गोळा करणे, ग्रंथदिंडी काढणे... अशा प्रकारच्या मोहिमा राबवून लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम केले.

या कॅम्पने फक्त आनंद नाही तर, जीवन जगायचं कसं, हे शिकवलं. हे सात दिवस कसे गेले काही कळलंच नाही. जणू सात वर्षे आम्ही सोबत आहोत, असं वाटत होतं. नविन मित्र – मैत्रिणी, हा सुंदर निसर्ग, हे सावरसई गावं मी कधीच विसरू शकत नाही. या कॅम्पबद्दल जेवढं बोलावं तेवढं कमीच आहे. मात्र या कॅम्पचा उज्ज्वल भविष्यासाठी नक्कीच उपयोग होईल. हे क्षण मी माझ्या शेवटच्या क्षणापर्यंत लक्षात ठेवेन. खरंच अशा कॅम्पची आम्हाला गरज होती. या कॅम्पमधून आम्ही खूप काही शिकलो व पुन्हा हा कॅम्प करायला मिळावा, असं वाटतंय. जरी हा कॅम्प झाला असला तरी या आठवणी आम्ही कधीच विसरू शकत नाही. NSS Camp हा आपल्या मौल्यवान जीवनाचा पाया आहे. हा आपल्याला खूप काही शिकवून जातो. मी नक्कीच NSS साठी काहीतरी करून दाखवीन...



## महाराष्ट्रातील गड – किल्ले

### ❖ कोरिगड

| | |
|---|---|
| नाव | कोरिगड |
| उंची | १०१०मी /३०००उंच |
| चढाईची श्रेणी | सोपी |
| ठिकाण | पूणे जिल्हयातील लोणावळा |
| जवळचे गाव | आंजवणे /पेठ शहापूर |
| सध्याची अवस्था | चांगली |
| प्रकार | गिरीदुर्ग |

महाराष्ट्रातील पुणे जिल्हयातील लोणावळयाच्या पूर्वेला साधारण २५ कि.मी अंतरावर असणारा हा किल्ला समुद्र सपाटी पासुन सुमारे ३००० फूट उंच आहे. गडाला चारही बाजूने तटबंदी आहे.दक्षिणेकडे बुरूजाची चिलखती तटबंदी आहे.

मुळशी धरणाच्या पश्चिमेला, लोणावळा आणि पाली यांच्या दरम्यान तैलबैला सव्वाष्णी घाटाच्या माथ्यावर कोरजाचे मावळ नावाचा प्रदेश आहे. या मावळात कोरिगड आणि घनगड असे दोन किल्ले आहेत.‘कोळी’हे कोही समाजातील एका पोट जातीचे नाव असल्याने या किल्ल्याला ‘कोरीगड’असे नाव मिळाले. सर्वात महत्वाचे म्हणजे कोरिगड किल्ल्याची अखंड तटबंदी प्रसिध्द आहे. या किल्ल्याला ‘कोराईगड’ आणि ‘शहागड’ अशा नावानेही ओळखले जाते. ‘शहागड’ हे नाव गडाच्या पायथ्याशी असलेला पेठ शहापूर गावावरून मिळाले आहे.

### ❖ गडावरील पाहण्याचे ठिकाण

१) गणेश दरवाजा

किल्ल्याच्या मुख्य दरवाजाला गणेश दरवाजा असे म्हणतात. गणेश दरवाजा हा वैशिष्टयपूर्ण आहे. आणि गोमूखी दरवाजा व चार बुरूजांनी संरक्षित आहे. गणेश दरवाज्यातून आत प्रवेशद्वारातून किल्ल्यावर प्रवेश केल्यावर दोन्ही बाजुला पहारेकऱ्यांसाठी देवळया आहेत.

२)गडमाथा आणि तटबंदी –

किल्ल्यावर प्रवेश केल्यावर भलेमोठे पठार दिसते. गडमाथा दक्षिणोत्तर पसरलेला आहे. या गडाला साधारणत: दीड किलो मीटर तटबंदी, जागोजागी बुरूज आहे.

३) मंदिरे, लक्ष्मी तोफ व इतर ठिकाणे –

गणेश मंदिरातून वर आल्यावर समोरच महादेवाचे मंदिर दिसते.या मंदिराच्या दोन अंगणात ४ तोफा ठेवलेल्या आहेत. मंदिराच्या मागे दोन तलाव आहेत. तसेच वाडयांचे काही अवशेष आढळतात.

कोराई देवीचे मंदिर आहे.देवीच्या मुर्तीची उंची साधारणत: ४ फूट आहे. समोर एक दीपमाळ आहे. त्याच्या बाजुला महिषासुर मर्दिनीची सुंदर मुर्ती दगडात कोरलेली आहे.

## ❖ तिकोना

| | |
|---|---|
| नाव | तिकोना |
| उंची | ३८५० |
| चढाईची श्रेणी | मध्यम |
| ठिकाण | पुणे जिल्हयातील लोणावळा |
| जवळचे गाव | तिकोना पेठ |
| सध्याची अवस्था | चांगली |
| प्रकार | गिरीदुर्ग |

बारा मावळा पैकी एक पवन मावळ व या मावळातील पवना धरणाच्या विस्तीर्ण जलाशयाला लागून गिरीदुर्गाची एक चौकट आहे. किल्ल्याचा त्रिकोणी आकार, प्रचंड कातळात खोदलेल्या लेण्या, इतिहासाचे साक्ष देणारे अवशेष आणि बाले किल्ल्यावर जाणारी उभी चढाई व अरूंद वाट! तिकोना किल्ल्याचे पुर्वीचे नाव ‘ वितंडगड ’ असे होते.

त्रिकोणी आकारा मुळे या गडाला ‘ त्रिकोणीगड ’ असे नाव पडले आहे. हा किल्ला ८०० ते १००० या काळात बांधलेला असावा. त्रिकोना किल्ल्याचा उपयोग पवन मावळ परिसरावर लक्ष ठेवण्यासाठी केला जात असे. या गडाचा इतिहासात फारसा कुठेही उल्लेख सापडत नाही. गडावरील लेण्यावरून या गडाचे अस्तित्व फार प्राचीन असावे. गडावरील लेण्या या कार्ला लेणी व बेडसे लेण्याच्या काळातील कोरलेल्या असाव्यात.

शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्मितीच्या काळात सुरूवातीला जे गड घेतले. त्या पैकी एक किल्ला म्हणजे ‘तिकोना’ गड होय. शिवाजी महाराजांनी या गडाचे नाव ‘ वितंडगड ’ असे ठेवले होते. पुढे औरंगजेबाने दक्षिण स्वारीत पुन्हा किल्ला जिंकला व या गडाचे नाव ‘ अमनगड ’ असे नाव ठेवण्यात आले.

## ❖ तिकोना किल्ल्यावर पाहण्याचे ठिकाण

१) गड प्रवेशद्वार –

गडावर प्रवेश केल्यानंतर डावीकडे वळा.थोडया अंतरावर तुम्हाला पाण्याचे टाके दिसले आणि एका गुहे मध्ये १० ते १५ लोकांची राहण्याची सोय आहे. पण पावसाळयात गुहे मध्ये पाणी भरल्याने गुहा राहण्यास योग्य नसते.

२) पाण्याची टाके आणि किल्ल्याची तटबंदी व बुरूज –

दरवाजातून आत शिरल्यावर उजवीकडे पाण्याची टाकी आणि डावीकडे तटबंदी चा बुरूज दिसतो. थोडे सरळ वर गेल्यावर तुम्हाला दगडात कोरलेले पाण्याचे टाके पाहण्यास मिळतात.पाण्याचे टाके वैशिष्ट्यपूर्णतेने कोरलेले असून आतील भाग रूंद आहे. तसेच खोल आहे व ते पाणी पिण्यायोग्यतेचे आहे.

३) किल्ल्यावरून पाहवयास मिळणारे दृश्य –

बालेकिल्ल्या वरून तुम्हाला समोरच तुंग, लोहगड, विसापूर, भातराशीचा डोंगर, मोर्सचा डोंगर, जांभुळीचा डोंगर, पवनेचा परिसर,तैलबैला गाव, एकोले गाव,फागणे धरण हे सर्व नजरेस पडतात. गडावरून संपूर्ण मावळ परिसर दिसतो.

❖ तुंग

| | |
|---|---|
| नाव | तुंग |
| उंची | ३००० फुट |
| चढाईची श्रेणी | कठीण |
| ठिकाण | पुणे जिल्हया मधील लोणावळा |
| जवळचे गाव | तुंगी |
| सध्याची अवस्था | चांगली |
| प्रकार | गिरीदुर्ग |

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात पुणे जिल्हयाचे महत्व प्रचंड होते.मध्यवर्ती ठिकाण आणि शिवरायांचे वास्तव पुणे जिल्हयात आल्यामुळे जिल्हयाच्या आसापासचा परिसर सुरक्षित ठेवणे गरजेचे होते. घाटमाथ्यावरून ये –जा करताना चौफेर लक्ष ठेवण्यासाठी शिवरायांनी राजगड, तोरणा या गडांसह अनेक छोटे – मोठे गड घाटांवर लक्ष ठेवण्यासाठी उभारले होते. स्वराज्याच्या उभारणीत या सर्व गडांचे विशेष योगदान आहे. या फळीतला एक गड म्हणजे 'तुंग' किल्ला होय.

लोणावळयापासून १२ किलो मीटरच्या अंतरावर 'तुंग' गड आहे.इतर गडांप्रमाणे तुंग गड आहे. या गडाला ' काठीगड ' या नावाने सुध्दा ओळखत जात. तुंग गडाची समुद्र सपाटी पासून उंची १०७५ मीटर इतकी आहे. तिन्ही बाजूंनी गड पवना जलाशयाने वेढलेला आहे. गडावर चढताना एक वेगळाच थरार अनुभवायला मिळतो.

वैभवशाली परंपंरा असलेला हा किल्ला घाट रक्षक दुर्ग म्हणून ओळखला जातो. गडाचा आकार फार मोठा नाही. त्यामुळे गडावर जवळपास २००च्या आसपास सैनिक थांबू शकत असावेत. इतिहासात करण्यात आलेल्या उल्लेखानुसार तुंग इ.स १६०० साली बांधण्यात आला. छत्रपती शिवाजी महारांजांनी हा किल्ला १६५७ मध्ये स्वराज्यात सामील करून घेतला.

❖ **गडावरील पाहण्याचे ठिकाण:–**

गड माथा फारच मोठा किंवा लहान नाही त्यामुळे गड पाहण्यासाठी एक ते दोन तास लागतात. गडावर हनूमानाचे मंदिर आहे. त्याच्याच पुढे गोमुखी रचनेचा दरवाजा आहे. दरवाजातून आत प्रवेश केल्यावर आपण गडाच्या माथ्यावर पोहोचतो. उजवीकडे गणेशाचे मंदिर आहे. मंदिराच्या मागील बाजुस पाण्याचे टाक आहे. येथून बालेकिल्ल्यावर जाणारी वाट आहे. बाले किल्ल्यावर तुंगी देवीचे मंदिर आहे. मंदिराच्या समोरच्या जमीनीत गुंफा आहे. यात पावसाळया शिवाय इतर ऋतुंमध्ये २ते ३ जणांची राहण्याची सोय आहे.

### ❖ घनगड

| | |
|---|---|
| नाव | घनगड |
| उंची | २,५६६ फुट |
| चढाईची श्रेणी | कठीण |
| ठिकाण | पुणे जिल्हया मधील लोणावळा |
| जवळचे गाव | येकोले गाव |
| सध्याची अवस्था | चांगली |
| प्रकार | गिरीदुर्ग |

पुणे जिल्हयातील एक गिरीदुर्ग किल्ला. हा किल्ला 'येकोल्या चा किल्ला' या नावाने देखील ओळखला जातो. येकोले गावातून गडावर जाणाऱ्यात वाटेवर गारजाईचे मंदिर व दीपमाळ दिसते. या मंदिरात गारजाई देवीची स्वयंभू मुर्ती आहे. मंदिराच्या भिंतीवर एक शिलालेख आहे. या मंदिराजवळुन गडावर जाण्यासाठी वाट आहे. चढून गेल्यावर आपल्याला भग्न झालेला प्रवेश दरवाजा लागतो.दरवाजातून किल्ल्याच्या पहिल्या टप्प्यात आपण प्रवेश करतो.दरवाजा समोरच दोन कोरीव गुहा किंवा लेण्या दिसून येतात. लेण्याशेजारून जाणारी वाट किल्ल्याच्या माथ्याकडे जाते. या वाटेवरील पायऱ्या तुटलेल्या असल्याने वाटेवर एक लोखंडी शिडी बसवलेली आहे. शिडी जिथे संपते, तेथे बाजुलाच पाण्याचे एक टाके आहे. कातळातून कडेकडेने चालत गेल्यावर पुढे तीन टाक्यांचा समुह आहे.

किल्ला नेमका कोणी बांधला हे ज्ञात नसले, तरी या किल्लयाचा ताबा प्रथम निजामशाहाकडे आला. पुढे निजामशाही बुडल्यानंतर हा किल्ला आदिलशाहीतील सरदार 'ढमाले - देशमुख 'यांच्या ताब्यात होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी आदिलशाही सरदार असलेल्या ढमाले - देशमुखांना स्वराज्यात सामील करून घेतले. त्याच बरोबर हा किल्ला स्वराज्यात सामील करून घेतला. १६४७ साली किल्ला स्वराज्यात सामील करून घेण्यात आला. १६६५ मध्ये पुरंदरच्या तहात हा किल्ला मोंगलांना दयावा लागला. पुढे छत्रपती शिवाजी महारांजांनी १६७० –७१ मध्ये हा किल्ला जिंकून घेतला. छत्रपती संभाजी महारांजांच्या मृत्यूनंतर १६८९ मध्ये काही काळासाठी या किल्ल्याचा ताबा मराठयांकडे होता.

**— मयुर संजय राऊत**
**एफ. वाय. बी. ए.**



## वनाचा विश्वकोश....

## Encyclopedia of forest...

तुलसी गौडा या कर्नाटक राज्यातील एक पर्यावरण कार्यकर्त्या होत्या. २०२० मध्ये भारत सरकारने त्यांना देशाचा चौथा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'पद्मश्री' देऊन सन्मानित केल गेले. त्यांनी १,००,००० हून अधिक झाडे लावली आहेत. तसेच त्या वनविभागाच्या रोपवाटिकेची नियमित देखभाल करत असत. कोणतेही औपचारिक शिक्षण नसतानाही त्यांनी पर्यावरण रक्षणासाठी मोठे योगदान दिले आहे.त्यांच्या कार्याच भारत सरकार आणि विविध संस्थानी गौरव केला आहे. प्रत्येक जातीच्या झाडाचे मातृवृक्ष ओळखण्याच्या त्यांच्या क्षमतेसाठी त्यांना ' वनाचा विश्वकोश ' ( Encyclopedia of forest ) म्हणून ओळखले जाते.

तुलसी गौडा यांचा जन्म १९४४ मध्ये कर्नाटक राज्यातील उत्तर कन्नड जिल्हयातील होनल्ली गावातल्या हलक्की आदिवासी कुटंबात झाला. कर्नाटक हे लोकप्रिय इकोटुरिझम स्थानांसाठी ओळखले जाते.कारण त्यात पंचवीस पेक्षा जास्त वन्यजीव अभयारण्ये आणि पाच राष्ट्रीय उद्याने आहेत.

तुलसी गौडा यांचा जन्म एका गरीब कुटुबांत झाला होता. त्या २ वर्षाच्या असताना त्यांचे वडील मरण पावले, ज्यामुळे त्यांना आईसोबत स्थानिक पाळणाघरात दिवसा मजूर म्हणून काम करावे लागले. त्या अशिक्षित असल्यामुळे त्यांना लिहिता — वाचता येत नव्हते. तरूण वयात त्यांचे लग्न गोविंद गौडा नावाच्या वृध्द व्यक्तीशी झाले होते, लग्नाला सुरूवात झाली तेव्हा त्यांचे वय किती होते हे त्याच्यासह कोणालाही ठाऊक नाही, परंतु त्याचे वय १० ते १२ वर्ष असावे असा अंदाज आहे. गौडा वयाच्या पन्नाशीत असताना त्यांच्या पतीचे निधन झाले.

रोपवाटिकेत कर्नाटक वनीकरण विभागामध्ये उगवल्या जाणाऱ्या बियांची काळजी घेण्याची जबाबदारी तुलसी गौडा यांच्यावर होती. आणि त्या विशेषत अगासुर बीजकोशाचा एक भाग असलेल्या बियांची काळजी घेत होत्या. तुलशी गौडा ३५ वर्ष रोजंदारी कामगाार म्हणून त्यांच्या आईसोबत पाळणाघरात काम करत राहिल्या. नंतर त्यांना वनस्पतीशास्त्र संवर्धनासाठी केलेल्या कामासाठी आणि व्यापक माहितीसाठी कायमस्वरूपी पदांची ऑफर दिली गेली. त्यानंतर त्यांनी वयाच्या ७० व्या वर्षी निवृत्त होण्याचा निर्णय घेण्यापूर्वी आणखी १५ वर्ष कायमस्वरूपी नर्सरीमध्ये काम केले. या रोपवाटिकेतील त्यांच्या संपूर्ण कालावधीत, त्यांनी प्रत्यक्ष अनुभवातुन मिळविलेल्या जमिनीबद्दलच्या त्यांच्या पारंपारिक ज्ञानाचा वापर करून वनविभागाच्या वनीकरणाच्या प्रयत्नांना मदत करण्यासाठी थेट योगदान दिले. त्यांनी रोपे लावली नाहीत,तर त्यांना झाडे बनवली आहेत. ज्यामुळे जगाला चांगले जगण्यास मदत होते.तसेच त्यांनी शिकारींना वन्यजीव नष्ट करण्यापासून रोखण्यास मदत केली आहे.त्यांनी याबरोबरच जंगलातील अनेक आगी रोखण्यासाठी काम केले.

तुलसी गौडा यांनी कर्नाटकात स्वत:हून १,००,००० झाडे लावल्याचा अंदाज आहे. या योगदानामुळे त्यांच्या समुदायातील सदस्यांवरही कायमचा प्रभाव पडला आहे. अशा या महान व्यक्तीचा मृत्यू १६ डिंसेबर २०२४ रोजी झाला.त्यांच्या या महान कार्यास वंदन ! आपण सर्वजण मिळून हा संकल्प करू की किमान प्रत्येक वाढदिवसानिमित्त त्या — त्या विद्यार्थ्याने दर वर्षी किमान एक झाड लावुन ते जगवावे. दर वर्षी एक एक जरी प्रत्येकाने रोप लावलं तर आपण एक मोठ जंगल निर्माण करू शकतो व पर्यावरणाचे रक्षण करू शकतो.

— **ओम श्रीकांत मिसाळ (टी. वाय. बी.कॉम)**



## 'आपल्या वेळेचे मालक बना, पुन्हा स्वत:च्या आयुष्याचा ताबा घ्या.'

आपण सध्या इतिहासातील तांत्रिकदृष्ट्या सर्वांत प्रगत अशा कालखंडात राहत आहोत. आज आपल्या हातात आधुनिक फोन आहेत. चांगली ॲप्स आहेत. वेगवान इंटरनेट आहे. कुठलीही माहिती, उत्पादने,कोणत्याही प्रश्नाचे उत्तर एका क्लिकवर उपलब्ध आहे.

असं असुनही आपल्याला प्रॉडक्टिव्ह राहणं इतकं आव्हानात्मक का वाटतं ?

या प्रश्नाचं एका शब्दात उत्तर देता येईल. ते म्हणजे, डिस्ट्रक्शन (लक्ष विचलित होणं). मोबाईलवरील वेगवेगळया नोटिफिकेशन्स, जाहिराती, इमेल्स,संदेश ..... यामध्ये आपला वेळ वाया जातो. अशा लक्ष विचलित करणाऱ्या गोष्टींना दूर ठेवून जास्तीत – जास्त प्रॉडक्टिव्ह म्हणजे उत्पादनात कसं राहावं यावर ब्रायन यांनी या पुस्तकामध्ये मार्गदर्शन केले आहे.

मी याआधी बऱ्यापैकी पुस्तक वाचली होती.२/३ वर्षांपूर्वी मध्ये बराच काळ मी पुस्तकं पूर्णपणे वाचलेलीच नव्हती. पुस्तक वाचण्याची आवड स्व:ला पुन्हा नव्याने लावून घ्यायची होती. कॉलेज लायब्ररीमधून मी पहिल्या वर्षात व दुसऱ्या वर्षात असताना पुस्तके घरी आणली होती. त्यामधलं कोणतंच पुस्तक पुर्णपणे वाचलं नव्हतं. तिसऱ्या वर्षात आल्यानंतर मी एक मिरॅकल नावाचं

पुस्तक वाचायला घेतलं. वाचन चालु होतं, पण सातत्य नव्हंत. मित्रांसोबत असाच एकदा फिरत लायब्ररीमध्ये आलो. नकळत पुस्तक स्टॅंडवरती लावलेली पुस्तके निदर्शनास पडली. त्यामध्ये माझं लक्ष वेधुन घेतलं ते ब्रायन ट्रेसी यांच्या ' गेट इट डन नाऊ ' या पुस्तकाने. त्या पुस्तकांच्या कव्हर वरती दोन जादुची वाक्यं दिसली. एक होतं ' आपल्या वेळेचे मालक व्हा/बना' दुसरं होतं ' पुन्हा स्वत:च्या आयुष्याचा ताबा घ्या.

त्या दोन्ही हेडलाईन वाचल्यानंतर विचार आला की, आपल्याला सध्या या पुस्तकाची खुप गरज आहे.आपल्याला आपल्या वेळेचे मालक बनायचे आहे. व पुन्हा आपल्या आयुष्याचा ताबा घ्यायचा आहे.असं ठरवलं.पहिले हे पुस्तक पुर्ण केले व ते पुस्तक घेतलं

पुस्तकामध्ये ब्रायन ट्रेसी यांनी ज्या ज्या कृती करून बघायला सांगितल्या आहेत. त्या त्या कृती करत गेलो.पुस्तक वाचण्यास व सांगितलेलया कृती करण्यात सातत्य ठेवले. वेळ लागला तरी चालेल पण पुस्तक संपुर्ण वाचुन काढणारच हे या पुस्तकामुळेच शक्य झालं. रोजची ध्येय लिहायला लागलो. मी कधीच हार मानत नाही.हे वाक्य डोळयासमोर ठेवलं व जसजस पुढे तसेतसे असे वाटु लागले की, पुस्तक आपलचं आहे हे परत करायचं नाही. कितीही फाइन लागला तरी चालेल. पण पुस्तक परत करायची इच्छा होईल तेव्हाच ते लायब्ररीमध्ये जमा करीन . इतकी सवय या पुस्तकाने मला लावली होती. पुस्तक वाचताना केलेल्या कृतीमुळे सर्व काही बदलुन गेलं. जी.जी स्वप्नं २/३ महिन्यास बघीतली होती ती पूर्ण होण्यास मदत झाली.

परीक्षेमध्ये CGPA माझा ७ च्या वरती कधी गेलाच नव्हता. या पुस्तकामुळे ७ च्या वरती जाण्यास मदत झाली.प्रयत्न करत रहा. केलेल्या प्रयत्नाचे यश नक्कीच तुम्हाला मिळेल हे या पुस्तकाने मला शिकवले. कधीच हार मानू नका हे या पुस्तकाने मला शिकवले. हे पुस्तक माझा मनातुन कधीच जाणार नाही. ' गेट इट डन नाऊ ' हे शब्द प्रेरणा देतात.

**— ओम श्रीकांत मिसाळ (टी. वाय. बी. कॉम)**



## शिवकालीन गारद
## व तिचा अर्थ

**आस्ते कदम, आस्ते कदम, आस्ते कदम,**
**महाराऽऽऽऽज**
**गडपती,**
**गजअश्वपती,**
**भूपती, जळपती**
**प्रजापती सुवर्णरत्न-श्रीपती**
**अष्टावधानजागृत, अष्टप्रधान वेष्टीत**

**न्यायालंकारमंडीत, शस्त्रास्त्रशास्त्रपारंगत**
**राजानितीधुरंधर, प्रौढप्रतापपुरंदर**
**क्षत्रियकुलावतंस, सिंहासनाधिश्वर**
**महाराजधिराज**
**श्रीमंत, श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा विजय**
**असो!!!**

**वरील घोषणा म्हणजेच 'गारद'!** ही गारद प्रत्येक वेळी महाराजांचं राजसभेत आगमन व्हायचं तेव्हा - तेव्हा दिली जायची. आजही छत्रपती शिवाजी महाराज ह्यांच्या संबंधी आयोजित केलेल्या अनेक कार्यक्रमांमध्ये ही गारद दिली जाते. मित्रहो, वर्षानुवर्ष ऐकत आलेल्या हया गारदेचा अर्थ काय असेल, याचा आपण कधी विचार केला आहे का ? महाराजांच्या गारदेमध्ये महाराज 'गडपती'म्हणजेच ज्याच्याकडे गड आहेत, किल्ले आहेत असा राजा.भूपती ज्या राजाचे भूमीवर अधिपत्य आहे असा, जळपती म्हणजे ज्याचे आरमार आहे, जो समुद्रावरही राज्य करतो असा. आणि प्रजापती म्हणजे ज्याने त्याच्या सर्व प्रजेची जबाबदारी घेतली आहे असा राजा !

अष्टावधानजागृत, ज्या राजाचे सदैव आपल्या प्रजेवर लक्ष आहे आणि आठही दिशेला आलेल्या शत्रुवर ज्याचे लक्ष आहे. थोडक्यात ज्यांचं 'हेर खातं ' अत्यंत वेगवान व चपळ आहे असा राजा. अष्टप्रधानवेष्टीत, ज्या राजाने राज्यातील प्रजेच्या सेवेसाठी अधिराज्य, 'सुराज्य' होण्यासाठी नेमलेल्या आठ व्यक्ती ज्यामध्ये —

१) प्रधान — जो राजाच्या अनुपस्थितीत राज्याचा कारभार चालवेल.

२) अमात्य — राज्याचा जमाखर्च पाहिल व त्यावर नियंत्रण ठेवेल.

३) सेनापती — सैन्याचे नेतृत्व करेल.

४) पंडितराव — धर्माची कामे पाहणे.

५) न्यायाधीश — न्यायदान करणे.

६) सचिव — सरकारी आज्ञापत्रे पाठवणे.

७) मंत्री — पत्रव्यवहार सांभाळणे ( राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय )

८) सुमंत – परराज्यांशी संबंध ठेवणे.

- **न्यायालंकारमंडित** – ज्या राजाकडे स्वत:चे न्यायासन आहे आणि अन्याय करणाऱ्यास योग्य शिक्षा व ज्यावर अन्याय झालाय त्याला नि:पक्ष पद्धतीने न्यायदान करणारा राजा.
- **शस्त्रास्त्रशास्त्रपारंगत** – जो राजा विविध शस्त्र चालविण्यामध्ये पारंगत आहे, ज्या राजास सर्व शास्त्रांबद्दल योग्य ती माहिती आहे ज्या मध्ये धर्मशास्त्र, युद्धनिती, राजशास्त्र, न्यायशास्त्र, अर्थशास्त्र, इत्यादी बद्दल संपूर्ण ज्ञान आहे असा राजा.
- **अखंडलक्ष्मी अलंकृत** – ज्या राज्याकडे अर्थशास्त्राचे योग्य ज्ञान, नियोजन आहे असा, ज्याच्याकडे अक्षय धनसंपत्ती आहे.
- **राजनितीधुरंधर** – राज्य करत असताना वेळोवेळी राजकीय खेळी खेळावी लागते व प्रत्येक वेळी नवीन डाव, नवा पेच शत्रुसमोर उभा करावा लागतो आणि यामध्ये जो अत्यंत प्रभावशील आहे, ज्याची राजनिती ही सर्वांना प्रेरणादायी आहे असा राजा.
- **प्रौढप्रतापपुरंदर** – प्रौढ म्हणजेच सज्ञान, प्रताप म्हणजे कार्य , आणि पुरंदर म्हणजेच कोल्हापूर - सातारा प्रांतातील अत्यंत उंच आणि विशाल गड- ज्याचे कार्य पुरंदरा प्रमाणे उत्तुंग आहे. आणि जो कोणतेही कार्य करताना पूर्ण विचाराने होणाऱ्या परिणामांना सामोरे जाण्याची तयारी ठेवून विशाल व इतर कोणाच्यानेही शक्य नाही असे कार्य करणारा राजा.
- **क्षत्रियकुलावतंस** – ज्याचे कुळ क्षत्रिय आहे आणि क्षत्रिय कुळधर्माला अभिप्रेत आणि गौरव निर्माण करणारा राजा, ज्या राजाने क्षत्रिय कुळात जन्म घेऊन त्याच्या कार्याने कुळ शोभा वाढविली आहे, ऐसा राजा.
- **राजमान्य राजश्री** – ज्या राजाला इतर राजांची अथवा राज्यांची मान्यता आहे. असा आणि सर्व राजांमध्ये जो प्रभावशाली आहे किंवा तुलनेने सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे असा राजा.
- **सुवर्णसिंहसनाधिश्वर** – ज्या राजाचा राज्याभिषेक सुवर्णाने मढविलेल्या राजासिंहासनावर झाला आहे किंवा इतिहासकारांच्या मते ज्याच्या राज्याचे सिंहासन सोन्याचे आहे आणि ते राज्य राजाच्या आधीन आहे.
- **छत्रपती** – ज्या राजावर छत्र धरिले आहे ऐसा राजा! छत्र हे राज्यातील रयतेचे, थोरा-मोठयांच्या आशिर्वादाचे आणि देव व पूर्वजांच्या कृपेचे प्रतिक आहे. ज्या राजावर छत्र, त्याच्यावर वरील सर्वांची कृपा व अखंड आशिर्वाद आहे किंवा राजा हा त्या राज्याचा प्रतिनिधी असतो आणि त्याच्यावर छत्र धरणे म्हणजेच राजाचे रक्षण करणे, रयतेला सुख देणे, ही त्याची कर्तव्ये आहेत ह्याची सतत आठवण करून देण्यासाठीचे प्रतिक ज्याने धारण केले आहे असा राजा.

लेखाच्या सुरूवातीला असलेला गारदेतील प्रत्येक शब्दाचा अर्थ वाचल्यावर लक्षात येते ते, छत्रपती शिवाजी महारांजाचे थोरपण! ज्याच्या दरबारात येण्याने आणि त्याच्या दरबारात आल्यानंतर केवढा आनंद, प्रेम व सुख दरबारातील लोकांना मिळत असेल हयाची कल्पनाच करून त्या लोकांचा हेवा वाटावा असा राजा!

– **कुमार नरदास टावरी**
**टी.वाय. बी. एस्सी**




# पारंपरिक पाककृती

## • शिरवाळे

- साहित्य

१/२ कप पाणी,मीठ १/२ चमचे तूप, १/२ कप तांदळाचे पीठ, तेल, गूळ पावडर ३-४ चमचे नारळाचे दूध, १/२ वाटी, हळद, जिरे पावडर, वेलची पावडर

- कृती:—

१/२ कप पाणी उकळून ठेवणे .त्यात १/२ चमचे तूप घालणे. मग त्यामध्ये १/२ कप तांदळाचे पीठ घालून घ्यावे. मग मिश्रण एकत्र करून ते ताटात काढून चांगले मळून घेणे.एकजीव करून घेणे .त्यानंतर आपल्याकडे चकलीचे भांडे असते, त्या चकलीच्या भाडयांला सर्वबाजूकडून आतून तेल / तूप लावून घ्यायचे. आणि पीठाचा जो आपण गोळा केलेला आहे. तो त्यात टाकायचा आणि भांडे व्यवस्थित लावून शिरवाळे करायचे. नंतर ते इडलीच्या साच्यात शिरवाळे काढायच्या आणि चांगले उकळून घ्यायच्या. १५ मिनीटे ते चागले उकडून घ्यायचे .बाजूला नारळाच्या दुधाची गुळवणी करून घेऊया. त्यासाठी आपण १/२ वाटया नारळ दूध घेतलेले आहे. त्यात आपण गूळ पावडर ३ —४ चमचे टाकायची आहे. त्यात चांगले मिक्स करून घेणे. मग थोडेसे मीठ टाकायचे. थोडी हळद आणि जिरे पूड टाकायची आणि एकत्र करून वेलची पूड टाकायची व सर्व व्यवस्थित मिस्क करून घ्यायचे. १५ मिनीटांनी शिरवळया शिजल्या का बघायचे आणि मग ते केळयाच्या पानात काढून घेणे. आणि बाजूला नारळाच्या दूधाची गुळवणी ठेवणे. एकत्र सोबत खाणे.

## • कच्च्या फणसाची भाजी

- साहित्य :—

१/२ किलो फणस, १ चमचा लाल मसाला, हळद, १ चमचा, २ चमचे तेल, १ चमचा मोहरी, १चमचा हिंग, ६—७ पाकळया लसुण, ६—७ कडीपत्ता, थोडासा गूळ, १/२ कप खोबरे, १ चमचा मीठ, चिरलेली कोथिंबीर, १/२ बारीक चिरलेले कांदे.

- कृती :—

प्रथम आपण फणस कापून त्यातले गरे काढून घ्यायचे आहेत. त्यानंतर त्यामधला बिया काढून घ्यायच्या. व एका गऱ्याचे २-३ तुकडे करून घ्यायचे आहेत. त्यांना स्वच्छ धुवून घ्यायचे आहे. त्यानंतर एका कढाईत तेल टाकून चांगले गरम करून घ्यावे व त्यानंतर त्यामध्ये १ चमचा मोहरी, १चमचा हळद व ६-७पाकळया लसुण घालायचे आहे. त्यानंतर कडीपत्ता व १ चमचा हिंग घालुन चंगले मिक्स करून घ्यायचे आहे. लसुण चांगले लाल झाले की मग कोथिंबीर घालून त्यामध्ये बारीक चिरलेला कांदा घालून हलवत राहायचे आहे. कांदा लाल झाला की, त्यामध्ये फणसाचे गरे टाकायचे व चांगले मिक्स करून घ्यायचे.

त्यावर थोडेसे मीठ घालुन व गूळ घालून एकत्र परतून घ्यायचे आहे. वाफेवर शिजवून घ्यायचे. व १०-१५ मिनीटे परत हलवून घ्यायचे. व गरा शिजला की नाही ते बघून मग परत एकत्र मिक्स करून वाफ देऊन भाजी काढून घेणे व भाजी खाण्यास तयार आहे.

— **श्रुतिका मंगेश राणे**
**टी.वाय.बी.ए.(मराठी)**

## • अधिक महिन्यातील धोंडे

- साहित्य — तांदूळाचे पीठ, चण्याची डाळ ,गुळ, वेलची पावडर.
- कृती :—

पिठाची उकड काढायची. चांगलं मळून घ्यायचं. त्याचे द्रोण करायचे. चण्याची डाळ शिजवून घ्यायची. त्यातले पाणी गाळून घ्यायचे. नंतर त्यात गुळ टाकून चांगलं घाटून घ्यायच. पाणी आटेपर्यत नंतर त्यात वेलची पावडर टाकायची. आणि पिठाच्या द्रोणामध्ये ती डाळ घालायची आणि चारही बाजुंनी दुमडून घ्यायचं,मग एका चाळणीमध्ये ठेवून ते १० मिनिटे उकडत ठेवावे.

**झाले धोंडे तयार......!**

**.तृप्ती विनोद पोवलकर**
**टी.वाय.बी.ए.(मराठी)**

## • मेथीचा शिरा

- साहित्य :—

तूप,मेथीचे पीठ, रवा, काजु, बदाम, गूळ, पाणी दुध इ.

- कृती :—

१. तूप टाकून रवा आणि मेथीचे पीठ खंमंग भाजुन घ्यावे.
२. गूळ बारीक करून त्यात टाकावे.
३. मिश्रण एकजीव झाल्यावर पाणी टाकावे.
४. वरून काजू, बदाम टाकावे.
५. मंद आचेवर झाकण ठेवून ५ मिनिट चांगले शिजवावे.
६. झाला मेथीचा पौष्टिक शिरा तयार.

**पुनम दिपक चव्हाण**
**टी.वाय.बी.ए.(मराठी)**

## • पंचकली

- **साहित्य** :—

मैदा,तूप,मीठ, पीठी साखर,तळण्यासाठी तेल इ.

- **कृती** :—

  प्रथम मैदा घेणे.त्यात चिमुटभर मीठ घालणे. तूप गरम करून पीठात टाकणे. व चांगले हातावर घासून घासून घेणे. थोडे फार पाणी टाकून पीठाचा घट्ट गोळा करावा. अर्धा तास झाकून ठेवावे. छोटे छोटे गोळे करून पापड लाटुन घ्यावे. नंतर पापडाला मध्यभागी सुरीने काप देऊन गोल फिरवावे. आणि तेल गरम करून तळण्यासाठी तेलात सोडावे. थोडयावेळाने थंड झाल्यावर त्यावर पिठी साखर टाकावी.

  **झाली पंचकली तयार .........**

## • तांदुळाचे पोळे

- **साहित्य** :— तांदूळ,उडीद डाळ,मेथीं,मीठ इ.
- **कृती** :—

  सकाळी तांदूळ भिजत घालून त्यात उडीद डाळ व मेंथी घालणे.३-४ तास भिजल्यावर थोडेसे ऊन्हात वाळवून, थोडया वेळाने मिक्सरवर सरभरीत पीठ तयार करावे. चाळणीने चाळून पिठातून रवा काढणे. एका पातेल्यात पाणी गरम करून त्यात तो रवा घालणे. थंड झाल्यावर उरलेले पीठ घालावे. व अर्धा चमचा मीठ घालून ते पीठ चांगले ढवळून — ढवळून घेणे. व रात्रभर आंबवत ठेवून सकाळी पोळे करावे.

## • मुटकीचे लाडू

- **साहित्य** —

  तांदूळ, ओला नारळ, गूळ,वेलची पुड, तूप इ.
- **कृती —**

प्रथम तांदूळ भाजून घ्यावे.त्यानंतर मिक्सरवर कणीदार पीठ करून घ्यावे. एका पातेल्यात पाणी गरम करून त्यात गूळ टाकावे. उकळी आल्यावर त्यात ओला नारळ किसून टाकावा. त्यावर तादूंळाचा रवा टाकावा. वरून वेलची पुड टाकावी. चांगले शिजल्यावर छोटे — छोट लाडू बनवावे. आणि एका पातेल्यात थोडे पाणी ठेवून ते बनवलेले लाडू वाफेवर ठेवावे.

**झाले मुटकीचे लाडू तयार!**

**— सुरभी विनोद पाटील**
**टी.वाय.बी.ए.(मराठी)**

## • कुरमुऱ्यांचे लाडू

- साहित्य —तांदूळ, बदाम, सुके खजूर, काजू, जायफळ, चारोळी,सुके खोबरे, गूळ,वेलची, मीठ, तूप
- कृती —

१. तांदूळ भिजत टाकून एक दिवस ठेवणे.

२. दुसऱ्या दिवशी पाण्यातून बाहेर काढून थोडे वाळवून ते खंमग भाजावे.
३. नंतर त्यांचे पीठ तयार करावे.
४. नंतर त्यात बदाम,सुके खजूर, काजू, जायफळ,गुळ,वेलची चारोळी आणि थोडे मीठ मिक्स करून हातावर तूप घेऊन त्याचे गोल — गोल लाडू तयार करणे.

## • तांदुळाचे पापड

- साहित्य — तांदुळ, साबुदाणा, जिरा,ओवा,मीठ
- कृती —

१. तांदुळ धुवून भिजत टाकणे
२. दुसऱ्या दिवशी उन्हात वाळवणे.
३. वाळवल्यानंतर त्याच्यात साबुदाणा टाकून दळायला देणे.
४. दळून आणल्यानंतर पातेल्यात पाणी ठेवून त्याची उतरवणी घेणे.
उतरवणी घेणे म्हणजे चांगले शिजवून घेणे.
५. त्याच्यात जीरा/ओवा,मीठ पापडखार टाकणे.
६. नंतर त्याला मंद आचेवर ठेवून वाफ काढून घेणे.
७. पीठ काढून परातीत ठेवून मळणे.
८. त्याच्या छोटया — छोटया लाटया करून घेणे
९. नंतर त्याचे गोल — गोल पापड करणे
व उन्हात वाळवणे.

**झाले पापड तयार ....!**

## • खारवडी

- साहित्य — तांदुळ, जिरा, ओवा, साबुदाणे,खाण्याचा सोडा,पापडखार,मीठ
- कृती—

१.तांदुळ दोन दिवस पाण्यात भिजत ठेवणे.

२.तिसऱ्या दिवशी उन्हात वाळवणे.

३. त्यात जिरा, ओवा, साबुदाणे टाकून त्याचे पीठ दळून आणणे.

४.दळून आणल्यानंतर पातेल्यात पाणी ठेवून ते शिजवून घ्यावे. (उतरवणी घेणे.)

५.सैलसर पीठ तयार करून घेणे.

६.गरमागरम पीठ चमच्यात घेऊन कापडावर पसरवावे.

१. उन्हात चांगले वाळवावे.
२. नंतर हलक्या हाताने काढून घ्यावे.

**झाली खारवडी तयार...... !**

— **अक्षता दिनकर म्हात्रे.**
**टी.वाय.बी.ए.(मराठी)**




# काव्यविभाग




## बाबा

न बोलता प्रेम करतो,
न सांगता आधार देतो...
न थकता कष्ट करतो,
तो फक्त बाप असतो ...

खिसा रिकामा असला तरी,
'नाही' कधी म्हणाले नाही ...
माझ्या बाबांपेक्षा 'श्रीमंत',
मी कुणी पाहिला नाही ...

आपल्या कष्टाची शिदोरी तो हसत हसत
आपल्या मुलांवर कुरबान करतो...
अरे तो बापच असतो जो आपल्यासाठी
दु:खामध्ये सुध्दा हसत असतो....!

— **प्रांजल परशुराम सांगळे**
**टी.वाय.बी.ए.(मराठी)**




## मी चाललो शोधण्यास मला

मी चाललो शोधण्यास मला
कोण मी आणि मी कुठला
कुठून मी आलो आणि कोणाच्या मदतीला
जिथे न कोणी गेले तिथे मला जावेसे वाटते
जे न कोणी केले ते मला करावेसे वाटते
मनात अनेक स्वप्नांचं झाड आहे
त्या झाडाला फुले लागणार का?
जीवन जगणे कशासाठी
जगण्याचा नवा अर्थ आता कळेल का ?
दिशा आहेत अनेक आता नवी दिशा दिसेल का ?
कस्तुरी मृगा सारखा पळत सुटलो मला कोणी थांबवणार का ?
सूर्य दिवसा तर चंद्र रात्री उगवतो
दोघेही येणार का एकत्र प्रकाश घ्यायला
अशक्य ते शक्य करुन मी ही शोधणार स्वत:ला....



## खरे जीवन...

दिवाणखान्यात टीव्ही आल्यापासून बोलणं विसरलो आहोत.
दारात गाडी आल्यापासून चालणं विसरलो आहोत.
खिशात कॅल्क्युलेटर आल्यापासून पाढे विसरलो आहोत.
एअरकंडिशन्ड ऑफीसमुळे झाडाखालचा गारवा विसरलो आहोत.
कॉंक्रिटच्या व डांबरी रस्त्यामुळे मातीचा वास विसरलो आहोत.
मनालाच इतके श्रम होतात की शरीराला कष्ट दयायला विसरलो आहोत.
कचकडयांची नाती जपताना खरे प्रेम विसरलो आहोत.
बॅकातील खाती सांभाळताना पैशाची किंमत विसरलो आहोत.
उत्तेजक चित्रांच्या बरबटीमुळे सौंदर्य पाहणे विसरलो आहोत.
फास्ट फुडच्या जमान्यात तृप्तीच्या ढेकर विसरलो आहोत.
पॉप—रॉकच्या दणदण्याटयात संगीत समाधी विसरलो आहोत.
क्षणभंगुर मृगजळामागे धावताना सत्कर्मातला आनंद विसरलो आहोत.
सतत धावत राहताना क्षणभर विसावणं विसरलो आहोत.
जागेपणीचे सुख जाऊ दया, सुखानं झोपणं विसरलो आहोत.
खळखळून हसणं विसरलो आहोत आणि हसणं विसरल्यामुळे
खरे जीवन जगणंच विसरलो आहोत.




## असेच का तसेच का?

असेच का आणि तसेच का?
हे प्रश्न पडायलाच हवे
या प्रश्नांच्या उत्तरांसाठी
खरे विज्ञान शिकायला हवे.

सूत्र कोणते ? नियम कसले ?
काय घडे आणि कसे घडे ?
असेल जर हे शोधायाचे
तर विज्ञानाचे गिरवावे धडे.

अणू - रेणूंची सुक्ष्म दुनिया
विश्वात अनंत पसरले तारे.
रहस्य अदभुत या विश्वाचे
विज्ञानंच उलगडले सारे

नव नवे शोध विज्ञानाचे
सुकर करती जगणे आपुले
विज्ञानाची कास धरता
प्रगतीपथावर पडती पाऊले

रोगांच्या अनेक साथींमध्ये
विज्ञानंच वरदान ठरले होते
शास्त्रज्ञांनी लस शोधुनी
या रोगांना जिंकले होते.

दुर असणारी माणसे सुद्धा
विज्ञानामुळे रोज भेटती
कवितेत भेटणाऱ्या चंद्रावरही
मानवाचे आता ठसे उमटती

पण काही स्वार्थी लोंकामुळे
वरदानाचा शाप होतो
नैसगिक संपत्ती आटते
श्वास सुद्धा कोंडतो.

विज्ञानाने काही दिली उत्तरे
पण उपस्थित केले प्रश्न नवे
यावर मात कशी करावी
यासाठीही पुन्हा विज्ञान हवे.

**— अक्सा इम्रान मुजावर**
**एस.वाय.बी.एस्सी**




## काही वेळ जपून ठेवा




## आयुष्य असे जगावे

काही वेळ जपून ठेवा, विचारांसाठी कारण
शक्तीचा तो स्त्रोत आहे.
काही वेळ जपून ठेवा, विशेष कामासाठी
कारण यशाचे ते मोल आहे.
काही वेळ जपून ठेवा, प्रेमासाठी कारण
परमेश्वराचा त्यावर अधिकार आहे.
काही वेळ जपून ठेवा, खेळण्यासाठी
कारण चिरतारूण्याचे ते रहस्य आहे.
काही वेळ जपून ठेवा, स्वप्नांसाठी कारण
ध्येयाकडे नेणारे ते साधन आहे.
काही वेळ जपून ठेवा, मैत्रीसाठी कारण
सौख्यप्राप्तीचा तो एक मार्ग आहे.
काही वेळ जपून ठेवा, दुसऱ्यांच्या
मदतीसाठी कारण आपल्यालाही मदत
मिळण्याचे ते स्थान आहे.
काही वेळ जपून ठेवा, स्वत:ला
ओळखण्यासाठी कारण, स्वत:मध्ये
परिवर्तन घडविण्याचा तो प्रभावी उपाय
आहे.

## आयुष्य असे जगावे

आयुष्यात एकदा,
पुन्हा शाळा अशी भरावी की
प्रत्येकाला त्याचे लहानपण
कायमचे लक्षात रहावे....

आयुष्यात एकदा,
इतक कडक उन पडावं की,
जवळच्या सावल्याचं
महत्त्वं कळावे.....

आयुष्यात एकदा,
इतका मोठा पाऊस पडावा,
की मी पणा सगळा
वाहून जावा....

आयुष्यात एकदा असे जगावे की,
आपले जगणे पाहून इतरांना
जगण्याची मौज कळावी....
म्हणून आयुष्य मजेत जगावे.....




## माणूस म्हणून जगून बघ

माणूस म्हणून जन्मला आहेसतर माणूस म्हणून जगून बघ
माणूसकीच्या जगात राहताना विचारी तू होऊन बघ
हालअपेष्टा असतील तेव्हा जिद्द थोडी ठेवुन बघ
श्रीमंतीत मात्र ‘गर्व’, अभिमान थोडा तरी सोडून बघ
संकट समयी थोडी कळ सोसून बघ.
स्वत:चाच विचार न करता इतरांचाही विचार करून बघ.
संस्कारांशी नाते जोडून बघ. पुस्तकांशी मैत्री करून बघ.
जगताना फक्त व्यवहारी न राहता. पैशाचा नाद सोडून बघ.
कुंटुबाचा आधार बनून बघ. स्वत:ची कुवत वाढवून तर बघ.
जगाची सफर करून तर बघ. माणसामाणसातील विविधता पाहून तर बघ.
जीवन फार सुंदर आहे खर खर जगून तर बघ.
माणसाने माणसाशी माणसासारखे जगून वागावे. हा मंत्र जपून तर बघ........ !

**— दामिनी उज्वल म्हात्रे**
**एफ.वाय. बीए**



## त्याचं माझ्या आयुष्यात येणं ...

तो माझ्या आयुष्यात आला आणि
माझा सगळा वेळ त्याचा झाला.
त्याला पाहिल्यावर सगळं टेन्शन दूर होतं आणि
मी त्याच्यात हरवून जाते.
तो येताना एकटा नाही आला तर,
सगळ्यांच्या आयुष्यात आनंद आणि उत्साहाची बरसात घेऊन आला
त्याची चिमुकली पावलं घरभर भिंगरीसारखी फिरतात तेव्हा,
चंद्र तारे जमिनीवर अवतरल्यासारखे वाटतात.
त्याच्या येण्याची चाहूल लागली आणि....
मावशी होणार या कल्पनेने मनात विचारांची चक्र फिरायला लागली.
डोळे आतुर झाले होते त्याला पाहण्यासाठी कारणकृ
त्याच्यामुळे पुन्हा एकदा मला माझं बालपण अनुभवता येणार होतं
अन् हृदयात एकचं गाणं वाजायला लागंल...
“चाऊ आणि माऊ चा खेळ आपण खेळू
इवलुश्या कपातला चहा आपण पिऊ ”
त्याच्या रडण्याचे सूर कानावर पडले आणि
पहिल्यांदा मला कोणाच्यातरी रडण्याचा इतका आनंद झाला
कारण..... त्यादिवशी एक देखणा राजकुमार जन्माला आला
अन् माझं जग त्याच्या अवतीभवती फिरू लागलं.
पहिल्यांदा त्याचा चिमुकल हात हातात घेतला
त्याचं ते लोभसवाणं रूप पाहिलं आणि स्वत:ला हरवून बसले
माझ असं काही राहिलंच नाही कारण ....
मी त्याची मावशी झाले ....
मी त्याची मावशी झाले ....

**तृप्ती विनोद पोवलकर**




## शिक्षक

**शिक्षक म्हणजे,**

आयुष्याला कलाटणी देणारी प्रेरणा

ध्येयपुर्तीसाठी मार्ग दाखविणारी दिशा

कधी बिकट परिस्थितीत, प्रेमाची साथ

कधी कौतुकाचे गोड शब्द तर, कधी

हातावर बसणारा छडीचा मार,

**शिक्षक म्हणजे**

चांगले संस्कार करणारी मूर्ती

संकटकाळात धैर्य देणारी स्फुर्ती,

चारित्र्यपूर्ण विदयार्थी घडविणारा शिल्पकार,

जादूची छडी, जी करते विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार,

**शिक्षक म्हणजे,**

सखोल मुलभुत ज्ञानाचे भांडार,

दूर करी जीवनातील अज्ञानमय अंधार

अन्यायाविरूध्द आवाज उठवणारी तलवार,

अनुभवातून निर्माण होणारा साक्षात्कर,

**असे हे शिक्षकांचे**

आजन्म न फिटणारे उपकार !

**— मानसी कैलास पाटील.**
**एफ.वाय.बी.ए.**




## भारतीय कला काव्य

- **काव्यप्रकार:**

क्षणात उमटती असंख्य विचार, विचारी मन पटलावरी,
जणू चमकुनी जायी वीज, नभातल्या मेघावरी
विचार विजेचे दृश्य रुप दिसे, संस्कृतच्या काव्यातूनी,
संस्कृत भाषा विचारांची, सर्व भाषांची असे जननी, व्याकरण, संधिकरणातून, विचार, एकसंघ करी,
कला जाणतो शब्दसंधिची, काव्य शब्दांकित करण्याची, करी पद्य रचना, विविध विषयांच्या ज्ञानाची,
गुंतागुंत भावनांची शब्दांनी सोडावी,
धागा, सुई, दोराही शब्दांचाच करवी,
मलमली मनाच्या कापडावर नक्षी,
ताळमेळ शब्दांचा, शब्दांचीच कोटी,
आखीवरेखीव शब्दरचना, जाणतो तो कवी,
भारतीय संस्कृतीत म्हणे त्यास कोणी मुनी.

- **युगांतर:**

सत्ययुगातून चालत आलेल्या, वेदांतील ऋचांची बांधणी,
गार्गी विदुषी सोदाहरण, सभेत शास्त्रार्थ करी.
श्रीहरीलाही पडली भूल, त्रेतात वाल्मिकींच्या काव्यकथेची, त्यातूनच घडले रामावतरण,
चल आदर्श चारित्र भूतलावरी,
लवांकुशाने गायिले रामायण, पिढयान् पिढयाचे मार्गदर्शक या जीवनी.
द्वापारयुगी वदे महाभारत काव्य व्यासमुनी,
सहाय्या भक्तगण, विद्याधिपती गणपती धरे लेखणी.
धर्मरक्षिण्या, कर्तव्यपथ चालण्या रणांगणी,
श्रवण केले पार्थाने, गीता काव्य कृष्णमुखातूनी.
ऋतूसंहार, कुमारसंभवम्, रघुवंशम् निसर्ग हाक मनोमनी,
करुनी कल्पनाविलास, रचि महाकाव्य कालिदास महाकवी.

- **मध्यांतर:**

शिवकाली संदेशवहना कामी आली, सांकेतिक काव्यात्मक बोली
स्वराज्य स्थापियले शिवबाने, शोभे मेघडंबरी,
गनिमीकावा साधु शकले, हेरुन शत्रू रणी,
पोवाडयाचे बळ पाठीशी अन् वासुदेवाची गाणी,
शंभूराजांच्या काव्याला साक्षी येसू राणी.

- **भक्तीसार:**

मनाच्या श्लोकाने मन—बुद्धीला आवरती,
भक्तिमार्ग शिकवी, रामदासकृत आरती.
तुकारामाचे अंभग इंद्रायणीवर तरती
जग उद्धारी ज्ञानोबाची ज्ञानेश्वरी,
जनाई, मुक्ताई, पांडुरंगाचा धावा करी,
नामदेव, भक्तमेळा, जाती, अभंगाच्या आहारी,
तन—मन—धन अर्पून पोहोचे विठ्ठलाच्या पंढरपुरी
शेकडो वर्षांच्या नामगजराच्या परंपरा जपे आजचाही वारकरी

- **प्रखर विचार:**

परकीय आक्रमणाला काव्याची ललकारी,
'मेरी झॉंशी नही दूॅंगी', हाक उठली अंबरी,
अजरामर झाली लक्ष्मीबाईंची घोडेस्वारी.
स्वा्तंत्र्यलढयातही काव्याने घेतली कीर्तनरुपी उडी,
कार्य ते क्रांतिकारी, काव्यही दगडी भिंत फोडी.
'ने मजसी ने' ची आठवणी, सागराचीही धांदल उडाली
असंख्य काव्ये भारतमातेला, अनेकांनी अर्पण केली.
विविध कलागुणांनी, साहित्ये समृद्ध केली,
भारतीय कला काव्याने संस्कृती सळसळती ठेविली.

— **प्रा.सौ.पल्लवी आनंद चाटुफळे**
**संगणकशास्त्र विभाग**

# हिंदी साहित्य विभाग




## समय का प्रबंधन....

समय नही बदलता, लोग बदलते है,
पर जो समय को सही से अपनाते है,
वही बदलते समय के साथ
खुद को सफलता के शिखर पर पाते है...

ये पंक्ति बताती है कि समय एक ऐसी मूल्यवान संपत्ती है, जिसे हम न देख सकते है, न छूं सकते है, फिर भी उसकी अहमियत हमारे जीवन में सबसे ऊपर है।

समय का प्रवाह निरंतर है यह किसी का इंतजार नही करता। चाहे वह अमीर हो या गरीब, शिक्षित हो या अशिक्षित समय हर किसी के लिए समान होता है । समय के प्रति जागरूक लोग अपने जीवन में सकारात्मक बदलाव लाते है और सफल होते है, जबकि समय को अनदेखा करने वाले अक्सर पछताते है।

जीवन एक रंगमंच है, इस मंच पर आदमी छोटा हो या बडा हर किसी को हर दिन अलग- अलग भुमिकाएँ निभानी पडती है। जैसे ऑफिस हो या स्कूल, कॉलेज,नौकरी, बिजनेस, परिवार घर का काम,रिश्ते, दोस्त परिवार, हर किसी को थोडा - सा समय देने की जरूरत होती है, और इन सबके लिए समय देते वक्त अगर समय का नियोजन गलत हो गया तो निराशा के अलावा कुछ भी हासिल नहीं होगा। इसलिए हर किसी को समय के नियोजन की आवश्यकता होती है। जीवन के हर पडाव में समय के नियोजन की आवश्यकता है। स्कूल या कॉलेज के छात्रों के लिए समय का नियोजन अलग होगा, जो छात्र प्रतियोगी परिक्षाओं का अध्ययन करते है, उनके लिए यह अधिक सटीक और आवश्यक होगा, व्यवसाय करने वाले लोगों के लिए समय का नियोजन अलग होगा, घर की गृहिणी के लिए यह अलग होगा, लेकिन हर किसी को इसे अपने — अपने समय के अनुसार करना ही पडता है।

समय की व्यवस्था या प्रबंधन हमारे जीवन में अनुशसान, संतुलन और संतोष लाने का एक महत्वपूर्ण तत्व है । हमारे पास दिन के केवल २४ घंटे होते है और इसे सही तरीके से प्रबंधित करना हमारी सफलता की कुंजी है।

आज हर एक व्यक्ति लगातर शिकायत कर रहा है, कि मेरे पास समय नही है मैं बहुत व्यस्त हूँ। मेरे पास बिल्कुल भी समय नही है, इसलिए कुछ लोग जिनके पास पर्याप्त समय भी नही है, उन्हे तटस्थ होकर अध्ययन करना आवश्यक है कि काम की मात्रा बढ गई है या समय का नियोजन, गडबडा गया है। दुसरी ओर वे लोग जो समय पर अपना काम करते है और अन्य शौक भी पालते है, इसलिए हर व्यक्ति को अपने जीवन में समय का प्रबंधन करना आवश्यक है। समय की व्यवस्था करने से हम अनावश्यक कार्यो में समय की बर्बादी से बच सकते हैं। इसलिए कबीरदास जी ने अपने एक प्रसिध्द दोहे में समय के महत्व को कुछ इस प्रकार समझाया है-

**“कल करे सो आज कर आज करे सो अब**
**पल में परलय होयगी, बहुरी करेगा कब ?”**

**—प्रा.सुषमा बाळाराम खोत (हिंदी विभाग)**



## बचपन...

बचपन की खुशियॉं कभी भूली नही जाती।
सिर्फ हसीन चेहरा और वे साथी होते है।
सब अपने बचपन में खो जाते है।

बचपन तो होता है, एक प्यारा सा सपना ।
जिसमें ढेर सारा मस्ती – मजाक है अपना ।
होता है ये एक ऐसा सफर जो जिंदगी से बहुत बेहतर है।

पर जब बडे हो जाते है, तो सबकुछ बिखर जाता है।
रहती है सिर्फ यादे और बचपन के साथियों के चेहरे।
सब कुछ भूलें पर वे पल ना भुल पाएँ!

साथ में खाना, साथ में पीना खेलना ।
एक होती थी प्यारी- सी जिंदगी,
जो यादगार रहेगी सदा।
बडे लोगो जैसे तो नही, पर मन से बहुत अच्छे थे ।

प्यारे और न्यारे सबकुछ तो तब थे
बचपन गुजर जाने सें दुनिया ही
बेरंगीन सी लगती हैं!

**तृप्ती विनोद पोवलकर**
**टी.वाय.बी.ए.(मराठी)**

## हिरकणी

राह तेरी, मंजिल तेरी...
ठान लिया है ना, तूने ओ गोरी.

हिचकना बन जाए ना मजबूरी...
लंबा रास्ता, बन जाता है दूरी...

साथ चलता राही, नहीं बनता रे हमसफर प्यारी...
हर किसीका अपना आयाम,
अलगसी बेकरारी...

कोई दूरसे परख रहा,
प्रतिभा तुम्हारी...
हीरे को भी घाव देकर,
चमकाता है जौहरी...

लेकिन हीरे ताकदवर बनाने के लिए, वह बनता है करारी...
मायूस ना हो.. तेरे साथ सनातन शक्ति है प्यारी...

तुम भारत की कन्या.. लढवैय्या हो हमारी...!

— **प्रा.सौ.पल्लवी आनंद चाटुफळे**
**संगणकशास्त्र विभाग**




## शायरी

मजबूर होकर बहोत बार पूछा,
उपरवाले तेरी मर्जी है क्या !
हर ताकद की,भीख मॉग ली हमने
पर कभी खुद की ताकद आजमायी क्या!

अंजाम जब बुरा होता है
तब चिख –चिख के कहता है की,
अब तो कुछ कर जा...
अरे बहुत उर के रहा तू बेटा,
अब तो मर्द बन जा !

जीतने के लिए कभी –कभी मुकदर का
साथ चाहिए होता है
मगर तुम्हें क्या पता की,गिरकर उठने
के लिए कभी –कभी अपना हाथ
चाहिए होता है !

कब से उसकी राह देख राहा हूँ,
पर वो है की आती ही नही!
अब क्या उसे देनी पडेगी
कंगन, बाली और बिंदीया,
अरे अब तो आ जा मेरी निदिंया!

न जाने कौंनसी लगी बिमारी, जो
रोज रात जगती हूँ, सपने भी बूनती हूँ,
बिस्तर को छोड खुद की सुनती हूँ!
अहा!गलतफहमी में मत रहना
मै तो बस दुनिया को भूलकर रातभर पढती हूँ

एक बार भी वो मुझे न दिखे तो,
जैसी मेरी जान जाती है!
अब है ही वो ऐसा, जिसके साथ
हर किसी की बात बन जाती है!
चॉद ही है वो,जिसके साथ मेरी

सारी रात कट जाती है!
तुम कैसे भी हो,पर कुदरत ने
तुम्हें अपनी अमानत मानी !
तुम्हारी हर जरूरत जानी, मगर
तुमने घरवाली को तो बना के रखा रानी,
पर बचा न सके इत्तुसा भी पानी!

लकडी तो कट कर
हर चीज में बाटी गयी
मगर आज के जमाने में लडकी एक
लकडी की तरह काटी गयी!

**— अंजली अतुल वारंग**
**टी.वाय.बी.एस्सी**

# इंग्रजी साहित्य विभाग




# Corporate Grooming

Corporate grooming is the art of presenting oneself in a manner that is appropriate for a professional environment. It includes personal appearance, attire, grooming habits, and social manners. Corporate grooming is the practice of maintaining personal cleanliness and appearance by employees or prospective employees. It may include the use of hair products, deodorants cosmetics and clothing as well as manners and etiquette. Corporate grooming reflect a positive and professional image about oneself and thereby ensure that be as able to represent his business in a professional manner.

Along with physical upkeep, emotional grooming should also be practice by keeping a positive attitude in negative situations, avoiding conflicts among co-workers having active listening skills. Corporate grooming, corporate dressing refers to sensible dressing at workplace. Corporate dressing, teachers an individual to dress according to the organizational culture. Do not wear something which will make you feel odd one out at the workplace.

For example:- Avoid wearing loud colours at work, casuals chunky jewellery, stacks of bangles, multiple chains bracelets are strict no at workplace.

In today's fast paced and competitive professional world personal grooming plays a crucial role is making a lasting impression. For corporate grooming, personal grooming is important.

**The following are some tips for corporate grooming.**

1) **Dress Professionally**:- Dress appropriately for the business occasion where colours that suit your occasion.
2) **Be clean and neat**:- Maintain good personal hygiene including your teeth, face, hair, fingernail and shoes.
3) **Be Punctual**:- Come at the work or meeting before time.
4) **Be Respectful**:- Use proper world titles while greeting people.
5) **Be Confident**:- Project a confident personality and professional appearance.
6) **Avoid Distractions**:- Avoid talking too much during meetings or presentations.

By understanding the importance of corporate grooming you can achieve more success in both your personal and professional life. It will help you to make a good impression at workplace. Corporate grooming brings confidence, elegance, leadership, professionalism in your behaviour.

**- Zakira Aslam Akhware**
**F.Y. B. Com.**




# Personality Development

**Introduction:-** Development of Personality is most important for human being. The development of Personality is from external development for the development of personality, it is very important for us to be self-confident. The Development of personality always takes us forward in life for the development of personality, it is necessary to be patience in life. Always speaking the truth in life and having good company play a very important role in the development of personality.

**Personality Development:-** The key to Unlocking Human Potential.

Personality Development is the process of enhancing and refining one's Personality traits, characteristics, and behaviour to achieve a more fulfilling and successful life. It involves self-awareness, self-improvement, and self-Transformation, enabling individuals to reach their full potential and make a positive impact on the world.

Effective Personality development begins with self-awareness, which is the ability to recognize and understand one's strengths, weaknesses, values, and emotions. This awareness enables individuals to identify areas for improvement and develop strategies for personal growth self-awareness also fosters emotional intelligence, which is critical for building strong relationships, managing stress and making informed decisions.

Another essential aspect of personality development is self-improvement. This involves setting goals, developing new skills, and cultivating positive habits self-improvement enables individuals to overcome limitations, build confidence and achieve their aspirations it also promotes resilience, adaptability, and creativity, which are vital for navigating life's challenges and uncertainties.

Personality development also involves self-transformation, which is the process of changing one's mind-set, attitude, and behaviour to align with one's values to break free from negative patterns, overcome fears and doubts, and unlock their full potential it also fosters a growth mind-set which is essential for continuous learning, innovation, and progress. In conclusion, personality development is a lifelong journey that requires commitment, dedication, and perseverance. By cultivating self-awareness, self-improvement, and self- transformation, individuals can unlock their full potential, achieve their goals, and ancient Greek Philosopher, Aristotle once said, " We are what we repeatedly do. Excellence, Then is not an act but a habit."

By embracing personality development, we can cultivate excellence and live a life of purpose, fulfilment and happiness.

— पंकज अशोक शिंदे
एफ.वाय.बी.ए

# आम्हाला तुमचा सार्थ अभिमान

## आम्ही बि—घडलो, तुम्ही बी—घडाना.

**'आम्ही बी—घडलो, तुम्ही बी—घडाना'** हा संत तुकाराम महाराजांचा अभंग आहे. हा शब्दप्रयोग द्वयर्थी आहे. म्हणजे यातुन आर्जव आणि आवाहन दोन्ही केले आहे. हे आवाहन, आर्जव आहे, भक्त म्हणून स्वत:ला घडविण्याचे. प्रस्तुत सदराच्या निमित्ताने भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील ज्या विदयार्थ्यांनी स्वत:च्या कर्तृत्वाने स्वत:चे आगळे—वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे आणि स्वत:सोबतच महाविद्यालयालाही गौरवान्वित केले आहे, अशा कर्तृत्ववान विदयार्थ्यांसोबत संवाद साधुन ते मुलाखतीच्या स्वरूपात वार्षिकांक 'प्रतिबिंब' मध्ये प्रकाशित करण्यात आले आहे. या कर्तृत्ववान विदयार्थ्यांपासून प्रेरित होऊन महाविद्यालयातील अन्य विदयार्थ्यांनीही स्वत:च्या क्षमतांना कसाला लावत, स्वत:ला सिद्ध करावे, हा प्रमाणिक उद्देश यामागे आहे.

नेने महाविद्यालयाने अनेक गुणवान, किर्तीवान व्यक्तिमत्वांना आकार दिला आहे. यामध्ये कला, क्रीडा, शिक्षण आदी क्षेत्रात विदयार्थ्यांनी आपला वेगळा ठसा उमटवलेला दिसतो.

या सदरच्या निमित्ताने नेने महाविद्यालयातील दोन गुणवंत विदयार्थिनींच्या कार्यकर्तृत्वाचा अल्पसा परिचय मुलाखतीच्या रूपाने करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

## महाराष्ट्राची लावणीसम्राज्ञी : नेहा पाटील



नेने महाविद्यालयातील कला शाखेची विदयार्थिनी नेहा पाटील हिने आपल्या नृत्यातील प्राविण्याने अवघ्या महाराष्ट्राला भूरळ घातली. कलर्स मराठीवरील 'ढोलकीच्या तालावर' या स्पर्धेत नेहा सहभागी झाली. आणि अथक परिश्रमाने स्वत:ला सिद्ध करत तिने 'महाराष्ट्राची लावणीसम्राज्ञी — २०२३' हा किताब जिंकून नेने महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.

अशा गुणी कलाकारासोबत साधलेला हा संवाद:—

**१) नेहा, तु सहभाग घेतलेली पहिली नृत्य स्पर्धा कोणती? आजवर तु किती स्पर्धांत सहभागी झालीस?**

➢ मी आजवर १००पेक्षा अधिक स्पर्धांत सहभागी झााले असून माझ्या गडब गावात झालेल्या स्पर्धेत मी पहिल्यांदा म्हणजे वयाच्या ५—६ व्या वर्षी सहभागी झाले होते, ज्यात मी ३ ऱ्या क्रमांकाचे बक्षिस मिळविले.

**२) नृत्यातील तुझ्या पहिल्या गुरु कोण? आणि तुझा आदर्श कोण?**

➢ सोनिया चंद्रकांत, या माझ्या नृत्यातील पहिल्या गुरु आहेत. आणि माझी आई हाच माझा आदर्श आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत अनेक प्रकारच्या संकटांचा सामना करून आईंने मला लहानाचं मोठं केलं आहे. एक कणखर स्त्री कशी असावी, याचं उत्तम उदाहरण म्हणजे माझी आई! म्हणुनच आईचं माझा आदर्श आहे. माझ्या आईसारखं मलाही कणखर व्हायंच आहे.

**३) तुझा आवडता नृत्यप्रकार कोणता? का?**

➢ 'लावणी' हा माझा अत्यंत आवडता नृत्यप्रकार आहे. कारण या लावणीमुळेच माझ वेगळ अस्तित्व, वेगळी स्वंतत्र ओळख मी निर्माण करु शकले.

**४) कलर्स मराठीवरील 'ढोलकीच्या तालावर' या स्पर्धेसाठी निवड झाली, तेव्हा तुझी निवड झााली, तेव्हा तुझी पहिली प्रतिक्रिया काय होती?**

➢ मला खूप आनंद झाला. १० वर्षे सातत्याने प्रयत्न केल्यानंतर एवढया मोठया स्पर्धेसाठी निवड झाल्याचा खूप आनंद झाला. पण त्याच सोबत अवघ्या महाराष्ट्रातील नृत्य प्रेमींच्या अपेक्षांवर आपल्याला खरं उतरायचं आहे, याची जाणीव होऊन मी अधिक निग्रही, जबाबदार बनले हे नक्की!

**५) 'ढोलकीच्या तालावर' या स्पर्धेत प्रत्येकी सादरीकरणाच्या वेळी कोणत्या क्लूप्त्यांचा तु वापर केलास? आणि सेटवर वावरताना, कॅमेरा फेस करताना तुला कधी दडपण आले का?**

➢ कोणत्याही विशेष क्लृप्त्या मी वापरल्या नाहीत. मात्र जे करायचं ते प्रमाणिकपणे आणि पूर्ण ताकदीने करायचं हे सूत्र मी नक्कीच अंगिकारलं होते. प्रत्येक सादरीकरणावेळी, सेटवर वावरताना, कॅमेरा फेस करताना मला थोडंफार दडपण येत होते. पण मला लाभलेले जे मेन्टॉर होते त्यांनी प्रत्येकवेळी मला सांभाळून घेत. भीतीवर मात करायला शिकवले. त्यामुळे त्या वातावरणाशी मी समरस झाले.

**६) 'ढोलकीच्या तालावर' या कार्यक्रमादरम्यानचा तुझा अविस्मरणीय अनुभव कोणता?**

➢ माझी आई तशी बुजऱ्या स्वभावाची आहे. तिला फ्रेममध्ये राहायला आवडत नाही. पण या स्पर्धेच्या दरम्यान एका सादरीकरणाच्या वेळी वाहिनीकडून मला सुखद आश्चर्याचा धक्का मिळाला. चक्क माझी आई सेटवर उपस्थित होती. आणि तिला पाहून मी आनंदाने, आश्चर्याने भारावून गेले. तर हा माझ्या संपूर्ण आयुष्यातील अविस्मरणीय क्षण आहे.

**७) 'महाराष्ट्राची लावणी सम्राज्ञी' हा किताब जिंकल्यानंतर आता तुझी जबाबदारी वाढली आहे का?**

➢ हो नक्कीच! कारण आता लोक माझ्याकडे प्रेरणा म्हणून बघतात. त्यामुळे माझं प्रत्येक पाऊल, माझी प्रत्येक कृती प्रेक्षकांच्या अपेक्षांवर खरी उतरणारी ठरावी, असा माझा कायम प्रयत्न राहील.

**८) 'घुंगरु' या नावाने तु तुझी नृत्य प्रशिक्षण संस्था सुरु केली आहेस, यामागे काही विशेष उद्देश आहे का?**

➢ मी स्वत: ग्रमीण भागातून आले आहे. ग्रामीण भागातील मुलांमध्ये खुप सुप्तं गुण असतात. फक्त त्याला वाव मिळत नाही. त्यांना योग्य दिशा, मार्गदर्शन मिळत नाही. आणि म्हणूनच माझ्याकडे असलेल्या कलेचा अनुभवाचा उपयोग माझ्या भागात राहणाऱ्या सामान्यजनांना व्हावा, या उद्देशाने मी 'घुंगरु' या नृत्य प्रशिक्षण संस्थेची निर्मिती केली आहे.

**९) नेहा, तुला 'लावणी' ह्याच नृत्यप्रकाराची करिअरसाठी का निवड करावीशीं वाटली?**

➢ मी लावणी सोबतच वेस्टन—बॉलिवुड, कन्टेम्पररी, सेमीक्लासिकल इ. नृत्य प्रकारही मनापासून एन्जॉय करते. पण 'लावणी' मला विशेष आवडते. लावणी हा पारंपरिक नृत्यप्रकार आहे. आपल्या महाराष्ट्राला तर याची समृद्ध परंपरा लाभली आहे. आता अलीकडील काळात लावणीकडे, लावणी कलाकारांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन जरी बदलला असला तरी यामागील नकारात्मकता दूर करून खरी लावणी, त्यातील साज—श्रृंगाराचा खरा अर्थ मला प्रेक्षकांना सांगायचा आहे. आणि मी माझ्या नृत्याच्या माध्यमातून हा प्रयत्न नक्की करेन आणि लावणीवर प्रेम करणारे प्रेक्षकही मला नक्की समजून घेतील, याची मला खात्री आहे.

**१०) नृत्य क्षेत्रात करिअर करू पाहणाऱ्यांना तु काय सल्ला देशील?**

➢ नृत्य किंवा अन्य कोणतंही क्षेत्र असु दे, तुम्ही जे कराल ते प्रामाणिकपणे व पूर्ण ताकदीने करा. फक्त पैसा—फेम यात न अडकता कर्तृत्वाने स्वत:चे वेगळेपण सिद्ध करा.

---

## पूर्वा राजे : सी.ए.परीक्षा उत्तीर्ण



पूर्वा राजे ही भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील वाणिज्य शाखेची एक गुणी विद्यार्थिनी आहे. सुरूवातीपासूनंच पूर्वाने अभ्यासाबाबत सर्तक राहून महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली स्वत:च्या ध्येय्यप्राप्तीसाठी अविरत प्रयत्न केले. आणि याच प्रयत्नांचे फलित म्हणजे पूर्वा २०२४ साली सी.ए परीक्षा अगदी दुसऱ्या प्रयत्नांतच उतीर्ण झाली. तिचे हे यश नक्कीच अन्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल आणि म्हणूनंच पूर्वासोबत मुलाखतीच्या माध्यमातुन साधलेला हा संवाद ! यातून सी.ए क्षेत्राची निवड करणाऱ्या विद्यार्थ्यांना नक्कीच योग्य मागदर्शन व दिशा मिळेल.

**१) बी.कॉम ची परीक्षा तू कधी उत्तीर्ण झालीस ? यात तुला कोणती श्रेणी मिळाली.**

मी २०२१ मध्ये o ग्रेडसह (C.G.P.A 9.98 ) बी.कॉम चे शिक्षण पूर्ण केले.२०२३ साली मी माझे पदव्युत्तर शिक्षण म्हणजे एम.कॉमही o ग्रेडसह (C.G.P.A 9.98 ) पूर्ण केले.

**२)सी.ए.साठी वाणिज्य शाखेखेरीज अन्य शाखांतील विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात का ?**

हो नक्कीच! विज्ञान किंवा कला शाखेचे विद्यार्थीदेखील सी.ए परीक्षेसाठी पात्र आहेत. अर्थात त्यांच्याकडे लेखा कायदा व कर आकारणी यांसारख्या विषयांमध्ये मुलभूत ज्ञानाची कमरता असू शकते.

**३) सी.ए.ची प्रवेश प्रक्रिया आणि एकंदर स्वरूप थोडक्यात विशद कर.**

सी.ए कोर्स करण्यासाठी भारतात The institude of chartered Accountants of India ( ICAI ) मध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे. सी.ए.चा अभ्यासक्रम ३ स्तरात विभागलेला आहे.

**४) सी.ए च्या कामाचं स्वरूप नक्की काय आहे?**

चार्टर्ड अकाऊंटंट विविध प्रकारच्या वित्तीय सेवा प्रदान करतात.ज्यात सामान्यत: लेखा, लेखापरीक्षण, कर आकारणी व आर्थिक व्यवस्थापनादी कौशल्यांचा समावेश असतो.सी.ए व्यवसायांसाठी आर्थिक अहवाल तयार करतात. कायदेशीर व नियामक मानकांचे पालन सुनिश्चित करतात.कंपनीच्या वित्तीय नोंदी योग्य आहेत की नाही याचे ऑडीट करतात. कर सल्ला देतात.

**५) सी.ए.च्या परीक्षेसाठी तयार करताना तु कशा प्रकारे नियोजन केलंस ?**

सी.ए.च्या परीक्षेसाठी तयारी करणे हे एक आव्हान होते, स्वत:- स्वत:ला दिलेले! म्हणूनच हे आव्हान पूर्ण करण्यासाठी वेळेचे सुयोग्य व्यवस्थापन करून स्वत:च्या क्षमतेवर विश्वास ठेवून मी शिस्तबद्धरीत्या अखंड अभ्यास केला, आणि यश प्राप्त केले.

**६) ज्या महाविद्यालयात तुझं पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले, त्या नेने महाविद्यालयाचे तुझ्या यशामागे काय योगदान आहे?**

माझ्या यशात माझ्या महाविद्यालयाचं, प्राचार्यांचं व प्राध्यापकांचं खुप मोलांचं योगदान आहे. माझ्या क्षमतेवर विश्वास दाखवून माझ्या शिक्षकांनी वेळोवेळी मला पाठिंबा दिला, मागदर्शन केले व मी काहीतरी करू शकेन हा विश्वासही माझ्यात निर्माण केला. म्हणूनच यशाचं हे शिखर मी गाठू शकले.

**७) सी.ए क्षेत्राची करिअरसाठी निवड करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अलीकडे वाढत चालली आहे. तर या क्षेत्रात करिअरला किती वाव आहे.?**

सी.ए क्षेत्राची व्याप्ती दिवसेदिवस वाढत आहे. आणि विविध उद्योगांतही सी.ए.ला वाव आहे. हा व्यवसाय भारतात आणि आंतराष्ट्रीय स्तरावर करिअरच्या अनेक संधी उपलब्ध करून देतो. कारण उद्योग कंपन्यांना वित्त कर—आकारणी, जोखीम व्यवस्थापन व धोरणात्मक नियोजनासाठी सी.ए.ची आवश्यकता आहे.

**८) सी.ए होऊ पाहण्याऱ्या विद्यार्थ्यांना तु कोणता सल्ला देशील ?**

सी.ए परीक्षेची तयारी करताना स्वत:च्या क्षमतांना कसाला लावत वेळेचं सुयोग्य नियोजन करून आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा. त्यासाठी प्रामाणिक राहून अविरत मेहनत करा. मग यश तुमचेच आहे.

**९) भविष्यात तुझ्या काय योजना आहेत ?**

सनदी लेखापाल म्हणून भविष्यात मला फायनान्स क्षेत्रात करिअर करायचे आहे.

**धन्यवाद!!**

# कु.आदिती लाभेश पाटील



❖ **Modeling**

**1) Miss Dronagiri - Best Personality**
**2) Miss Panvel – Best Photogenic**
**3) Miss Krushival – Best Personality**
**4 Miss Raigad – Best Personality**
**5) Gandharv Youth Festival – 1 st Runner up**
**6) Raigad Photo Sunderi – Show Stoper**
**7) Miss Maharashtra ( Ratnagiri ) – Best Costume**

❖ **Album song**

1) **Aai Ekvira – Lead Actor**
2) **Aai Ambe Jagdambe – Lead Actor**
3) **Short Film - Lead Actor**

❖ **Natak**

**1)Saujnyachi Aashi ,taishi**
**2)Vatrat Mele**
**3) Baap pan Bhari Deva**

❖ **Purskar**

1) **Gavachi Ladki lek Purskar**
2) **The Queen of India 2025**

# आम्हाला तुमचा सार्थ अभिमान !

| | |
|---|---|
|  | कु.किर्ती मनोज ठाकूर<br>रायगड पोलिस दलात निवड |
|  | कु.साहिल संदिप शिरवले<br>हत्यारी सुरक्षा रक्षक |
|  | कु.समिक्षा सुनिल म्हात्रे<br>मुंबई पोलिस दलात निवड |
|  | कु.स्वप्नाली म्हात्रे<br>मुंबई पोलिस दलात निवड |

# वृत्तपत्रात नेने महाविद्यालय

# नेने महाविद्यालयात गुरुपौर्णिमेचा जल्लोष!

अलिबाग प्रतिनिधी
राजेश बाष्टे:

पेण एज्यूकेशन सो.च्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात सोमवार, दि. २२ जुलै रोजी इतिहास विभागातर्फे गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंप्रती आदरभाव, जिव्हाळा व्यक्त करण्यासाठी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदानंद धारप, कला विभाग आणि इतिहास विभाग प्रमुख डॉ. यु. ए. खाडिलकर, डॉ. टी. डी. माळवे, समन्वयक प्रा. बी. एम. शिकारे ,विविध शाखांचे प्राध्यापक आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला विद्यार्थ्यांनी उपस्थित गुरूजनांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत केले. यानंतर प्राचार्य डॉ सदानंद धारप यांनी आपल्या प्रास्ताविकात गुरुपौर्णिमा या दिवसाला भारतीय परंपरेत विशेष महत्त्व असल्याचे सांगत संत ज्ञानेश्वरांपासुन ते स्वामी विवेकानंदांपर्यंत गुरू-शिष्यांच्या उज्वल परंपरेचा इतिहास अधोरेखित करत जो जो जयाचा घेतला गुण, तो म्या गुरू केला जाण या उक्तीला अनुसरत आपल्या सान्निध्यात



येणाऱ्या प्रत्येकाकडून आपण शिकत राहावे आणि स्वत:ला उन्नत करावे, असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. तर कला विभाग आणि इतिहास विभाग प्रमुख डॉ. यु. ए. खाडिलकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना व्यक्तीपूजन,ग्रंथपूजन याहीपेक्षा तत्त्वांचे पूजन व पालन यांना वैदिक परंपरेत महत्त्व असल्याचे सांगून प्रत्येकाने स्वत:च्या अंतर्यामी असणाऱ्या गुरू तत्त्वाचा अंगिकार करून अखंड शिकत राहून अज्ञानाच्या अंध:कारातुन ज्ञानाच्या तेजाकडे वाटचाल करावी,असे सांगितले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी भाषणाच्या माध्यमातून गुरूजनांप्रती आपला आदरभाव व्यक्त केला. शेवटी कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात इतिहास विभागाचे डॉ. टी. डी. माळवे यांनी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम करत राहून स्वत:ला उन्नत करण्याचा सल्ला दिला. यानंतर आभारप्रदर्शन होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ यु ए खाडिलकर यांनी, आभार प्रदर्शन डॉ टी. डी. माळवे यांनी तर आयोजन विद्यार्थ्यांनी केले.

दैनिक रायगडची लेखणी | शनिवार दि. २२ फेब्रुवारी २०२५ | २

# नेने महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन उत्साहात साजरा!

**दैनिक रायगडची लेखणी/पेण/ दिपक लोके**



पे. ए. सो. च्या भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पेण येथील हिंदी विभाग, मराठी विभाग आणि डी .एल .एल.ई युनीट यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. २१ फेब्रुवारी २०२५ रोजी 'आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने विविध विषयांवर काव्यवाचन स्पर्धा आणि प्रा. महेश भोपळे यांच्या 'अंतरराष्ट्रीय मातृभाषा' या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप, डी.एल.एल.ई युनिटचे जिल्हा समन्वयक व हिंदी विभाग प्रमुख डॉ. देवीदास बामणे 'संघर्ष', विज्ञान शाखेचे डॉ. एम. एच. साळुंखे, प्रा.सुषमा खोत, प्रा. विजया ठाकूर, प्रा.राधिका गोंधळी, प्रा.सुप्रिया धुमाळ आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. मान्यवरांच्या स्वागताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी प्राचार्य डॉ सदानंद धारप यांनी आपल्या प्रास्ताविकात उपस्थितांना 'अंतर्राष्ट्रीय मातृभाषा' दिनाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांनी भारत देशाच्या बहुभाषिकतेचा उल्लेख करत प्रत्येकाने आपापली मातृभाषा जोपासण्याचा, वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करावा, आपल्या भाषेतून अर्थार्जनाच्या नवीन वाटा चोखाळाव्यात आणि हे करत असताना अन्य भाषांचाही आदर करावा असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. तर प्रमुख वक्ते प्रा. महेश भोपळे यांनी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनामागील इतिहास उलगडून सांगत प्रत्येक भाषेचे स्वरूप, लहजा वेगळा असल्याने प्रत्येक भाषा वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे सांगितले. प्रत्येकाने आपल्या भाषेला समृद्ध करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन केले. यावेळी त्यांनी हिंदी भाषेतील एका कवितेचेही सादरीकरण केले.यानंतर प्रत्यक्ष काव्य वाचनाला सुरुवात झाली. याअंतर्गत विद्यार्थ्यांनी हिंदी, मराठी, लमाणी भाषेतून विविध विषयांवर आधारित कविता सादर केल्या. याप्रसंगी नेने महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख डॉ. देवीदास बामणे 'संघर्ष' यांनीही कवि गजलकार गुलझार यांच्या 'किताबे' या कवितेचे सुरेल सादरीकरण केले.

यानंतर काव्यवाचन स्पर्धेचा निकाल घोषित करून विजेत्यांना पारितोषिक देण्यात आले. सदर स्पर्धेत कु.गणेश जाधव टि.वाय. बी.ए.हिंदी–प्रथम, कु. साक्षी पांचाळ–द्वितीय, कु.दामिनी म्हात्रे व कु.निशा राठोड –तृतीय, कु.दर्शन पाटील–उत्तेजनार्थ हे स्पर्धक विजेते ठरले. यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुषमा खोत यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. विजया ठाकूर यांनी केले.

द ग्लोबल टाइम्स

# नेने महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा संपन्न



**पेण :** पे.ए.सो.च्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने १४ जानेवारी ते २८ जानेवारी हा कालावधी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला गेला. हेच औचित्य साधून यंदाही विभागातर्फे मराठी भाषेचे ज्ञान वृद्धिंगत करणाऱ्या विविध माहितीपूर्ण उपक्रमांचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले आहे.

सदर पंधरवड्याचा उद्घाटन समारंभ बुधवार, दि. १५ जानेवारी रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांच्या शुभहस्ते पार पडला. यावेळी प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल समस्त मराठी भाषिकांचे अभिनंदन करत मराठी भाषेचे वैभव जोपासण्याची व वृद्धिंगत करण्यासाठी कायम प्रयत्नशील राहण्याचे आवाहन उपस्थितांना केले.

सदर पंधरवड्या अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान, माहितीपट, अभिवाचन, आठवणीतल्या कवितांचे सादरीकरण, कर्तृत्ववान मराठी भाषिकांची मुलाखत, बोला प्रतिसाद लाभला.

२८ जाने रोजी सदर पंधरवड्याचा सांगता समारंभ पार पडला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदानंद धारप , कला विभाग व राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एच.ए.सावंत, हिंदी विभाग प्रमुख डॉ. डी. के. बामणे, ग्रंथपाल जी. जी. जोशी, मराठी विभागाचे प्राध्यापक आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. याप्रसंगी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेतुन अर्थाजनाच्या नव्या वाटा धुंडाळुन माय मराठीच्या समृद्धीचा परिचय जगाला करून देण्याचे आवाहन केले. यानंतर ग्रंथालय विभागातर्फे घेण्यात आलेल्या 'पुस्तक परीक्षण' स्पर्धेतील विजेत्यांना प्राचार्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. शेवटच्या टप्प्यात मराठी विभागाची कर्तृत्ववान विद्यार्थीनी 'महाराष्ट्राची लावणीसम्राज्ञी' नेहा पाटील हिने विद्यार्थ्यांसोबत दिलखुलास संवाद साधत आपला नृत्याचा प्रवास उलगडून सांगितला. यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन मराठी

Copyright © 2009-2024 The Global Times. All Rights Reserved.

# नेने महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

अलिबाग प्रतिनिधी
राजेश बाष्टे:





पेण:-दि. २० जुलै २०२४ रोजी पेणच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना युनिट तर्फे कॉलेजच्या क्रीडांगणाच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या सौ. मेनन मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाला मार्गदर्शन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ. श्री. तुकाराम माळवे सर, कार्यक्रम समन्वयक प्राध्यापक डॉ. श्री.सुभाष लकडे सर तसेच वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका व कार्यक्रम समन्वयक महिला कार्यक्रम अधिकारी सौ. सायली पितळे मॅडम आणि सौ.वैदेही जोशी मॅडम यांनी केले. याप्रसंगी, भाऊसाहेब नेने महाविद्यालयाच्या क्रीडांगणाच्या परिसरात विविध प्रकारचे फळझाडे तसेच इतर वृक्ष लावण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना पर्यावरण समतोल, तसेच वृक्षारोपण व संवर्धन याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी पर्यावरण संवर्धन व सामाजिक बांधिलकी जपत हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# नेने महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना प्रशिक्षण शिबीर संपन्न!

अलिबाग प्रतिनिधी
राजेश बाष्टे:

पे. ए. सो. च्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात सोमवार, दि. २९जुलै रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे राष्ट्रीय सेवा योजनेचं महत्त्व सांगणारे प्रशिक्षण शिबिर मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले होते. सदर शिबीरासाठी रा. से. यो. चे रायगड जिल्हा समन्वयक डॉ तुळशीदास मोकल यांना प्रमुख वक्ता म्हणून पाचारण करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदानंद धारप, रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ.तुकाराम माळवे, डॉ. सुभाष लकडे,डॉ.सायली पितळे , विविध शाखांचे मान्यवर प्राध्यापक आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. दीपप्रज्वलन आणि मान्यवरांच्या स्वागताने शिबीराची सुरूवात झाली. ज्ञयावेळी प्राचार्य डॉ सदानंद धारप यांनी आपल्या प्रास्ताविकात राष्ट्रीय सेवा योजना युवा शक्तीला नवचेतना देणारी युवा चळवळ असुन या माध्यमातून विद्यार्थ्यांत राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांच्यात सामाजिक बांधिलकी व सेवाभावाचे बीजारोपण करून त्यांना समाजसेवेसाठी सक्षम केले जाते, या






शब्दांत रा. से. यो. चे महत्त्व विशद केले. यानंतर प्रमुख वक्ते डॉ. तुळशीस मोकल यांनी आपल्या व्याख्यानामध्ये राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांना घडविणारी प्रबोधनात्मक चळवळ असल्याचे सांगत या माध्यमातून राष्ट्रसेवा, समाजसेवा यासाठी समर्पित तरुणाईची फौज तयार केली जात असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी रा. से. यो. चे स्वरूप, उद्दिष्टे, ब्रीदवाक्य, बोधचिन्ह, या माध्यमातून घेतली जाणारी विविध शिबीरे, राबवले जाणारे उपक्रम आणि त्यामुळे समाजाचे होणारे प्रबोधन, विद्यार्थ्यांचा होणारा विकास आदीची विस्तृत माहिती दिली. रा. से. यो. च्या प्रत्येक विद्यार्थ्याने हे रा. से. यो. चे ब्रीदवाक्य आचरणात आणून समाजसेवेचे व्रत अंगीकारण्याचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. यानंतर आभार प्रदर्शन होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. सदर कार्यक्रमाचे आयोजन रा. से. यो. च्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रम अधिकारी डॉ. माळवे, डॉ. लकडे, डॉ. पितळे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी रीत्या केले. सूत्रसंचालन कु. पुनम चव्हाण, आभार प्रदर्शन कु. दिक्षिता पाटील हिने केले. तर पाहुण्यांचा परिचय डॉ. तुकाराम माळवे यांनी करून दिला.

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# पेणच्या नेने महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

पेण : पुढारी वृत्तसेवा

भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कवीश्रेष्ठ कुसुमाग्रजांचा जन्मदिवस अर्थात 'मराठी भाषा गौरव दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमिताने बदलापूर येथील 'ग्रंथसखा', 'शब्दसखा' या ग्रंथालयांचे निर्माते, जवळपास ४ लाख पुस्तकांचे संग्राहक श्याम जोशी यांच्या 'अभिजात मराठी' या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमासाठी नेने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप, 'ग्रंथसखा' ग्रंथालयाच्या ग्रंथपाल अर्चना कर्णिक, कला विभाग व राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हेमलता सावंत, ग्रंथपाल जी. जी. जोशी, हिंदी विभाग प्रमुख डॉ. देवीदास बामणे, विनायक गोखले, विविध शाखांचे प्राध्यापक आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. दीपप्रज्वलन आणि कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.

यावेळी प्रास्ताविकात नेने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी उपस्थितांना मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा देत मराठी साहित्यातील कुसुमाग्रजांच्या अमूल्य योगदानाबद्दल त्यांच्याप्रती ऋण व्यक्त केले. प्राचार्यांनी मराठी भाषेची महानता उद्धृत करताना मराठी भाषा ही इतकी समृद्ध आहे की, आपण तिचा गौरव करण्यास थिटे आहोत, अशा शब्दांत मराठी भाषेचा गौरव केला. यावेळी त्यांनी मराठी भाषेला जागतिक स्तरावर नेऊन तिचा गौरव वाढीस लावण्याची जबाबदारी मराठी भाषकांची असल्याचे सांगितले. यानंतर प्रमुख वक्ते श्याम जोशी यांनी 'अभिजात मराठी' या विषयावर बोलताना अभिजात शब्दाचा अर्थ समजावून सांगत अभिजात मराठी भाषेची समृद्धी, तिची प्राचीनता विविध उदाहरणांतून श्रोत्यांना उलगडून दाखविली. यावेळी त्यांनी मराठी भाषेसोबत मैत्री करण्यासाठी, तिचे भरणपोषण करण्यासाठी शब्दांची आराधना करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

यानंतर मराठी भाषा विभागातर्फे संपूर्ण वर्षभरात विद्यार्थ्यांसाठी ज्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या, त्याचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते पार पडले. यावेळी महाविद्यालयातील हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. देवीदास बामणे यांची पेण शहरातील साहित्य मंडळावर अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नामदेव पाटील यांनी, बक्षिसांचे वाचन प्रा. राधिका गोंधळी यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. विजया ठाकूर यांनी केले.

# भाऊसाहेब नेने महाविद्यालयात मुंशी प्रेमचंद यांची जयंती साजरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने कला ,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पेण, रायगड मध्ये 'हिंदी -विभाग व हिंदी अनुवाद प्रमाणपत्र कोर्स' यांच्या संयुक्त विद्यमाने हिन्दी साहित्यातले वरिष्ठ कथाकार मुंशी प्रेमचंद यांची १४४ वीं जयंती साजरी करण्यात आली.या प्रसंगी मुंशी प्रेमचंद यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून 'भाषण स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचाय. 'डॉ. सदानंद धारप डॉ.देवीदास बामणे' व इतिहास विभागाच्या प्रमुख सौ.डॉ. यु.ए.खाडीलकर , प्रा.विजया ठाकूर तसेच विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थीत होता.

भाषण स्पर्धेत बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.यात प्रथम क्रमांक कु.पुष्पा चंद्रबास प्रसाद(टी.वाई.बी.ए. हिंदी) , द्वितीय क्रमांक कु. स्वामी राजेश खंडागळे (एफ.वाई.बी.ए ) व तृतीय क्रमांक कु .मान्यता दिलीप घरत(११वीं) या विद्यार्थ्यांनी मिळवले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष ?ड.मंगेश नेने यांनी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.सुषमा खोत यांनी केले.

# भाऊसाहेब नेने महाविद्यालयात 'आंतरराष्ट्रीय युवा दिना' निमित्त स्वच्छता मोहीम

पेण: पेण एज्युकेशन सोसायटी संचलित, भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात 'आंतरराष्ट्रीय युवा दिन'मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. 'आंतरराष्ट्रीय युवा दिना'चे औचित्य साधून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व 'आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग' (DLLE Unit) यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात स्वच्छता मोहीम राबवली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप सर यांच्या मार्गदर्शनाने ही मोहीम राबवण्यात आली.



या स्वच्छता मोहिमेत डी. एल.एल.ई. युनिटचे रायगड जिल्हा समन्वयक डॉ. देवीदास बामणे 'संघर्ष', एन.एस.एस. युनिटचे कार्यक्रम अधिकारी डॉ. तुकाराम माळवे, डॉ.सुभाष लकडे आणि प्रा.सौ. सायली पितळे, प्रा. विजया ठाकूर इत्यादी प्राध्यापक वर्ग आणि दोन्ही युनिटचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. डी.एल.एल.ई. युनिटचे जिल्हा समन्वयक डॉ. देवीदास बामणे'संघर्ष 'यांनी डी.एल.एल. ई. युनिटच्या विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगितले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्टाफ रूम, वर्ग खोल्या आणि व्हरांडा स्वच्छ केले.स्वच्छता मोहिमेत मुलींबरोबर मुलांनीही हातात झाडू घेवून स्वच्छता केली. यांसारख्या क्रियांमधून डी.एल.एल. ई. युनिट मार्फत विद्यार्थ्यांमध्ये समाजाप्रती सेवा करण्याची वृत्ती आणि समानतेचे मूल्य विकसित होण्यास प्रयत्न केले जातात.

## भाऊसाहेब नेने महाविद्यालयात
# 'करिअर संशोधन सत्राचे' आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) -**

करिअरची निवड कशी करावी आणि करिअर निवड केल्यानंतर ते घडविण्यासाठी तयारी कशी करावी याबाबत मार्गदर्शन

पेण: पेण एज्युकेशन सोसायटीचे भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील करिअर कट्टा व गायडन्स एज्युकॉन प्रा. लि. मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ' करिअर संशोधन सत्राचे' आयोजन करण्यात आले. प्रास्ताविकात महाविद्यालय समन्वयक प्रा. डॉ. एस आर कान्हेकर यांनी करिअरची निवड कशी करावी आणि करिअर निवड केल्यानंतर ते घडविण्यासाठी तयारी कशी करावी याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी करिअर संशोधन सत्राचे आयोजन केले आहे. विद्यार्थांसी फेस टु फेस इन्टरॲक्शन परिणाम कारक व्हावे म्हणून ऑफलाईन पध्दतीने कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रमुख मार्गदर्शक समीर इनपुरे, संचालक - गायडन्स एज्युकॉन प्रा. लि. मुंबई यांनी करिअरची निवड करण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. जॉब हा मिळवावा लागतो तर करिअर हे घडवावे लागते. समीर इनपुरे यांनी विविध स्तरांवर होत असलेल्या परिक्षांची सविस्तर माहिती दिली. केंद्र सरकार हे केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) व स्टॉफ सिलेक्शन कमीशन (SSC) या माध्यमातून IAS, IPS, IFS, IRS तसेच कस्टम अधिकारी, क्लार्क, शिपायांपर्यंची पदे केंद्र सरकार भरती करते व राज्य सरकार MPSC व इतर एजेंसी मार्फत राज्यात वर्ग १,२,३ व वर्ग ४ च्या पदांची भरती करत असते. जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच महानगरपालिका, नगरपरिषदेला लागणारा कर्मचारी वर्गाची भरती स्पर्धा परीक्षा घेऊन केली जाते. सध्या बॅंकेत व इन्शुरन्स क्षेत्रात फार मोठी भरती होत आहे परंतु आपल्या लोकांना, विद्यार्थ्यांना माहीतच नसते. ऑनलाईन फॉर्म कसा आणि कुठे भरावा हेच आपल्या विद्यार्थ्यांना माहीती नसते कारण जाब मिळवण्यासाठी जी तयारी करावी लागते ती तयारी आपल्या राज्यातील व विशेष करून कोंकणातील विद्यार्थी करत नाही. त्यामुळे योग्य जाब मिळत नाही. याचा फायदा परप्रांतीय घेतात कारण यांनी पूर्ण तयारी केली असते. विद्यार्थ्यांची जाब, उद्योग व व्यवसाय करण्यासाठी दरमहीन्याला एक असे एक वर्षात १२ करिअर सत्र मोफत आयोजित करण्याची कबुली दिली. श्री विकीत वडके यांनी विद्यार्थ्यांना बोलायला शिका, प्रश्न विचारायला शिका, अजिबात मनात न्यूनगंड बाळगू नका. करिअर घडवण्यासाठी अहोरात्र मेहनत घ्या म्हणजे तुमचे करिअर घडेल व तुमच्या आवडीच्या क्षेत्रात तुम्ही यशस्वी व्हाल. महाराष्ट्रात प्रायव्हेट क्षेत्रात नोकरीच्या खुप संधी आहेत. परंतु तुम्ही त्यासाठी तयार व्हा, लायक बना असे सांगितले. सदर कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने व इतर पदाधिकारी यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला. महाविद्यालयचे प्राचार्य डॉ एस बी धारप यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले तसेच करिअर संशोधन सत्र यशस्वी करण्यासाठी सर्व सहकारी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या शेवटी करिअर कट्टा महाविद्यालय समन्वयक प्रा डॉ ए.एम.पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक पुढारी स्थापना १९३९ www.pudhari.com

# नेने महाविद्यालयात व्याख्यानमाला



**पेण : पुढारी वृत्तसेवा**

पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक आणि थोर समाज-सेवक स्वर्गीय भाऊसाहेब नेने यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून प्रसिद्ध उद्योजक राजेश मंडलिक यांच्या 'शिक्षण आणि उद्योग व्यवसाय' या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी पे.ए.सो.चे आधारस्तंभ ॲड. बापुसाहेब नेने, संस्थेचे अध्यक्ष ॲड मंगेश नेने, संस्थेचे अन्य पदाधिकारी, नेने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप, सांस्कृतिक विभागाचे सर्व सदस्य, आदी उपस्थित होता.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी आपल्या प्रास्ताविकात सदर स्मृती व्याख्यानमालेला १४ वर्षांची दीर्घ परंपरा असल्याचे सांगितले.

लोकमत

# व्याख्यानमालेतून उद्योग, व्यवसायाचा कानमंत्र
## भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**वडखळ :** ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक आणि थोर समाजसेवक स्वर्गीय भाऊसाहेब नेने यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून नेने महाविद्यालयात गुरुवारी 'शिक्षण आणि उद्योग व्यवसाय' यावर विशेष व्याख्यानाचे आयोजन केले होते. यात उद्योजक राजेश मंडलिक यांनी आपला प्रवास कथन करीत विद्यार्थ्यांना कानमंत्र दिला.

कार्यक्रमासाठी ॲड. बापूसाहेब नेने, संस्थेचे अध्यक्ष ॲड मंगेश नेने, संस्थेचे अन्य पदाधिकारी, प्राचार्य डॉ. सदानंद धारप, सांस्कृतिक विभागाचे सर्व सदस्य, विविध शाखांचे प्राध्यापक, पेण आणि परिसरातील नागरिक, तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राचार्य सदानंद धारप यांनी या स्मृती व्याख्यानमालेचा हेतू स्पष्ट केला.

**▪ विद्यार्थी, पालक आणि उपस्थित श्रोत्यांमध्ये विचारमंथन होऊन शिक्षणाच्या वेगळ्या पैलूंचा त्यांना परिचय व्हावा तसेच त्यांच्यातील सकारात्मकता वाढीस लागावी, हा सदर व्याख्यानमालेचा उद्देश असल्याचे सांगितले.**

### 'अविरत प्रयत्न करा'

प्रमुख वक्ते आणि प्रसिद्ध उद्योजक राजेश मंडलिक यांनी ध्येय प्राप्तीसाठी अविरत प्रयत्न करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. तर संस्थेचे अध्यक्ष ॲड मंगेश नेने यांनी अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांमधे उद्योजकीय कौशल्ये विकसित व्हावीत यासाठी शिक्षण आणि व्यावसायिक अभ्यासक्रम यांचा मेळ साधला जाणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.

# कवयित्री बहिणाबाईंची जयंती साजरी

**◆ अलिबाग (प्रतिनिधी) :**



पेण एज्यूकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने "काव्यगंध' या भित्तीपत्रकाचे अनावरण आणि काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप, इतिहास विभागाचे डॉ. टी. डी. माळवे, वाणिज्य शाखेचे प्रा.जी.व्ही.उपाध्ये, इंग्रजी विभागाचे प्रा. पी.डी.पाटील आणि विद्यार्थी वर्ग मोठ्यासंख्येने उपस्थित होता. प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी आपल्या प्रास्ताविकात कवयित्री बहिणाबाईंच्या काव्यप्रतिभेचा गुणगौरव करताना आचार्य अत्रे यांनी त्यांच्या कवितांचा 'बावनकशी सोनं' असा केलेला उल्लेख सार्थ असल्याचे सांगितले. आपण जितक्या सहजपणे श्वास घेतो, तितक्याच सहजपणे बहिणाबाईंच्या शब्दांतून कविता अवतरली असून, त्यांची प्रत्येक कविता जगण्याचे तत्त्वज्ञान उलगडून दाखवत असल्याचे प्राचार्यांनी सांगितले. यावेळी प्राचार्यांनी मराठी कविता आणि अन्य मराठी साहित्याचा अनमोल ठेवा जतन व वृद्धिंगत करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. यानंतर प्राचार्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेतुन तयार झालेल्या बहिणाबाईंच्या कवितांवर आधारित "काव्यगंध' या भित्तीपत्रकाचे अनावरण करण्यात आले.

## भाऊसाहेब नेने महाविद्यालयात शासकिय विविध योजना मार्गदर्शन माहिती मेळावा संपन्न!



पेण: पे.ए.सो.च्या भाऊसाहेब नेने कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पेण,जि.रायगड येथे 'एस. सी, एस. टी सल्लागार समिती' आणि इतर मागास बहुजन समाज कल्याण विभाग अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तरीय माहिती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. म्हणजेच 'उत्कर्ष बहुजनांचा संकल्प बहुजन कल्याणचा' शासनांचा कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी नेने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदानंद धारप, समाज कल्याण विभाग अलिबागचे सहायक आयुक्त सुनील जाधव, नेने महाविद्यालयातील 'एस. सी, एस. टी सल्लागार समिती'चे डॉ. देवीदास बामणे, डॉ. विनोद भावड, डॉ. अंकुश भिसे, श्री कल्पेश शिंद,अलिबाग येथील मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहाचे गृहपाल संदिप कदम, नागोठणे येथील नेल्सन मंडेला शाळेचे मुख्याध्यापक अंकुश पोळ,समता दूत अनुजा पाटील, रायगड जिल्हा प्रधान सचिव अंधश्रद्धा विज्ञान संदेश गायकवाड, पेणच्या ज्येष्ठ नागरिक संघटनेचे उपाध्यक्ष काशिनाथ शिगवण आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. ज्योतिबा फुले, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व मान्यवरांच्या स्वागताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी आपल्या प्रास्ताविकात नेने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी नेने महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना शासनातर्फे देण्यात येणाऱ्या सर्व शिष्यवृत्ती योजनांचा १०० टक्के लाभ मिळत असुन त्यासंदर्भात जी कार्यवाही करावी लागते ती महाविद्यालयाकडून वेळेत पूर्ण केली जात असुन यासाठी समाज कल्याण विभागाचे मोलाचे सहकार्य लाभत असल्याचे सांगितले. याप्रसंगी प्राचार्यांनी विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून ज्या विविध योजना राबविल्या जातात त्याचा लाभ घेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

यानंतर इतर मागास बहुजन समाज कल्याण विभाग अलिबाग चे सहआयुक्त व संचालक सुनील जाधव यांनी शासनाने विद्यार्थ्यांसाठी आणलेल्या 'भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना', अनुसूचित जाती तसेच नवबौद्ध वर्गातील विद्यार्थ्यांसाठी 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना', 'पं.दीनदयाळ स्वयंम् योजना' आदी योजना, त्यांचा उद्देश, त्यातुन मिळणार्या लाभाचे स्वरूप, योजनांचा लाभार्थी होण्यासाठी आवश्यक असणारी प्रक्रिया आदीची विस्तृत माहिती विद्यार्थ्यांना दिली.

यानंतर आभार प्रदर्शन होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. देवीदास क. बामणे यांनी केले.

### भाऊसाहेब नेने महाविद्यालयात

## स्त्री चैतन्यशक्तीवर व्याख्यान संपन्न

पेण : पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयात महिला विकास कक्षातर्फे स्त्री मध्ये असणाऱ्या चैतन्यशक्तीचा परिचय करून देऊन तिला सर्वार्थाने सक्षम बनविण्याच्या हेतूने 'स्त्री उर्जा-एक चैतन्यशक्ती' या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.सदर कार्यक्रमासाठी डॉ. मैथिली सावंत प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच संस्थेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, उपकार्याध्यक्ष संजय कडू संस्थेचे अन्य पदाधिकारी, प्राचार्य डॉ. सदानंद धारप, महिला विकास कक्षाचे प्रमुख प्रा.ए.झेड.आझमी,कला विभाग व इतिहास विभागप्रमुख डॉ यु.ए.खाडिलकर, महिला विकास कक्षाच्या सदस्या डॉ. एचब. ए. सावंत, विविध शाळांचे मुख्याध्यापक,शिक्षक, प्राध्यापक आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन आणि मान्यवरांच्या स्वागताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्राचार्य डॉ सदानंद धारप यांनी प्रास्ताविकात उर्जा ही दैवी संकल्पना असल्याचे सांगत स्त्री हा चैतन्याचा स्त्रोत असुन या चैतन्याला जागृत करून प्रत्येक स्त्री ने स्वत:ला कणखर बनवावे, असे आवाहन केले. यानंतर प्रमुख वक्त्या डॉ. मैथिली सावंत यांनी श्रोत्यांसोबत संवाद साधताना स्त्री आणि पुरूष या दोघांतही प्रचंड उर्जा सामावली असल्याचे सांगत सशक्त जीवन जगण्यासाठी दोघांनाही आपल्या अंतरंगातील उर्जेचा शोध घेऊन त्याचा सकारात्मक उपयोग करता येणं गरजेचं असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी अंतरंगात दडलेल्या चैतन्यशक्तीला जागृत करून स्वत:ला कणखर कसे बनवायचे हे प्रात्यक्षिकाद्वारे दाखवून दिले. यादरम्यान काही श्रोत्यांना आलेला अलौकिक अनुभव त्यांनी इतरांना उलगडून सांगितला. यानंतर अध्यक्षीय मनोगतात ॲड. मंगेश नेने यांनी इतिहासातील स्त्री चैतन्याचे दाखले देत प्रत्येक स्त्री ने स्वत:चा शोध घेण्यासाठी स्व:मधील उर्जेचा सुयोग्य वापर केला पाहिजे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पुनम चव्हाण हिने, आभार प्रदर्शन डॉ. यु.ए.खाडिलकर यांनी केले.

## नेने महाविद्यालयात स्किन डेटॉक्सिग वर व्याख्यान

पेण (प्रशांत पोतदार) पेण एज्युकेशन भाऊसाहेब नेने महाविद्यालयात शनिवार, दि. २८ सप्टेंबर रोजी महिला विकास कक्षातर्फे स्किन डेटॉक्सिग या महत्त्वपूर्ण विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानासाठी ठाणे येथील 'माईंडस्केप' संस्थेच्या संस्थापिका तसेच प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ व समुपदेशक सौ. अनुराधा भावे या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप, महिला विकास कक्षाचे प्रमुख प्रा.ए.झेड.आझमी, कला विभाग आणि इतिहास विभाग प्रमुख डॉ. यु. ए. खाडिलकर, महिला विकास कक्षाच्या डॉ.एच.ए. सावंत, विविध शाखांचे मान्यवर प्राध्यापक आणि विद्यार्थी वर्ग मोठया संख्येने उपस्थित होता.

दिपप्रज्वलन आणि मान्यवरांच्या स्वागताने कार्यक्रमाची सुरूवात झाली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदानंद धारप यांनी आपल्या प्रास्ताविकात आजच्या डिजीटल युगात 'स्क्रीन टाइम' ही जागतिक समस्या बनत चालली असल्याचे सांगत स्क्रीन च्या व्यसनामुळे शारीरिक व सामाजिक कौशल्यांच्या होणाऱ्या ऱ्हासावर भाष्य करत निरोगी जीवनशैलीसाठी प्रत्येकाने आपापल्या स्क्रीन टाइमची मर्यादा निर्धारित करावी, असे आवाहन उपस्थितांना केले.



पेण येथे आयोजित स्किन डेटॉक्सिगपर व्याख्यान कार्यक्रमात [illegible] मान्यवर.(छाया: प्रशांत पोतदार)

## नेने विद्यालयात सरकारी योजनांबाबत मार्गदर्शन

पेण (वार्ताहर) : पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, एस सी, एसटी सल्लागार समिती आणि इतर मागास बहुजन समाज कल्याण विभाग अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी सरकारी विविध योजनांबाबत माहितीसाठी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन केले होते. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ.सदानंद धारप, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त सुनील जाधव, विद्यालयाच्या एससी, एसटी सल्लागार समितीचे डॉ. देवीदास बामणे, डॉ.विनोद भाबड, डॉ. अंकुश भिसे, कल्पेश शिद, अलिबाग वसतीगृहाचे गृहपाल संदिप कदम, नागोठणे नेल्सन मंडेला शाळेचे मुख्याध्यापक अंकुश पोळ, समता दूत अनुजा पाटील आदी उपस्थित होते. सरकारने विद्यार्थ्यांसाठी आणलेल्या भारतरत्न डॉ. आंबेडकर स्वाधार योजना, अनुसूचित जाती तसेच नवबौद्ध वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना, पंडित दीनदयाळ स्वयंम् योजना यांसह अनेक योजनांचा विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त सुनील जाधव यांनी केले.

## पेणच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात स्वच्छता मोहीम संपन्न

**दैनिक रायगडची लेखणी**

**पेण दिपक लोके**

आज बुधवार, दिनांक २ ऑक्टोबर २०२४ रोजी भाऊसाहेब नेने कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पेण येथे महात्मा गांधी व मा.पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्ताने स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले होते. ह्यावेळी कॉलेजच्या एन एस एस युनिट व डी. एल. एल. ई.युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली होती. याप्रसंगी मान्यवरांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या फोटोंना पुष्पहार घालून उपस्थित मुलांनी फुले वाहून अभिवादन केले. यानंतर डी. एल. एल.ई.युनिटचे रायगड जिल्हा समन्वयक डॉ.देवीदास क बामणेसंघर्ष आणि एन एस एस चे प्राध्यापक डॉ. एस डी लकडे यांनी उपस्थितांना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले व राष्ट्राच्या प्रगतीसाठी स्वच्छता किती महत्त्वाची आहे

याचा संदेश उपस्थितांना दिला. व डॉ.देवीदास क.बामणेसंघर्ष यांनी थोडक्यात म.गांधीजी व मा.पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची माहिती सांगितले.यानंतर स्वच्छता प्रतिज्ञा घेऊन उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहिमेला सुरुवात केली. याप्रसंगी डी.एल.एल.ई.युनिट चे डॉ. देवीदास क बामणेसंघर्ष, एन एस एस युनिटचे प्राध्यापक डॉ. एस डी लकडे तसेच प्राध्यापिका सौ सायली पितळे प्राध्यापिका सौ वैदेही जोशी प्राध्यापिका सौ सोनल पाटील इत्यादी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या परिसर व वर्ग खोल्या स्वच्छ केल्या व या मोहिमेत सहभागी होऊन आपले घर आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याची शपथ घेऊन या कार्याला हातभार लावला. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.



## पेणच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात स्वच्छता मोहीम संपन्न

**दैनिक रायगडची लेखणी**
**पेण दिपक लोके**

आज बुधवार, दिनांक २ ऑक्टोबर २०२४ रोजी भाऊसाहेब नेने कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पेण येथे महात्मा गांधी व मा.पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्ताने स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले होते. ह्यावेळी कॉलेजच्या एन एस एस



युनिट व डी. एल. एल. ई.युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली होती. याप्रसंगी मान्यवरांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या फोटोंना पुष्पहार घालून उपस्थित मुलांनी फुले वाहून अभिवादन केले. यानंतर डी. एल. एल.ई.युनिटचे रायगड जिल्हा समन्वयक डॉ.देवीदास क बामणेसंघर्ष आणि एन एस एस चे प्राध्यापक डॉ. एस डी लकडे यांनी उपस्थितांना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले व राष्ट्राच्या प्रगतीसाठी स्वच्छता किती महत्त्वाची आहे

याचा संदेश उपस्थितांना दिला. व डॉ.देवीदास क.बामणेसंघर्ष यांनी थोडक्यात म.गांधीजी व मा.पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची माहिती सांगितले.यानंतर स्वच्छता प्रतिज्ञा घेऊन उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहिमेला सुरुवात केली. याप्रसंगी डी.एल.एल.ई.युनिट चे डॉ. देवीदास क बामणेसंघर्ष, एन एस एस युनिटचे प्राध्यापक डॉ. एस डी लकडे तसेच प्राध्यापिका सौ सायली पितळे प्राध्यापिका सौ वैदेही जोशी प्राध्यापिका सौ सोनल पाटील इत्यादी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या परिसर व वर्ग खोल्या स्वच्छ केल्या व या मोहिमेत सहभागी होऊन आपले घर आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याची शपथ घेऊन या कार्याला हातभार लावला. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.

## नेने महाविद्यालयात संविधान दिन साजरा



पेण : पे.ए.सो. च्या भाऊसाहेब नेने कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पेण, येथे डीएलएल ई. युनीट आणि एन. एस. एस युनीट यांच्या संयुक्त विद्यमाने ७५ वा संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .सदानंद धारप, डी .एल एल .ई युनीट चे रायगड जिल्हा समन्वयक डॉ. डी. के. बामणे, एन. एस. एस. युनीट चे कार्यक्रम अधिकारी डॉ. टी. डी. माळवे, डॉ. एस. डी. लकडे, प्रा.सौ.एस.एस.पितळे, ग्रंथपाल जी. जी. जोशी, प्रा.सुषमा खोत आणि विद्यार्थीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. डॉ. डी. के. बामणे यांनी संविधान निर्मितीमागील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचे स्मरण केले. तर डॉ. टी. डी. माळवे यांनी आपल्या प्रास्ताविकात संविधानाचे महत्त्व विषद करताना संविधानाने नागरिकांना दिलेल्या विविध अधिकारांची माहिती दिली.यानंतर भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.
नंतर प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी 'भारतीय संविधान'या विषयावर बोलताना संविधान हा भारतातील सर्वोच्च कायदा असल्याचे सांगुन विविधतेने नटलेल्या भारतातील कोट्यवधी लोकांना एक देश म्हणून एकत्र करणारी भारतीय राज्यघटना महान असून तिचा गौरव करण्यासाठी संविधान दिन साजरा केला जात असल्याचे सांगितले. यावेळी प्राचार्यांनी भारतीय संविधान भारतीय नागरिकांना न्याय, समता, स्वातंत्र्याची हमी तर देतेच पण त्यांच्यातील बंधुभावही वाढीस लावत असल्याचे सांगत देश घडविणाऱ्या संविधानाचे पावित्र्य जपण्यासाठी कटीबद्ध राहण्याचे उपस्थितांना आवाहन केले.

## पेणमध्ये एड्स जनजागृती रॅली

**। खरोशी । वार्ताहर ।**

पेणएज्युकेशनसोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात डीएलएलई युनीट, एनएसएस युनीट, सोबती ट्रस्ट आणि उप जिल्हा रुग्णालय पेण यांच्या संयुक्त विद्यमाने १ डिसेंबर रोजी 'एचआयव्ही एड्स जनजागृती रॅली'चे आयोजन करण्यात आले होते.



या रॅलीसाठी ॲड. बापूसाहेब नेने, ॲड. मंगेश नेने, बापुराव आठवले, डॉ. सदानंद धारप, डॉ. देवीदास बामणे, डॉ. टी.डी. माळवे, डॉ. एस.डी. लकडे, विविध शाखांचे प्राध्यापक आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता. नेने महाविद्यालयाच्या प्रांगणातून या रॅलीची सुरूवात झाली. यावेळी ॲड. मंगेश नेने यांनी रॅलीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना रॅलीसाठी शुभेच्छा देत स्वत:मधील समाजमन कायम जागृत ठेवण्याचे आवाहन केले. यानंतर गांधी मंदिर-शिवाजी चौक-नगरपालिका-उप जिल्हा रुग्णालय या क्रमाने मार्गस्थ होऊन परत महाविद्यालयाच्या प्रांगणात रॅलीची समाप्ती झाली. या रॅली दरम्यान विद्यार्थ्यांनी एड्ससंदर्भात फलक, घोषणा या माध्यमातून जनजागृती करत एचआयव्ही एड्स मुक्त समाज घडविण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात आले.

**रायगड नगरी** | गुरुवार, दि.२६ डिसेंबर २०२४

## नेने महाविद्यालयात स्नेहसंमेलनाचा जल्लोष

**दै.रायगड नगरी । पेण**

पे. ए. सो. च्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात मंगळवार, दि.२४ डिसेंबर रोजी वार्षिक स्नेहसंमेलन 'रिदम' मोठ्या जल्लोषात पार पडले. या समारंभासाठी प्रसिद्ध सिनेअभिनेते,लेखक,दिग्दर्शक . राजन पांचाळ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.तसेच भाऊसाहेब नेने महाविद्यालयाचे कुटुंबप्रमुख ॲड बापुसाहेब नेने, संस्थेचे अध्यक्ष ॲड मंगेश नेने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदानंद धारप, संस्थेचे सर्व पदाधिकारी, विविध शाळांचे मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



ईशस्तवन आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली.यावेळी डी. एल. एल. ई. युनीट च्या विद्यार्थ्यांनी सुरेल गीत सादर करून उपस्थितांचे स्वागत केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदानंद धारप यांनी आपल्या प्रास्ताविकात स्नेहसंमेलन हे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे उत्तम व्यासपीठ असल्याचे सांगत त्या निमित्ताने शिक्षक-विद्यार्थी यांतील दुरावा कमी होत असल्याने स्नेहसंमेलनाला आचार्य अत्रेंनी 'स्नेहमिलना'ची दिलेली उपमा सार्थ असल्याचे सांगितले.

यानंतर मान्यवरांचे यथोचित स्वागत करण्यात आले. नंतर प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी महाविद्यालयाच्या वार्षिक अहवालाचे वाचन केले. यानंतर प्रमुख अतिथी श्री. राजन पांचाळ यांनी विद्यार्थ्यांसोबत सुसंवाद साधताना त्यांना रंगभूमी, पटकथा लेखन, व्हाईस आर्टिस्ट आदी क्षेत्रांत असलेल्या व्यवसायाच्या संधींबाबत सखोल मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी खडतर मेहनत हाच यशस्वी होण्याचा मूलमंत्र असल्याचे सांगितले.

नंतर संस्थेचे अध्यक्ष ॲड मंगेश नेने यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयाच्या प्रगतशील वाटचालीचा आढावा घेत यापुढील काळातही महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

यानंतर मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. यावेळी क्रीडा ,कला, शिक्षण क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कु.ओम श्रीकांत मिसाळ, टी.वाय.बी.कॉम व कु. दीप मिलिंद लोखंडे, टी.वाय.बी.ए. या वर्षांची आदर्श विद्यार्थी व आदर्श विद्यार्थीनी म्हणून मान्यवराच्यां हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आले. नंतर विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला. पाहुण्यांचा पण अल्पोपहार झाला.

दुपारच्या सत्रात विद्यार्थ्यांनी आपल्या अंगभूत कलागुणांचा परिचय देत मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे सादरीकरण केले.यानंतर आभार प्रदर्शन होऊन समारंभाची सांगता झाली. या समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. यु. ए. खाडिलकर यांनी तर आभार प्रदर्शन कु. किमया पाटील हिने केले. या संपूर्ण समारंभाची धुरा रिदम-स्नेहसंमेलनाचे कार्याध्यक्ष व सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. पी. डी. पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी यशस्वीरीत्या सांभाळली.

# नेने महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमाचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पेण**

पे. ए. सो. च्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात महाराष्ट्र शासन व उच्च शिक्षण विभाग यांच्या परिपत्रकान्वये दि. १ जाने ते १५ जाने या कालावधीत ग्रंथालय व भाषा विभागाच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' पंधरवडा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृतीचे महत्त्व ठसविण्यासाठी ग्रंथ प्रदर्शन, वाचनाचे महत्त्व सांगणारे बॅनर, वाचन सेल्फी पॉईंट आदीचा वापर करून ग्रंथालय सुशोभित करण्यात आले.

बुधवार, दि. १ जाने रोजी सदर उपक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष अॅड मंगेश नेने यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदानंद धारप, संस्थेचे अध्यक्ष अॅड मंगेश नेने, सदस्य श्रीराम दातार, ग्रंथपाल जी. जी. जोशी, विविध शाखांचे प्राध्यापक, विद्यार्थी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदानंद धारप यांनी आपल्या प्रास्ताविकात वाचनसंस्कृतीचे महत्त्व विशद करताना वाचन अशी सिद्धी आहे, ज्याच्या बळावर माणूस आंतर्बाह्य समृद्ध होतो, त्याच्या जाणीवा विकसित होत असल्याचे सांगत वाचनसंस्कृती जोपासण्याचे,वाढीस लावण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. तर संस्थेचे अध्यक्ष अॅड मंगेश नेने यांनीही 'वाचाल तर वाचाल...'या वाक्यात दडलेला मार्मिक अर्थ उलगडून सांगत विद्यार्थ्यांना पुस्तकांशी मैत्री करण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी ग्रंथालयाने वाचकांसाठी अनुकुल, पुरक वातावरण निर्माण केले असल्याचे सांगत ग्रंथालयातील सुसज्जतेसाठी ग्रंथालय विभागाचे विशेष कौतुक केले. हिंदी विभागप्रमुख डॉ देवीदास क. बामणे 'संघर्ष



'यांनीही विद्यार्थ्यांना वाचनासाठी उद्युक्त करत हिंदी साहित्यातील उत्तमोत्तम पुस्तकांची माहिती दिली व ग्रंथालयाचे महत्व सांगितले यानंतर महाविद्यालयातील नुकतीच सी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झालेली गुणवंत विद्यार्थिनी कु. पूर्वा राजे हिचा यथोचित गौरव करण्यात आले. यावेळी पूर्वाने आपल्या मनोगतात महाविद्यालयातील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पुस्तकांच्या सा-थीने आपण उज्वल यश मिळविल्याचे सांगितले. यानंतर आभार प्रदर्शन होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ देवीदास क.बामणे 'संघर्ष 'यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. पी. डी. पाटील यांनी केले.

# नेने महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी



**दै.रायगड नगरी । पेण**

पे. ए. सो. च्या भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि विज्ञान महाविद्यालय पेण येथे शुक्रवार, दि. ३ जानेवारी २०२५ रोजी डी. एल. एल. ई. युनीट, हिंदी विभाग आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने थोर समाजसुधारक, शिक्षणतज्ञ, स्त्री मुक्ती च्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९३ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या निमित्ताने प्रा. विजया ठाकूर यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमासाठी इतिहास विभाग प्रमुख डॉ. यु. ए. खाडिलकर, हिंदी विभाग प्रमुख व डी. एल. एल. ई युनिटचे रायगड जिल्हा समन्वयक डॉ. देवीदासक. बामणे 'संघर्ष', विविध शाखांचे प्राध्यापकआणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. काही कारणाने संस्थेचे अध्यक्ष मा.अॅड मंगेश नेने जी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदानंद धारप या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नसले तरी यांनी कार्यक्रमासाठी आपल्या शुभेच्छा दिल्या. राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी डॉ. यु. ए. खाडिलकर यांनी आपल्या प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या डी. एल.एल.ई.युनिट व सावित्रीबाई फुले यांच्या बद्दल माहिती सांगितले.आणि स्वत:सोबतंच समाजाच्या उत्थानासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. तर प्रमुख वक्त्या प्रा. विजया ठाकूर यांनीही सावित्रीबाई फुले यांच्या कार्यकर्तृत्वाचा सखोल परिचय विद्यार्थ्यांना करून देत सावित्रीच्या प्रत्येक लेकराने सावित्री माईंचे ओजस्वी व्यक्तिमत्त्व, त्यांचे सुधारणावादी विचार यांचा अवलंब करून सर्वार्थाने सक्षम समाजाच्या निर्मितीसाठी हातभार लावावा, असे आवाहन उपस्थितांना केले.

यानंतर डॉ. देवीदास क बामणे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कर्तृत्वाचे गुणगान करणाऱ्या स्वरचित हिंदी कवितेचे सादरीकरण करून सावित्रीमाईंना आदरांजली वाहिली. तर वैष्णवी लोखंडे या विद्यार्थिनीनेही सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट उलगडून दाखविणारे भाषण सादर केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मिनल थवई यांनी केले व आभार प्रदर्शन डॉ.देवीदास बामणे यांनी केले. यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

**पुण्य नगरी**

# भाऊसाहेब नेने महाविद्यालयाचे विशेष निवासी शिबीर

**पेण :** पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे ७ दिवसीय विशेष निवासी शिबीर बापूजी देवस्थान, सावरसई येथे विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण प्रतिसादात पार पडले. शिबिराच्या उद्घाटन सोहळ्यासाठी भाऊसाहेब नेने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप, रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी डॉ. टी. डी. माळवे, डॉ. एस. डी. लकडे, डॉ. एस. एस. पितळे, प्रा. अंकुश भिसे, अॅड. योगेश दिवेकर, सावरसई गावच्या सरपंच आरती पाटील व त्यांचे पती आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी शिबिरार्थींना शुभेच्छा दिल्या. शिबिरादरम्यान सर्व विद्यार्थ्यांनी शिस्तीचे पालन करून प्रत्येक उपक्रमात हिरिरीने सहभाग घेऊन स्वतःच्या क्षमता विकसित



करण्याचा प्रयत्न करावा आणि शिबिराचा आनंद घ्यावा, असे त्यांनी सांगितले. यावेळी प्राचार्यांनी 'नॉट मी बट यू' हे रा.से.यो.चे ब्रीदवाक्य कायम ध्यानात ठेवून समाजाच्या विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. अॅड. योगेश दिवेकर, पाटील यांनीही शिबिरार्थींना शुभेच्छा देत शिबिरासाठी सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. रा. से. यो.चे कार्यक्रम अधिकारी डॉ. टी. डी. माळवे यांनी शिबिरार्थींना शिबिराचे नियम समजावून सांगत एकमेकांच्या सहकार्याने हसतखेळत शिबीर पार पाडण्याचे आवाहन केले. 'युवक व माझा भारत' या संकल्पनेवर आधारित यंदाच्या शिबिरांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये स्वयंकर्तव्याची जाणीव करून देणाऱ्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये आरोग्य तपासणी, विविध माहितीपर व्याख्याने, कार्यशाळा आदीचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरार्थींनी सावरसई आणि परिसरातील लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी पथनाट्याचे सादरीकरणही केले.

शिबिराच्या समारोप सोहळ्यास रा.ए.सो.चे अध्यक्ष अॅड. मंगेश नेने, खजिनदार संजय कडू, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष अॅड. मंगेश नेने यांनी शिबिरार्थींचे कौतुक करत सदैव स्वतःमधील समाजभान जागृत ठेवून समाजहितासाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. यानंतर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शिबिरामुळे त्यांना स्वकर्तव्याचे भान आल्याचे सांगत कायम समाजहितासाठी प्रयत्नशील राहण्याची भावना व्यक्त केली.

रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी डॉ. तुकाराम माळवे यांनी शिबिरासाठी सर्वतोपरी मदत केल्याबद्दल बापूजी देवस्थान ट्रस्टचे विशेष आभार मानले. नंतर शिबिराची सांगता झाली. हे शिबीर यशस्वी होण्यासाठी रा. से.यो.चे कार्यक्रम अधिकारी डॉ. माळवे, डॉ. लकडे, डॉ. पितळे यांनी विशेष मेहनत घेतली.

**द ग्लोबल टाइम्स**

# नेने महाविद्यालयात मतदार दिनानिमित्त जनजागृतीपर रॅलीचे आयोजन

**पेण :** पे. ए. सो. च्या भाऊसाहेब नेने कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील 'एन.एस.एस युनिट ' व 'डी. एल. एल. ई. युनिट' व तहसील कार्यालय,पेण यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि.२५ जानेवारी रोजी असणाऱ्या 'राष्ट्रीय मतदार दिन'चे औचित्य साधून मतदान जनजागृतीपर रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर रॅलीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप,रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. टी. डी. माळवे, डॉ.एस.डी.लकडे, डॉ. एस. एस. पितळे ,डी. एल. एल. ई. युनिट चे रायगड जिल्हा समन्वयक डॉ. देवीदास क. बामणे,



विविध शाखांचे प्राध्यापक तसेच विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या प्रांगणातून सदर रॅलीची सुरुवात झाली. प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी रॅलीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत मतदान करणे हे आपले मूलभूत कर्तव्य असुन लोकशाही टिकविण्याचे तसेच देशाच्या विकासाचे ते प्रभावी साधन आहे, अशा शब्दांत मतदानाचे महत्त्व विशद केले. यावेळी प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना आपापल्या गाव-परिसरातही मतदाना संदर्भात जनजागृती करण्याचे आवाहन केले. यानंतर गांधी मंदिरातुन रॅली नगर परिषदेकडे रवाना झाली. दरम्यान पेण नगर परिषद भुवन येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी 'मतदान जागृती' व 'कचरा मुक्ती' या विषयावर आधारित पथनाट्याचे सादरीकरण केले. यावेळी नायब तहसीलदार श्री.प्रसाद कालेकर व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

सामान्य जनतेचा आवाज !
जनचक्र वार्ता
मराठी साप्ताहिक
सुविचार
मुख्य संपादक श्री दिनेश रामचंद्र म्हात्रे
RNIMAHMAR53157

## भूगोल दिनानिमित्त नकाशे आणि छायाचित्र प्रदर्शन संपन्न



जनचक्र वार्ता:पेण प्रतिनिधी

पेण(प्रतिनिधी) पेण एज्युकेशन सोसायटीच्या पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयात "भूगोल दिनानिमित्त"तसेच "वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवडा" या निमित्त विविध प्रकारचे नकाशे, नकाशा पुस्तक (अॅटलास) तसेच भौगोलिक छायाचित्रे, उपग्रह प्रतिमा, प्रकल्प अहवाल यांचे प्रदर्शन दिनांक १४ आणि १५ जानेवारी २०२५ रोजी संपन्न झाले. महाविद्यालयातील कला,विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी तसेच प्राध्यापकांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला. फक्त मार्क किंवा अभ्यास या पलीकडे, मानवी जीवनातील प्रत्येक टप्प्यावर नकाशांचे महत्व कसे आहे हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. नैसर्गिक आपत्ती, देशाचे संरक्षण, नैसर्गिक संसाधनांचे नियोजन, व्यवस्थापन,समस्यांचे निराकरण करण्यासाठी नकाशांचे महत्व अनन्यसाधारण आहे,हे भूगोल विभाग प्रमुखप्रा. डॉ अरूण पाटील यांनी विद्यार्थ्यांना विस्ताराने व उदाहरणांसह पटवून दिले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. धारप सर,ग्रंथपाल गोपाल जोशी आणि ग्रंथालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले.

सामान्य जनतेचा आवाज !
जनचक्र वार्ता
मराठी साप्ताहिक
सुविचार
मुख्य संपादक श्री दिनेश रामचंद्र म्हात्रे
RNIMAHMAR53157

## नेने महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा शुभारंभ




जनचक्र वार्ता:पेण प्रतिनिधी

पेण(प्रतिनिधी) पे.ए.सो.च्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात मराठी विभाग आणि मराठी वाड्.मय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने १४ जानेवारी ते २८ जानेवारी हा कालावधी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' म्हणून दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मराठी भाषेचे ज्ञान वृद्धिंगत करणाऱ्या विविध माहितीपूर्ण उपक्रमांचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले आहे. सदर पंधरवड्याचा उद्घाटन समारंभ बुधवार १५ जानेवारी रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांच्या शुभहस्ते पार पडला. यावेळी महाविद्यालयाचे ग्रंथपाल जी. जी. जोशी, मराठी विभागाचे प्रा. डॉ. नामदेव पाटील, प्रा. विजया ठाकूर, प्रा. राधिका गोंधळी, प्रा. सुप्रिया धुमाळ आणि विद्यार्थी वर्ग उपस्थित होता. प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्यार्थ्यांना भाषा संवर्धन पंधरवड्याच्या शुभेच्छा देत मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल समस्त मराठी भाषिकांचे अभिनंदन केले. यावेळी त्यांनी संवर्धनातील 'स' हा संगोपनाचा असून मराठी भाषेचे वैभव जोपासण्याची, ते अधिकाधिक वृद्धिंगत करण्याची जबाबदारी समस्त मराठी भाषिकांची असुन स्वतःच्या भाषेचा गौरव करताना अन्य भाषांची अवहेलना न करता प्रत्येक भाषेचा सन्मान करता आला, तरंच खऱ्या अर्थाने आपल्या माय मराठीचे संस्कार आपल्यात रुजले असे म्हणता येईल असे मत व्यक्त केले. यानंतर विद्यार्थ्यांना अचूक मराठी भाषा कशी आत्मसात करावी, यासंदर्भात मार्गदर्शन करणारा माहितीपट दाखविण्यात आला. यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. नामदेव पाटील यांनी केले.

महाराष्ट्रामध्ये प्रत्येक ठिकाणी प्रतिनिधी नियुक्त करणे आहे अधिक माहितीसाठी 8983242343
निर्भीड निष्पक्ष मराठी वृत्तपत्र
RNI NO. MAHMUL/2023/88828
रायगड स्वाभिमान
मुख्य संपादक : रघुनाथ गणपत कडू संपादक : दिनेश यांगू मोरे आवृत्ती संपादक : किरण लक्ष्मण मोरे
सोमवार दिनांक २० जानेवारी २०२५ | उपसंपादक : रोहन रघुनाथ कडू | संपर्क : ८९८३२४२३४३

## नेने महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा' पंधरवडा विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण प्रतिसादात संपन्न





**पेण समिर घायतले**

पे. ए. सो. च्या भाऊसाहेब नेने कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पेण येथे महाराष्ट्र शासन व उच्च शिक्षण विभाग यांच्या परिपत्रकान्वये दि.१ जाने ते १५ जाने या कालावधीत ग्रंथालय व हिंदी,मराठी भाषा विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' पंधरवडा विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण प्रतिसादात पार पडला.

दि. १ जाने रोजी पे. ए. सो. चे अध्यक्ष अॅड.मंगेश नेने यांच्या हस्ते सदर पंधरवड्याचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी त्यांनी पुस्तकांसोबत मैत्री करून वाचन संस्कृती जोपासण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदानंद धारप यांनी वाचनाचे महत्त्व विशद करताना वाचनरूपी सिद्धी आत्मसात करून स्वतःला समृद्ध करण्याचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

विद्यार्थ्यांत वाचनाची आवड वृद्धिंगत करण्यासाठी सदर पंधरवड्यांतर्गत विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अभिवाचन,ग्रंथप्रदर्शन, ग्रंथदिंडी, ग्रंथालयास भेट,विविध कोश ग्रंथाचे प्रदर्शन, डॉ.सावनी गोडबोले व विविध तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, विविध स्पर्धा आदीचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद लाभला.

दि. १५ जाने रोजी सदर पंधरवड्याचा समारोप झाला.

सदर पंधरवड्याच्या आयोजनात नेने महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. जी. जी. जोशी,डॉ.देवीदास क.बामणे ,'वाचन संकल्प पधंरवाडा समिती' चे सर्व सदस्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी सहकारी यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

द ग्लोबल टाइम्स

# नेने महाविद्यालयाचे विशेष निवासी शिबीर संपन्न

**पेण :** पे. ए. सो. च्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे ७ दिवसीय विशेष निवासी शिबीर बापुजी देवस्थान-सावरसई येथे विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण प्रतिसादात पार पडले.

शनिवार, दि. ४ जानेवारी रोजी सदर शिबीराचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या उद्घाटन सोहळ्यासाठी भाऊसाहेब नेने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .सदानंद धारप, रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. टी. डी. माळवे, डॉ. एस. डी. लकडे., डॉ. एस. एस. पितळे, प्रा. अंकुश भिसे, ॲड योगेश दिवेकर, सावरसई गावच्या सरपंच आरती पाटील यांचे पती आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या उद्घाटन सोहळ्या प्रसंगी आपल्या प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी शिबीरार्थींना शुभेच्छा देताना शिबीरादरम्यान सर्व विद्यार्थ्यांनी शिस्तीचे पालन करून प्रत्येक उपक्रमात हिरीरीने सहभाग घेऊन स्वत:च्या क्षमता विकसित करण्याचा प्रयत्न करावा, शिबीराचा आनंद घ्यावा, असे सांगितले. यावेळी प्राचार्यांनी 'NOT ME BUT YOU' हे रा.से.यो चे ब्रीदवाक्य कायम ध्यानात ठेवून समाजाच्या विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. ॲड योगेश दिवेकर, श्री. पाटील यांनीही शिबीरार्थींना शुभेच्छा देत शिबीरासाठी सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. टी. डी. माळवे यांनी शिबीरार्थींना शिबिराचे नियम समजावून सांगत एकमेकांच्या सहकार्याने हसत खेळत शिबीर पार पाडण्याचे आवाहन केले.

'युवक व माझा भारत'या संकल्पनेवर आधारित यंदाच्या शिबीरांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये स्वयं कर्तव्याची जाणीव करून देणाऱ्या विविध उपक्रमांचे आयोजन शिबीरांतर्गत करण्यात आले. यामध्ये आरोग्य तपासणी, विविध माहितीपर व्याख्याने, कार्यशाळा आदीचे आयोजन करण्यात आले होते. शिबीरार्थींनी सावरसई आणि परिसरातील लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी



पथनाट्याचे सादरीकरणही केले.

१० जाने रोजी शिबिराचा समारोप सोहळा पार पडला. यावेळी पे.ए.सो. चे अध्यक्ष ॲड मंगेश नेने, खजिनदार श्री. संजय कड्डू, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदानंद धारप उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष ॲड मंगेश नेने यांनी शिबीरार्थींचे कौतुक करत सदैव स्वत:मधील समाजभान जागृत ठेवून समाजहितासाठी कटीबद्ध राहण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. यानंतर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शिबीरामुळे त्यांना स्व कर्तव्याचे भान आल्याचे सांगत कायम समाजहितासाठी प्रयत्नशील राहण्याची भावना व्यक्त केली.

# आपले महाविद्यालय क्षणचित्रात

## रसायनशास्त्र विभाग



## भौतिकशास्त्र विभाग





## वनस्पतीशास्त्र विभाग







NEW ARRIVAL
LIBRARY
रिडिंग रूम मध्ये मोबाईल वापरण्यास सक्त मनाई आहे.
ओळखपत्र असल्याशिवाय रिडिंग रूम मध्ये प्रवेश करू नये.


Text Books, Reference Books, And Other Literature's Books.
PEN EDUCATION SOCIETY'S
BHAUSAHEB NENE ARTS, SCIENCE AND COMMERCE COLLEGE
PEN, RAIGAD-402107
LIBRARY INFORMATION
TOTAL NO OF USERS 2015-16 1061
NUMBER OF STAFF IN LIBRARY 4
TOTAL NO. OF BOOKS 17085
TOTAL NO. OF TEXT BOOKS 7110
TOTAL NO. OF REFERENCE BOOKS 9975
TOTAL NO. OF PERIODICALS 43
TOTAL NO. OF BACK VOLUME 466
E-RESOURCES 313
SERVICE
BOOK BANK
BOOK LENDING
BIBLIOGRAPHIC COMPAILATION SERVICE
SDI SERVICE
PERIODICAL CONTENT LIST
INTERNET




भाऊसाहेब नेने महाविद्यालय, पेण



आपल्या महाविद्यालयातील संगणक शास्त्र विभागाचा विद्यार्थी कु.विश्वजीत पाडुरंग पाटील याचे दि. १७/०२/२०२५ रोजी आकस्मिक निधन झाले-

# !! भावपूर्ण श्रद्धांजली !!

पेण एज्युकेशन सोसायटीचे, भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थीवर्ग